पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in
# द पीपल्स पोस्ट
वर्ष : १ । अंक सतरावा । मराठी पाक्षिक । मूल्य :२५ ₹ । दिनांक १ ते १५ मे २०१९




## नाही लोकशाही साक्षरता मतदानाचा टक्का वाढंल कसा?



डॉ. यशवंत मनोहर

भारतीयतत्व म्हणजे मानवी न्याय



डॉ. नितीन तागडे

महाराष्ट्रातील मजूर आणि मागासवर्गीयांची स्थिती


'अर्थ' बळाच्या प्रभावात लोकशाही अन् धर्माचा अधर्माशी संग

–प्रकाश खंडेलोटे



With Best Compliments

Sos. Agrotech Pvt.Ltd



पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १ ।
अंक १७ वा । मूल्य : रु. २५ । दिनांक १ मे ते १५ मे २०१९

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
सचिन ओव्हाळ

**मुखपृष्ठ**
भूषण बिरारी

**संपादकीय पत्रव्यवहार**

११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**

८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
*अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असेलच असे नाही.

द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२

- जाहिरात विभाग संपर्क
  ९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२
- वर्गणीदारांसाठी संपर्क
  **महाराष्ट्र / मुंबई :**

**विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
**मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
**मुंबई / कोकण** : संकेत तांबे : ७७३८७८४१३२

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा

संपादकीय ५

दलित साहित्य समजून घेताना : पर्यायी संशोधन पद्धती
सौमी मंडल ७

महाराष्ट्रातील मजूर, मागासवर्गीयांची स्थिती
डॉ. नितीन तागडे १३

'अर्थ'बळाच्या प्रभावात लोकशाही अन् धर्माचा अधर्माशी संग
प्रकाश खंडेलोटे १८

भारतीयत्व म्हणजे मानवी न्याय
यशवंत मनोहर २४

अल्पसंख्याक आणि गरिबी
प्रो.सुखदेव थोरात / मशकूर अहंमद ३०

व्यक्तीविशेष : बहुभाषिक अभिनेता प्रकाश 'राज' कारणात!
प्रतिनिधी ३५

ग्रंथपरिचय : कांचा अइलैया यांच्या नजरेतला हिंदुत्व-मुक्त भारत
डॉ. मिलिंद कसबे ३७

आजकालचे प्रश्न : पंक्चरवाला ४१

कविता : - रविचंद्र हडसनकर, नांदेड ४४

ग्रेट थॉट्स : ४५

कोण काय बोलतं... : ४६

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. *संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460

## सरकारी प्रसार माध्यमांच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावीच

*१६ ते ३० एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या 'माध्यमांची मोदीनिष्ठा आणि आचारसंहितेची ऐसीतैसी' हा प्रकाश खंडेलोटे यांचा लेख खरोखरच उत्कृष्ट होता. सरकारी अधिकारी असलो तरी आपण किमान निवडणुकीच्या काळात तरी निःपक्षपाती भूमिकेतून वागले पाहिजे, असे अनेकांना वाटत नाही. दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्त विभागाचे अधिकारीही याच पठडीतील आहेत. या अधिकाऱ्यांनी मोदींप्रती असलेल्या निष्ठा वाहण्यासाठी त्यांच्या प्रचार सभांमधील भाषणांना अधिकचा वेळ देणे असो, की पीडित, दलित समूहाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या पक्षांप्रती पक्षपात करणे असो, हे सारे या अधिकाऱ्यांच्या लाळघोटेपणाचे द्योतकच म्हणावे लागेल. सदरील लेखातून आकाशवाणी औरंगाबाद केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाचा पक्षपात आणि तिथल्या अधिकाऱ्यांची मनमानी लेखकाने उघड केली. राजकीय पक्षांना प्रसारणकाळ देण्यात पक्षपात करणाऱ्या या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केलीच पाहिजे.*

**– नागनाथ सूर्यतळ, लोणावळा, जि. पुणे**

## निवडणुकीला वाहिलेला अंक


*१६ ते ३० एप्रिलचा अंक हा लोकसभा निवडणुकीला वाहिलेला अंक वाटला. 'तुझ्या व्होटांवरी गाणे लोकशाहीचे' हा प्रा. जयदेव डोळे यांचा लेख आणि 'माध्यमांची मोदीनिष्ठा आणि आचारसंहितेची ऐसी तैसी' हा प्रकाश खंडेलोटे यांचा लेख हे दोन्ही लेख वाचनीय होते. 'सावधान! दारात आलंय राष्ट्रभक्तीचं सोंग' हा अग्रलेख 'देशाचे स्वातंत्र्य धोक्यात, अघोषित आणीबाणी संपवा' असे सांगणारी खासदार शरद यादव यांची चेतन शिंदे यांनी घेतलेली मुलाखत त्याचबरोबर 'मोदी-शाह देशावरील संकट' हे राज ठाकरे यांचं इचलकरंजी इथं केलेलं भाषण हेही अंकाची वाचनीयता जपणारे होते. एकूणच निवडणुकीलाच वाहिलेला हा अंक होता.*

**– सुमित पाईक, सोलापूर**

## धर्मनिरपेक्ष पक्षांना निवडून देणे ही काळाची गरज

*'फॅसिझम नकोच नको' असं सांगणाऱ्या अंकातील खा. शरद यादव यांची चेतन शिंदे यांनी घेतलेली मुलाखत धर्मनिरपेक्षता जपण्याचं आवाहन करणारी होती. मोदी सरकारने देशातील व्यवस्था विस्कळीत केल्याचे मुलाखतीत सांगताना खा. शरद यादव यांनी लोकशाही मजबूत करण्यासाठी धर्मनिरपेक्ष तत्त्वांची पाठराखण करणाऱ्या पक्षांना निवडून देण्याचं आवाहन केलं आहे. देशाचे स्वातंत्र्य धोक्यात आल्याची जी भीती खा. शरद यादव यांनी या मुलाखतीत व्यक्त केली आहे, ती रास्तच आहे, असे मला वाटते.*

**– विवेक बुद्धिवंत, मुंबई**




## 'आजकालचे प्रश्न' उत्तमच!

*पंक्चरवाला यांच्या लेखनीतून मांडले जाणारे 'आजकालचे प्रश्न' हे सदर आम्हाला खूप आवडते. १ ते १५ एप्रिलच्या अंकातील 'मुलं पळवणाऱ्या टोळ्या', 'अन्नाचा दुष्काळ तर पक्षांचा सुकाळ' आणि 'घराणेशाहीच्या विळख्यात लोकशाही' हे तीन लेख मतलबी राजकारण्यांना आरसा दाखवणारे होते. 'ब्राह्मणी सत्यशोधनाचे अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाचे मिलिंद कसबे यांनी केलेले परीक्षणही वैचारिक धाटणीचे होते.*

**– सुभाष नेरकर, पुणे**

## ते मत चुकीचेच

*मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या इचलकरंजी येथे केलेल्या भाषणाचा संपादित अंश १६ ते ३१ एप्रिलच्या अंकात वाचण्यास मिळाला. या भाषणात ठाकरे यांनी व्यक्त केलेले 'मोदी शाह देशावरील संकट' हे मत चुकीचे आहे. लोकशाही व्यवस्थेत मुक्तपणे आपलं म्हणणं मांडण्याचा प्रत्येकाला अधिकार असला तरी देशाचे पंतप्रधान आणि सत्ताधारी पक्षाच्या प्रमुखांबद्दल असे बोलणे आणि ते छापणे माझ्यासारख्या नागरिकाला योग्य वाटत नाही.*

**– एन.पी. थेरबने, परभणी**

**घराणेशाहीला कोणता पक्ष अपवाद आहे? :** *घराणेशाहीचा रोग देशातल्या बहुतांश राजकीय पक्षांना जडला आहे. आजोबा-मुलगा-नातू-पणतू असा एखाद्या घराण्याचा प्रवास लोकांना फार आवडत नाही; परंतु लोकशाहीच्या नावाखाली हे सगळं चालू आहे. घराणेशाही-घराणेशाही म्हणून अन्य पक्षांच्या नावे ओरडणाऱ्या पक्षातही घराणेशाहीचाच बोलबाला असतो. १६ ते ३० एप्रिलच्या अंकातील प्रकाश खंडेलोटेंच्या लेखात भाजपमधील उमेदवार घराणेशाहीतून आल्याचे नमूद केले आहे. काही राजकीय पक्ष घराणेशाहीवर तोंडसुख घेत असतात. त्यांच्याच पक्षाचा डोलारा घराण्यातून आलेल्या लोकांच्या खांद्यावर असतो, हे ते विसरत असतात, याचं वाईट वाटतं.*

**– एस. के. सुमंत, मुंबई**

# नाही लोकशाही साक्षरता, मतदानाचा टक्का वाढला कसा?

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतात सध्या १७ व्या लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. एकूण ७ टप्प्यांमध्ये ही निवडणूक होत असून २९ एप्रिलपर्यंत ५ टप्प्यांचे मतदान पूर्ण झाले. २९ राज्य आणि ७ केंद्रशासित प्रदेशातील ५४३ पैकी ४२५ मतदारसंघांमधील मतदान आतापर्यंत पूर्ण झाले असून एकूण ६,१३४ उमेदवारांचे भवितव्य मतदारयंत्रांमध्ये बंद झाले आहे. २,२९३ राजकीय पक्ष ही निवडणूक लढवत असून यामध्ये काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, तृणमूल काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आणि बहुजन समाज पक्ष हे ७ मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष आणि ५९ मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्षांचा समावेश आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा मतदानाचा हक्क कोणाला द्यायचा, यावर चर्चा सुरू होती. मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी मतदाराला विशिष्ट पात्रता मिळवावी लागेल, अशी ती चर्चा होती. कुणाचं उत्पन्न किती आहे, कुणाचं शिक्षण किती आहे, कुणाची नोकरीतील मिळकत किती आहे, कोण किती बागायती शेती करतो वगैरे गोष्टींवर चर्चा झडत राहिली. १९३७ ला जेव्हा कौन्सिलसाठी सार्वत्रिक निवडणुका झाल्या तेव्हाही मतदारांसाठी काही अटी होत्या. शिक्षण, कर वगैरे वगैरे; पण त्यानंतर दहा वर्षांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळालं. दोन-तीन वर्षांनी राज्यघटना आली. म्हणजे अगोदर स्वातंत्र्य आणि नंतर राज्यघटना. घटनेनुसार आपलं राष्ट्र प्रजातंत्र झालं. म्हणजे प्रजा देशाची मालक झाली. भारतात जन्माला आलेल्या प्रत्येकाला विशिष्ट वयाची अट पूर्ण केल्यावर मतदानाचा हक्क मिळाला. त्याचं उत्पन्न, शिक्षण, कर भरण्याची क्षमता, जात, धर्म वगैरे कशाचीही अट न घालता मतदानाचा हक्क मिळाला. सर्व प्रकारच्या पात्रता आणि अटी यातून मतदानाचा हक्क मुक्त करण्यात आला. देशद्रोही वगळता साऱ्यांनाच हा हक्क विनासायस लाभला. कैदी, रोगी, गरीब कुणीही मतदार होऊ शकतं. याचा अर्थ देशाचा मालक होऊ शकतं आणि आपल्यासाठी सेवक म्हणजे सरकार निवडू शकतं. 'एक मत -एक मूल्य' अस्तित्वात आलं. म्हणजे झोपडीत राहणारा किंवा भीक मागणारा आणि सर्वांत श्रीमंत अंबानी यांच्या मताचं मूल्य सारखं करण्यात आलं. जगात खूप ठिकाणी अशी गोष्ट घडली नव्हती. भारतात मात्र डॉ. बाबासाहेबांच्या राज्यघटनेबरोबर ती जन्माला आली.

...आता या गोष्टीलाही सात दशकं होऊन गेली आणि आता आपण सतरावी लोकसभा तयार करत आहोत. लोक मतं देतात आणि कुणाचं तरी सरकार बनतं. पण या दीर्घ काळात एक गोष्ट सातत्यानं लक्षात येते आहे आणि ती म्हणजे मतदानाचा टक्का सातत्यानं कमी होतोय. स्वातंत्र्यानंतर काही निवडणुकांमध्ये तो वाढला होता. साक्षरता कमी असतानाही तो वाढला होता. आता साक्षरता वाढली. नवा मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात तयार झाला. राजकीय जाणिवा इतक्या वाढल्या की, समृद्धीचा मार्ग सत्तेतून जातो असंही काही जण सांगायला लागले. हे खरं असलं तर मतदान का घटतं? ते पन्नास-साठ टक्क्यांच्या आसपास का रेंगाळतं? वादाकरता साठ टक्के लोक मतदान करतात असं गृहीत धरलं तर याचा अर्थ असाही होतो की, चाळीस-पन्नास टक्के लोक मतदान करत नाहीत. शाळेच्या निकालासारखं आहे. साठ टक्के पोरं जेव्हा पास होतात तेव्हा चाळीस टक्के नापास झालेले असतात. पास झालेल्यांचा उदो-उदो होतो आणि नापास झालेले कुठं गेले, याचा शोध कोणी घेत नाही. मतदानाचं असंच आहे. मतदानाकडे पाठ फिरवणं याचा अर्थ लोकशाहीकडं किंवा आपल्याला लाभलेल्या जबरदस्त हक्काकडं पाठ फिरवणं असा होतो. लोकांना असं का वाटतं? आपण लोकशाहीत मालक असूनही मालकाचे कार्य ते का करत नाहीत? मतदानाच्या रांगेत थांबण्याऐवजी ते सहलीला का निघून जातात? रोजगार महत्त्वाचा की राष्ट्राच्या रक्षणासाठी लोकशाही महत्त्वाची, या प्रश्नाचं उत्तर रोजगार असं ते का देतात? मतदानासाठी रांगेत थांबल्यावर आपली प्रतिष्ठा कमी होईल असंही काहींना का वाटतं? अजूनही अनेक कारणं आहेत की, ज्यामुळे मतदानाचा टक्का जो वाढत वाढत जायला पाहिजे होता; पण तो कमी कमी होताना दिसतो आहे. लोकांनी म्हणजे मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवणं याचा अर्थ अराजकतेला, हुकूमशाहीला आणि लोकशाही खिळखिळी होण्याला निमंत्रणच असतं. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर मिळालेल्या लोकशाहीच्या रक्षणाचा एक मार्ग म्हणजे मतदान असतं. ती एक तांत्रिक प्रक्रिया नसते तर स्वतःला व्यक्त करणं असतं. स्वतःचा आत्मसन्मान व्यक्त करणं असतं. मीच लोकशाहीचा जागल्या आहे असं सांगणं असतं. जेव्हा जागते रहो असं म्हणत जागल्याची भूमिका करणारेच मतदानाकडं पाठ फिरवतील तेव्हा स्वाभाविकच चोरांचा-दरोडेखोरांचा सुळसुळाट वाढतो. ते लोकशाहीचे लचके तोडायला लागतात. तिच्यावर नखं ओरबडतात. पुन्हा एकदा गुलामगिरीची अवस्था येते.

भारतातील लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहे. लोकसंख्येच्या बाबतीत चीन एक नंबरवर असला तरी तेथे लोकशाही नाही म्हणून आपला पहिला नंबर लागतो. तर सर्वांत मोठ्या लोकशाहीचा जो नागरिक आहे त्याला लोकशाहीचं प्रशिक्षण देण्यात आपण कमी पडलो म्हणजे त्याला लोकशाही आणि संविधान साक्षर बनवण्यात आपल्याला पूर्ण यश आलं नाही. सत्ताकारणाला महत्त्व प्राप्त झाल्यामुळे जी लोकशाही एक व्यापक जीवनशैली बनायला पाहिजे होती ती निवडणुकीपुरती मर्यादित होत चाललीय की काय, असं वाटायला लागतं. सामान्य लोक फक्त निवडणुकीला लोकशाही म्हणू लागले आणि तिथंही मतदानाचा टक्का घसरत चाललाय म्हणूनच गंभीर प्रश्न निर्माण होतो.

दारिद्र्यरेषेचं आणि जातीचं रौद्र रूप पाहणाऱ्या देशात सत्ताखेळातील काही टग्या आणि धनदांडग्यांनी मतदारांना मत विकण्याची सवय लावली. मत विकणाऱ्याला कमी आणि विकत घेणाऱ्याला जास्त जबाबदार धरलं पाहिजे. किती टक्के मतांची खरेदी-विक्री होते आणि निकालानंतर लोकप्रतिनिधींचाही कसा घोडेबाजार होतो, हेही आता नित्याचंच झालं आहे. उमेदवार धनदांडगा, फुगलेल्या मनगटाचा असावा ही उमेदवारासाठी जणू काही अलिखित पात्रताच तयार झाली आहे. खरं तर मत विकणारे, विकत घेणारे, घोडेबाजार मांडणारे हे सारेच देशद्रोही आणि लोकशाहीचे मारेकरी असतात. एखादं मत एखाद्या कोंबडीची तंगडी मिळवून देतही असेल; पण नंतर मात्र सगळ्या कोंबड्याच बिनरोगानं मरतात. खायला तंगडीच शिल्लक असत नाही. तंगडी खिलवणारे मतदाराच्या कोंबड्याच सतत मारायला लागतात. पण इथल्या भ्रष्ट राज्यकर्त्यांनी अनेक मतदारांना कलंकित बनवलं. दाग अच्छे लगते है हे शिकवायला सुरू केलं. जणू काही कपड्यावरचे डाग आणि लोकशाहीवरचे डाग यात फरक नाही. कपड्यावरच्या डागासाठी जाहिरातीतला डिटर्जन्ट उपयोगी पडतो पण लोकशाहीवरच्या डागाचं काय करायचं? मतदाराऐवजी नागरिकाला ग्राहक बनवलं. मालकाऐवजी त्याला असहाय्य बनवलं. परिणाम असा होताना दिसतोय की, मताचा टक्का वाढण्याऐवजी, त्याची सुगी सुरू होण्याऐवजी मूल्यांचा दुष्काळ सुरू झाला. मूल्यांचाच मरणऋतू तयार झाला. उत्पादनाला भाव देऊन नव्हे, शेतीला संरक्षण देऊन नव्हे तर आत्महत्या करणाऱ्यांच्या नातेवाईकाला मनिऑर्डर करून मरणाचा ऋतू थांबवण्याचा प्रयत्न नादान राज्यकर्ते करतात. हा त्यांच्या हालचालींना बळी पडतो. लोकशाहीत मतदानाचा हक्क म्हणजे जणू माणसाचा आत्मा असतो. तो विकण्याचे फंडे सुरू झाले. लोकशाही आणि राजकारण भ्रष्ट होऊ लागलं. निवडून येणारे आपल्या छप्पन्न पिढ्यांचा आणि नातवंडांपर्यंत सर्वांचा उद्धार करतात तर मग आपण मत का विकायचं नाही, असा व्यवहारी प्रश्न मतदार विचारायला लागले आहेत. अर्थात, सारेच मतदार असं झाले असं म्हणता येणार नाही. पण भ्रष्ट होऊ पाहणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. ती वाढतेय किंवा वाढवली जातेय. आजही वयाच्या शंभरीत मतदानाला जाणारे आहेत. आधी लगीन कोंडाण्याचं मग रायबाचं असं म्हणत लग्नाअगोदर मतदानाला जाणारे आहेत. अगोदर मतदान करून मयताला जाणारे आहेत. मतदानाच्या रांगेत दोन-दोन तास थांबणारे आहेत. यादीत नाव का आलं नाही म्हणून भांडणारेही आहेत. प्रश्न आहे तो या साऱ्यांचा टक्का वाढवत तो शंभरापर्यंत नेण्याचा. जे जाणीवपूर्वक मतदान करणार नाहीत, आळस करतील, बेफिकीर राहतील तर त्यांचा विचार कसा करायचा?


लोकशाही पक्व, प्रभावी आणि जबाबदार बनवायची असंल तर तिच्या जडणघडणीतील सर्वांचा सहभाग वाढायला हवा. शेवटी आपण डोकी मोजून बहुमत ठरवत असतो. हा खेळही मजेशीर ठरतो. आता एक उदाहरण घेऊ. समजा, कल्पना करा की, एका मतदारसंघात शंभर मतदार आहेत. तिथं पाच उमेदवार उभे आहेत. मतदानात पन्नास लोकांनी भाग घेतला नाही म्हणजे मतदान फक्त पन्नास टक्के झाले. आता या पन्नास मतांमध्ये पाच उभे आहेत. याचा अर्थ पन्नासामध्ये ज्याला बारा-तेरा मतं पडतील तो निवडून येईल. मतदान पन्नासांनी केलं आणि हा शंभरांचा प्रतिनिधी म्हणून निवडून आला. ज्याला प्रत्यक्षात बारा मतं मिळाली तो शंभरांचा प्रतिनिधी म्हणून निवडून आला. म्हणजे या बारा मतांचं मूल्य शंभर इतकं झालं. अशी उदाहरणं आपण आसाम आणि पंजाबात तसेच जम्मू- काश्मीरमध्ये आणि इतर काही प्रदेशांतही मोठ्या प्रमाणात अनुभवली आहेत. हिंसक किंवा दहशतवादी वातावरणात जेथे निवडणुका झाल्या, तेथे मतदानासाठी लोक घराबाहेर पडले नाहीत. शंभर-दोनशे मतं मिळवणारे निवडून आले. मंत्री झाले. सरकार झाले. अर्थात, या पद्धतीला दोष देता येत नाही; कारण मतदारांनी मतदान करू नये असं कुणालाच अपेक्षित नाही. आपल्या राज्यघटनेलाही अपेक्षित नाहीय.

कोणतंही सरकार, पक्ष, राष्ट्र हे नागरिकांच्या तृष्णेतून, इच्छेतून जन्माला येत असतं. या इच्छेमुळेच ते टिकत असतं. काही काही वेळा मतदाराला भ्रष्ट केलं जातं. नको त्या गोष्टीसाठी त्याला लालसी बनवलं जातं. मतदाराच्या भूमिकेऐवजी, मालकाच्या भूमिकेऐवजी त्याला दुबळ्याची भूमिका करायला सांगितलं जातं. परिणाम संधिसाधू, हिजडे, गुंड, गुन्हेगार असेही काही जण निवडून येतात. त्यांना आपणच कोणीतरी निवडून देत असतो. आपण कोणत्या पक्षाला मतं देत नसतो तर राष्ट्र टिकवून ठेवणाऱ्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी मतं देत असतो. हे सारं वास्तवात आणायचं असंल तर नुसतेच लोकशाहीचे पोवाडे म्हणून चालणार नाही. नुसतंच 'जयभीम' म्हणून चालणार नाही तर गुलामांना मोकळं करणारी लोकशाही प्रवाही आणि परिणामकारक ठेवण्यासाठी लोकशाहीसाक्षरता वाढवत न्यायला हवी. त्यासाठी व्यक्ती, समाज आणि देश या साऱ्यांनीच प्रयत्न केला पाहिजे. कारण या साऱ्यांची लोकशाही श्वासवाहिनी आहे. जबाबदार मतदार, जबाबदार नागरिक नसेल तर लोकशाहीला पोलिओ होण्यास वेळ लागणार नाही, असा इशारा खुद्द डॉ. बाबासाहेबांनी देऊन ठेवलाय. त्यांना साद देणार की नाही? ●●●

# दलित साहित्य समजून घेताना : पर्यायी संशोधन पद्धती

✍ सौमी मंडल

या शोधनिबंधात आदिवासी आणि दलित यांच्या संदर्भात संशोधन करण्याच्या पद्धतींशी संबंधित बहुतांश मुद्द्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. कारण हे मुद्दे नेहमीच उच्चवर्णीयांकडून दडपल्या गेलेल्या आणि आवाज दाबून टाकण्यात आलेल्या भारतीय समाजापुरते मर्यादित आहेत. दलित लेखकांच्या विविध आत्मचरित्रांतून किंवा स्वानुभूतींमधून आपण त्यांचे हे अनुभव जाणून घेऊ शकतो. एखाद्या दलिताला किंवा आदिवासीला त्यांची दुःखे किंवा यातना व्यक्त करण्यासाठी आवाज सापडणे हीसुद्धा क्वचितच घडणारी गोष्ट असते. म्हणून संशोधन करण्याचा आंतरक्षेत्रीय दृष्टिकोन स्वीकारणे याचा अर्थ त्यांना व्यासपीठे उपलब्ध करून देणे, सर्वसामान्यपणे त्यांना आवाज उठवण्याची संधी देणे आणि नेमकेपणाने सांगायचे तर गावकुसाबाहेरून त्यांना गावाच्या मध्यवस्तीत आणणे होय. या प्रकारच्या संशोधनांमध्ये मी माहिती गोळा करण्याच्या विविध पद्धतींवर भर दिला असला तरीही प्रत्यक्ष काम करताना वस्तुस्थिती काहीशी वेगळी असते. ही वस्तुस्थिती सत्याला सुसंगतता, तर्कशुद्धता प्राप्त करून देऊन स्वतःच संशोधन करण्याच्या कित्येक भिन्न पद्धती निर्माण करते.




**या पुस्तकाचे लेखक अँड्रे बेटिल्ले यांनी सामाजिक क्षेत्रिय अभ्यास आणि १० महिने काम करून दक्षिण भारतातील खेड्यातील सामाजिक वर्गीकरणाच्या बदलत्या संरचनाचा अभ्यास केला.**

आपल्या दैनंदिन जीवनामध्ये माहिती गोळा करून आणि तिच्यावर प्रक्रिया करून आपण सर्वचजण कोणत्या ना कोणत्या प्रकारे संशोधनात गुंतलेले असतो. संशोधन करणे हा सकारात्मकदृष्ट्या आपल्या आयुष्याचा एक भाग आहे. यामध्ये आयुष्यातील अनेक प्रसंगांचे विश्लेषण करणे आणि विविध संभाव्य निष्कर्षांचा विचार करणे यात आपण गुंतलेले असतो. काही वेळा आपल्याला रस्त्यात थांबवले जाते आणि बाजारपेठीय संशोधनात भाग घेण्यास सांगितले जाते. एखाद्या विशिष्ट उत्पादनाच्या अत्याधुनिक ब्रँडचे परीक्षण करण्यास आणि त्याचे निष्कर्ष शोधण्यासही आपल्याला सांगितले जाते. अशाच प्रकारे विविध संशोधन पार्श्वभूमींच्या संदर्भात आपण इतर शैक्षणिक संशोधनांकडेही पाहतो, मग ते शास्त्रीय, सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक किंवा साहित्य क्षेत्रातील संशोधन असो! सहसा सर्वच संशोधने ही त्यांचे प्रस्थापित उपयोग आणि मर्यादा यांचा शोध घेण्यासाठी आणि शिक्षण व समाज यांच्या अभ्यासाच्या संदर्भात खुल्या होणाऱ्या नवीन शक्यतांचे परीक्षण करण्यासाठी केली जातात. म्हणून हा शोधनिबंध प्रामुख्याने साहित्यिक लेखनाचे किंवा बहुतांश दलित (अस्पृश्य) व उपेक्षित

किंवा वंचित गटांच्या संदर्भातील लेखनाचे विश्लेषण करण्याच्या हेतूने लिहिला आहे. त्यांच्या आयुष्यातील समस्यांविषयीचाआणि वास्तवांविषयीचा स्पष्ट दृष्टिकोन प्राप्त करून देणाऱ्या कागदपत्रांवर आधारित संशोधनांच्या पर्यायी मार्गाचे आकलन करून घेणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे.

भारतीय समाजात जात किंवा समाज ही संज्ञा (देवी, २०११) अगदी पोर्तुगीज पर्यटक लेखकांच्या काळापासून चिकटलेली आहे. या पर्यटकांनी आणि मिशनऱ्यांनी भारतीय उपखंडातील प्रचंड वैविध्यपूर्ण वांशिक आणि व्यावसायिक गटांचे व संप्रदायांचे सातत्याने वर्णन केले आहे. आपल्याला आदिवासींचे किंवा दलितांचे सौंदर्य माहिती असते, परंतु त्या पलीकडचे सत्य आपल्याला अज्ञात असते. ते शाब्दिक अभिव्यक्तीच्या साम्राज्याच्या पलीकडचे आहे.

आपल्याला थोडेफार काहीतरी मिळावे म्हणून आवाज उठवणाऱ्या अशा दलित किंवा आदिवासी लोकांची संबंधित वैयक्तिक कथने क्वचितच ऐकली जात होती आणि अशा प्रकारे शैक्षणिक वर्तुळात त्यांच्याकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष केले जात होते. कारण त्यांच्या आवाजांमुळे उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाला आव्हान मिळत होते आणि वंचितांच्या स्वत्वाच्या ठाम प्रतिपादनाचा मार्ग तयार होत होता. दलित, आदिवासी आणि महिला यांच्या आत्मचरित्रांचा किंवा आत्मकथनांचा अभ्यास करण्यातील विद्वानांना असलेल्या उद्विग्न करणाऱ्या, चीड आणणाऱ्या स्वारस्याचा उपयोग सकारात्मकपणे दलित, महिला आणि आदिवासी यांच्या पुनर्वसनाच्या दिशेने काम करण्यासाठी होतो आणि त्यांच्या व त्यांच्या लेखनावर संशोधन करण्यासंदर्भातील अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यासही त्याची मदत होते.

अशा प्रकारच्या साहित्यिक/दस्तऐवजविषयक/आत्मचरित्रात्मक संशोधनातून प्रत्यक्षात काय निर्माण होते? याचे सरळ उत्तर आहे वस्तुस्थिती किंवा माहिती यांची निर्मिती होते. मग आपल्याला त्यामधून कोणत्या प्रकारची माहिती मिळते? किंवा अशा लेखनाचे आपण कोणत्या माहितीच्या आधारावर विश्लेषण करतो? या दोन्ही वस्तुस्थिती परस्परांशी अत्यंत संलग्न किंवा परस्परांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. त्यांना विशिष्ट अर्थ आहे; परंतु व्यापक दृष्टिकोनातून विचार करता त्यांच्याकडे पुरावा म्हणून पाहणे शक्य असते. पुरावा म्हणजे विधानाला पाठबळ पुरवणारी माहिती, परंतु आपण त्याच्याकडे विविध स्रोतांमधून मिळणाऱ्या माहितीचे एक रूप म्हणूनही पाहू शकतो. स्कॉटने (२००२) सामाजिक संशोधनांत वापरले जाणारे माहितीचे सहा मूलभूत वर्ग शोधून काढले.

**१. व्यवहारज्ञान माहिती** : जी माहिती खरी आहे हे प्रत्येकालाच माहिती असते, त्या माहितीला व्यवहारज्ञान माहिती असे म्हणतात.

**२. तज्ज्ञांच्या आधारावरची माहिती** : तज्ज्ञांच्या माहितीशी ही संबंधित असते.

**३. प्रायोगिक माहिती** : आपल्या स्वतःच्या अनुभवांवर आपण माहिती विकसित करतो. ती तज्ज्ञांच्या माहितीहून भिन्न असते.



**संशोधकाने उपेक्षित किंवा दडपल्या गेलेल्या घटकांकडून आत्मचरित्र लिहू**
**(रासुंदरी देवी) यासारख्या आत्मचरित्राच्या अवलोकनातून येते. पहिल्या छ**

**४. पारंपरिक माहिती** : पिढ्यान्‌पिढ्यांच्या रितीरिवाजांवरही माहिती आधारित असू शकते. त्यांच्या आयुष्याचे अनेक पैलू स्पष्ट करणारी आणि त्यांचे समर्थन करणारी अशी ही माहिती असते.

**५. अव्यवहार्य माहिती** : विश्वासावर किंवा श्रद्धेवर आधारित माहिती. उदा. देवावरची श्रद्धा.

**६. शास्त्रीय माहिती** : शास्त्रीय चाचण्यांवर आधारित काटेकोर माहिती. (ब्रायमनने दिल्याप्रमाणे,२००८) लिंकोन आणि गुबा (२०००) यांच्या मते, माहितीची उभारणी ही प्रत्येक काम सुरू करण्याआधीची पहिली पायरी आहे. ती आपल्याला एक अत्यंत महत्त्वाचा शास्त्रीय प्रश्न विचारते, तो म्हणजे' माहितीचे स्वरूप काय असते आणि माहिती असलेली व्यक्ती व जे जाणून घ्यावयाचे आहे ती गोष्ट यांच्यात कोणता संबंध असतो?' (मर्टेनिस, २००५.) संशोधन करण्याच्या माहितीशास्त्राची म हत्त्वाची रचना समजून घेण्यासाठी आपल्याला समाजशास्त्रीय संशोधनात वापरल्या जाणाऱ्या चार प्रमुख नमुन्यांची माहिती असावीच लागते. हे नमुने असे आहेत :


**१. प्रत्यक्षवादी किंवा वास्तववादी नमुना** : हा बहुतांश संख्यात्मक असतो. वस्तुनिष्ठता महत्त्वाची असते. एक वास्तविकता, हाताळण्यायोग्य चले असे याचे स्वरूप असते आणि संभाव्यतेच्या साहाय्याने हानमुना जाणून घेता येतो.

**२. रचनात्मकवादी नमुना** : बहुविध सामाजिकदृष्ट्या रचनात्मक वास्तवता, बहुतांश गुणात्मक, आंतरक्रियात्मक दुवा

**३. व्यवहार्यवादी नमुना** : काय सत्य आहे ते काय उपयुक्त आहे त्यावरून ठरवले जाते. बहुतांश वेळासंख्यात्मक आणि गुणात्मक अशी संमिश्र पद्धती वापरली जाते.

**४. परिवर्तनवादी नमुना** : सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, वांशिक, लिंग आणि अपंगत्वाची मूल्ये अशा बहुविध वास्तवांनी






न घेतल्याची अनुभूती तिरस्कृत (सुरजपाल चौहान) आणि अमर जिबान
ायाचित्रात सुरजपाल चौहान (मध्यभागी)

आकाराला येतो. लेखनाचे विश्लेषण करण्यासाठी हा प्रामुख्याने समीक्षात्मक सिद्धांत, समीक्षात्मक वंश सिद्धांत, नव-मार्क्सवादी सिद्धांत, स्त्रीवादी सिद्धांत, फ्रिअरियन सिद्धांत अनुसरतो.

हा शोधनिबंध मूलतः 'सबअल्टर्न' स्वरूपाच्या पर्यायी संशोधन पद्धती शोधून काढण्यासाठी लिहिण्यात आल्याने त्यांची (उपेक्षितांची किंवा वंचितांची) आत्मचरित्रे परिवर्तनवादी नमुन्याच्या दृष्टिकोनातून समजून घेण्याची गरज आहे. त्यांची सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्ये, गुणविशेष समजून घेऊन अशा लेखनांचे विश्लेषण करण्याची गरज यातून पुढे येते.

परिवर्तनवादी नमुना का निर्माण होतो? इतर नमुने सामाजिक मुद्द्यांचे विश्लेषण करण्यास सक्षम नाहीत का? की त्यांच्या विश्लेषण पद्धती पितृसत्ताक किंवा वर्चस्वी पद्धतीसारख्या पूर्वग्रहदूषित स्वरूपाच्या आहेत? वर्चस्वी संशोधन नमुन्यांमुळे (म्हणजेच प्रत्यक्षवादी किंवा वास्तववादी नमुना, रचनात्मकवादी नमुना इ. सारख्या नमुन्यांमुळे ) आणि पद्धतींमुळे असमाधान झाल्याने, तसेच बरेचसे सामाजिक आणि मानसशास्त्रीय सिद्धांत गोऱ्या, सक्षम शरीराच्या पुरुषी दृष्टिकोनातून विकसित होऊन पुरुष लोकसंख्येच्या अभ्यासावर आधारित असल्याने परिवर्तनवादी नमुना अंशतः उदयास आला आहे. उदाहरणार्थ, मानसशास्त्रातील वर्चस्वी सिद्धांतांमध्ये फ्रॉईडचा व्यक्तिमत्त्वाचा सिद्धांत किंवा कोहेनबर्गचा नैतिक विकास सिद्धांत यांचा समावेश होतो. त्यांचा मुख्य भर लैंगिक विषमतेवर आहे आणि त्यातूनच सामाजिक विषमता उदयास येते.

म्हणून समीक्षात्मक विचारवंतांचे सैद्धांतिक दृष्टिकोन, सहभागी कृती संशोधने, मार्क्सवादी, स्त्रीवादी, वांशिक आणि नैतिक अल्पसंख्य आणि अपंग व्यक्ती यांचे दृष्टिकोन यांचा सम ावेश करून (संशोधनाचा सक्रिय विषय म्हणून) बहुतांश वेळा दडपले गेलेले किंवा शोषित त्यांचा आवाज उठवतात. त्याचप्रमाणे हिंदी साहित्याच्या काल विभाजनामध्ये आपल्याला मनुष्यत्वाला पुरुषीरूप दिल्याचे दिसून येते. बहुतांश महाकाव्यांमध्ये किंवा पौराणिक लेखनात त्या काळातील आणि त्या वेळच्या ब्राह्मणी वर्चस्वी समाजव्यवस्थेचे (वर्णभेदाचे) प्रतिनिधित्व आढळते.

परिवर्तनवादी संशोधन नमुन्याचे चार गुणधर्म असतात. त्यातून प्रतिनिधित्व करणाऱ्या वैविध्यपूर्ण दृष्टिकोनांसाठी ते सारखेच असतात आणि परिवर्तनवादी नमुन्याला प्रत्यक्षवादी किंवा वास्तववादी नमुना आणि रचनात्मकवादी नमुना यांच्यापासून भिन्न बनवतात. (मर्टिनीस, २००५.)


१. यात पारंपरिकदृष्ट्या उपेक्षित असलेल्या महिला, अल्पसंख्याक, आदिवासी आणि अपंग व्यक्ती यांच्यासारख्या वैविध्यपूर्ण गटांच्या जीवनांना आणि अनुभवांना प्रमुख महत्त्व असते. दडपशाही करणाऱ्यांच्या वैयक्तिक आणि सामुदायिक कृतींमुळे दडपल्या गेलेल्या गटांच्या जीवनांना कशा मर्यादा पडल्या आहेत, तसेच दडपले गेलेले गट विरोध करण्यासाठी, आव्हान देण्यासाठी आणि प्रस्थापित व्यवस्था उलथवण्यासाठी कोणत्या व्यूहरचनांचा वापर करतात यांवर संशोधकांनी भर दिलाच पाहिजे. म्हणून दडपल्या गेलेल्या शोषितांच्या जीवनांचा अभ्यास करणे याचा अर्थ वंचितांच्या वर्चस्वी साधनांच्या अभ्यासाचाही या अभ्यासात समावेश केला गेला पाहिजे.

२. लिंग, वंश, समान राष्ट्रीय किंवा सांस्कृतिक चालीरितीच्या सामाजिक गटाचा सदस्य असणे, अपंगत्व, लैंगिक समायोजन आणि सामाजिक-आर्थिक वर्ग हे समरूप नसलेल्या सत्तासंबंधांतून प्रतिबिंबित होतात.

३. विषमतेच्या सामाजिक तपासाचे निकाल राजकीय आणि सामाजिक कृतींशी कशा प्रकारे जोडले गेलेले असतात त्याचे यात परीक्षण केले जाते.

४. कार्यक्रमाचा सिद्धांत आणि संशोधनाचा दृष्टिकोन विकसित करण्यासाठी यामध्ये परिवर्तनवादी सिद्धांताचा वापर केला जातो. या समस्या कशा निर्माण होतात या मुद्द्यावर, कार्यक्रम कशा प्रकारे कामकरतो याविषयीच्या श्रद्धांचा किंवा विश्वासाचा संच म्हणजे कार्यक्रमाचा सिद्धांत होय.

**परिवर्तनवादी संशोधनाची पद्धती :** परिवर्तनवादी संशोधक हे बहुतत्त्ववादी असतात आणि त्यांच्या पद्धतींमध्ये ते सातत्याने सुधारणा, बदलघडवून आणत असतात. परिवर्तनवादी प्रवाहात काम करणाऱ्या संशोधकांची गुणात्मक पद्धतींकडे झुकण्याची प्रवृत्ती असते. मात्र तरीही सध्याच्या पद्धतींमध्ये अधिक काळजी आणि ठामपणा आणण्याच्या गरजेवरही ते भर देतात. असे संशोधक परिवर्तनवादी चौकटीत व्यापक प्रकारच्या गुणात्मक पद्धतींचा वापर करतात. मुलाखती, निरीक्षणे, कागदपत्रांचा आढावा आणि कथनात्मक विश्लेषण आदी पद्धतींचा त्यांमध्ये समावेश असतो. (रिनहार्झ, १९९२, मर्टिनीझच्या २००५ च्या लेखनात संदर्भ.) सहभागी कृतीसंशोधन परंपरेतून येणाऱ्या परिवर्तनवादी संशोधनात नियोजन, विश्लेषण, संशोधनाचा अन्वयार्थ लावणे आणि त्याचा वापर करणे यात सहभागी



**ओमप्रकाश वाल्मिकी यांनी लिहिलेले आत्मचरित्र झूटन.**

असलेल्या संशोधन कार्यातील व्यक्तींना सहभागी करून घेणे ही बाब आवश्यक मानवी जाते. संशोधकाने उपेक्षित किंवा दडपल्या गेलेल्या विभागाकडून जणूकाही आत्मचरित्रे लिहवून घेण्यासारखे किंवा अनुबोधपटासाठी लेखन करवून घेण्यासारखे हे असते. हेलोक विषयाच्या सुरुवातीच्या मसुद्यापासून ते पुस्तकभर येणाऱ्या वैयक्तिक आयुष्याच्या वर्णनापर्यंतच्या संपूर्ण लेखनात सहभागी असतात. सूरजपाल चौहान यांचे 'तिरस्कृत', ओम प्रकाश वाल्मिकींचे 'झूटन' , 'अमर जिबान' हे रासुंदरीदेवी यांचे दोन भागांतील आत्मचरित्र (बंगाली, १८६८, १८७९), रामबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' (मराठी, १९१०), बिनोदिनी दासी यांचे 'अमर कथा' हे दोन भागांतील आत्मचरित्र (बंगाली, १९१२) या सर्व पुस्तकांमधून आपल्याला हे दिसून येते. उपेक्षितांमधील 'वैविध्यपूर्ण आवाजांचा समावेश ही या पद्धतीतील आणखी एक सामाईक मध्यवर्ती कल्पना होय. याचा अर्थ असा होतो की संशोधक हा संस्थेच्या किंवा संस्थांच्या किंवा गावातील जवळजवळ सर्व सदस्यांच्या अगर समाजाच्या सदस्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या वैविध्यपूर्ण घटकांना महत्त्व देत आहे. या सदस्यांना किंवा कर्मचाऱ्यांना संशोधनासाठी किंवा शोधांसाठी घेण्यात आलेले असते आणि संशोधकाला प्रत्येक सहभागी व्यक्तीच्या दृष्टिकोनातून संशोधनाकडे पहावयाचे असते. आता इथे असा प्रश्न निर्माण होतो की जगाकडे पाहण्याचा संशोधकाचा दृष्टिकोन कसा आहे? त्याला किंवा तिला कशाचा धांडोळा घ्यायचा आहे? संशोधक अपंग व्यक्तीबरोबर काम करत असेल, तर तो सहभागी व्यक्तीचे जग कसे काय समजून घेतो? पेक आणि फर्मन (१९९२) यांनी असे नमूद केले आहे की, विचारसणी, संघटनात्मक प्रेरक शक्ती आणि सामाजिक-राजकीय प्रक्रिया यांची विशेष शिक्षणातील धोरण आणि अंमलबजावणी यांना आकार देण्यातील मूलभूत भूमिका शोधून काढण्यासाठी संशोधकांनी गुणामक पद्धतींचा वापर केला आहे. त्यांनी असे सुचवले आहे की नियमित वर्गांमध्ये अपंगत्व असलेल्या मुलांचा समावेश करण्यास मर्यादा पाडणाऱ्या बहुतांश मूलभूत समस्या या तांत्रिक स्वरूपाच्या कमी आणि राजकीय स्वरूपाच्याच अधिक आहेत. म्हणून मुलांच्या वर्तनावर परिणाम करणाऱ्या संस्थात्मक प्रक्रियांवर लक्ष केंद्रित करणे हे राजकीय समस्या सोडवण्याहून कमी सुसंगत आहे. (मर्टिनीझचा उल्लेख, पान २३१.) यामुळे अर्थातच अपंग मुले शाळेत यशस्वी का होत नाहीत, यांसारखे काही मूलभूत प्रश्न विचारण्यास संशोधक प्रवृत्त होतो. जर एखादी व्यक्ती स्त्रीवादी दृष्टिकोनातून काम करत असेल तर ती जगाला कशा प्रकारे समजून घेते? सामाजिक-राजकीय प्रक्रियेतील अंतर्दृष्टी पुरवण्याच्या या क्षमतेवर स्त्रीवाद्यांनीही भर दिला आहे, कारण १९९२ मध्ये फाईनने असा विश्वास व्यक्तकेला होता की, गुणात्मक पद्धती या अन्वयार्थ लावण्यासाठी फक्त खरोखरच्या मानववंश शास्त्रीय माहिती गोळा करण्याच्याच पद्धती नाहीत, तर त्या संशोधकाला सामाजिक रचनेत मिसळून जाऊ देतात आणि संशोधक व सहभागी व्यक्ती यांच्यातील वस्तुनिष्ठ आकलनाला प्रोत्साहनही देतात. ( मर्टिनीझ , २००५,पान २३२).

**संशोधकाकडून वापरल्या गेलेल्या काही पद्धती :** सहभागी निरीक्षणात निरीक्षक हा त्याच्या किंवा तिच्या विषयांच्या समाजाचा सदस्य बनतो. या पद्धतीद्वारे समाजात नेमके काय घडत आहे याचा अभ्यास करण्याची आणि नंतर या माहितीचा त्या समाजाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक यंत्रणांमध्ये विचार करण्याची संधी मिळते, हा यासंशोधन पद्धतीचा फायदा आहे. या पद्धतीमुळे इतर समाजांचे आणि संस्कृतींचे रितीरिवाज, लोकपद्धती, मूल्ये, चालीरिती, दृष्टिकोन, जीवनपद्धती आणि संस्कृती या विषयाच्या आकलनासंदर्भातील संवेदनशीलताही पुरवली जाते. अँड्रे बेटिल्लेच्या' कास्ट, क्लास अँड पॉवरः चेंजिंग पॅटर्न्स ऑफस्ट्रॅटिफिकेशन इन अ तंजावर व्हिलेज' या पुस्तकातील सहभागी निरीक्षकाची भूमिका आपण समजूशकतो. इथे त्याने सखोल क्षेत्रीय अभ्यासातून आणि एक सहभागी निरीक्षक असल्याप्रमाणे वागून दहा महिने काम करून दक्षिण भारतातील खेड्यातील सामाजिक वर्गीकरणाच्या बदलत्या संरचनांचा अभ्यासकेला होता. तो जिल्हा विशेषतः जातीय रचनेची गुंतागुंत आणि ताठरपणा यांसाठी ओळखला जातो. या रचनेमुळे गावातील लोकसंख्या ही फक्त विषम कर्मकांडांच्या विभागांमध्येच विभागली गेली नव्हती, तर गावातील वस्त्यांच्या संरचनांतून या पारंपरिक रचनेच्या मूलभूत विभाजनाचे सातत्याने प्रतिबिंब पडत रहात होते. जात, वर्ग आणि श्रीपुरमियांची सत्ता यांच्यातील बदलत्या संबंधांचे विश्लेषण करणे आणि त्याच संदर्भात त्यांच्या

आंतरसंबंधांचे परीक्षण करणे हा हे पुस्तक लिहिण्यामागचा लेखकाचा मुख्यविचार आहे. परंतु आज जमिनीची मालकी, व्यवसाय आणि अगदी शिक्षण या संदर्भात प्रागतिकदृष्ट्या अनेक क्षेत्रे जातमुक्त बनत चालली आहेत. शिक्षण ही यापुडे कोण्या एकाच जातीची मक्तेदारी राहिलेलीनाही आणि शैक्षणिक यंत्रणा ही तत्त्वे आणि श्रीपुरमच्या ब्राह्मणेतरांच्या दृष्टीने व्यवहारात खूपच खुलीझाली आहे. लोकांची जात आणि वर्ग यांचा विचार न करता सांस्कृतिकरणाचे साधन म्हणून शिक्षणाचा विचार करून श्रीपुरम गावातील लोकांवर सखोल संशोधन करत असताना इथे लेखकाने स्वीकारलेला परिवर्तनवादी दृष्टिकोन (श्रीनिवासन, १९८७) किंवा गावातील कनिष्ठ जातीच्या लोकांच्या उत्थानाचा दृष्टिकोन आपल्याला दिसून येतो.

कथनात्मक संशोधन ही कथाकथनाच्या माध्यमातून संशोधनाच्या हेतूने वस्तुस्थितीची चौकशी करूनमाहिती गोळा करण्याची प्रक्रिया असते. संशोधक नंतर हे अनुभवकथन लिहून काढतो. कोन्नेली आणिक्लँडिनीन (१९९०) असे नमूद करतात की, 'मनुष्य हा गोष्टी सांगणारा प्राणी आहे. माणसे वैयक्तिकदृष्ट्या आणि सामूहिकदृष्ट्याही कथनात्मक आयुष्ये जगत असतात. अशा प्रकारे कथनाचा अभ्यास हा माणसे ज्या प्रकारे जगाचा अनुभव घेतात त्या पद्धतींचा अभ्यास असतो.' (रिट्राईव्हड ऑनलाईन १) दुसऱ्या शब्दांत, लोकांची आयुष्ये ही त्यांच्या कथांनी किंवा त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जगण्याने आणि आयुष्याने बनलेली असतात. क्षेत्रीय टीपा, मुलाखती, जर्नल्स, पत्रे, आत्मचरित्रे आणि मौखिक कथा ही सर्व कथनात्मक संशोधनाची साधने आहेत. अशा संशोधनांतून व्यक्तीचे आयुष्य कशा प्रकारे सम जून घेणे, उघड करणे आणि कथाकथनाच्या माध्यमातून कथांमध्ये रूपांतरित करणे, शक्य आहे ते स्पष्ट होते. कथनात्मक संशोधनहे आत्मकथनात्मक पद्धतीच्या लेखनाचेच एक स्वरूप आहे आणि संशोधनाद्वारे ते जाणीवजागृतीच्या बहुविध स्तरांचे प्रदर्शन करते. याद्वारे वैयक्तिकता सांस्कृतिकतेशी किंवा आत असलेली गोष्ट बाह्यगोष्टीशी जोडली जाते. अभ्यासाचे संपूर्ण क्षेत्र हे नेहमीच साहित्यिक सिद्धांत, इतिहास, मानव वंशशास्त्र, नाट्य, कला, चित्रपट, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, भाषाशास्त्र, शिक्षण आणि राजकारण आणि विज्ञानाच्या विविध शाखा यांसारख्या अनेक क्षेत्रांत वापरले जाते. कथाकथनांचा अभ्यास हा अनेक विधदृष्टिकोनांतून केला जातो. मिशलरने (१९८६) सांगितल्या गेलेल्या कथनाच्या विश्लेषणाचा आढावा घेताना पुढील गोष्टींवर भर दिला होता,


१. ग्रंथातील किंवा पुस्तकातील लेखन, किंवा वाक्यरचनेविषयक आणि शब्दार्थ विषयक किंवा शब्द आणि वाक्ये म्हणजे अंतर्गतदृष्ट्या लेखनातील भागांना जोडणारी साधने.

२. कल्पनात्मक लेखन किंवा जे काही बोलले गेले असेल त्याचा सांदर्भिक अर्थ आणि

३. बोलण्यातून प्रतिबिंबित होणारा, व्यक्तींतर्गत गोष्टी किंवा कथा सांगणारा आणि ऐकणारा यांच्यातील आदर्श संबंध. (मार्गारेटने दिलेल्या संदर्भानुसार, १९९०).

उदाहरणार्थ, सूरजपाल चौहान यांच्या 'तिरस्कृत'मध्ये त्यांनी एक गाव आणि व्यापक सामाजिक यंत्रणा यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. या दोहोंद्वारे एक गुंतागुंतीचा भाग तयार होतो आणि या संबंधांविषयी संदिग्धपणे आणि औपचारिक संदर्भात चर्चा करून फारसे काही हाती लागत नाही. म्हणून एका गावाच्या चौकटीत लेखकाच्या स्मृतींच्या साहाय्याने सामाजिक संबंधांच्या अनेक स्वरूपांचा अभ्यास करणे शक्य असते. संपूर्ण परिसरात त्या सर्वसामान्यपणे घडणाऱ्या वास्तव घटना असतात. लेखकाने दिलेला संदर्भ हा थोड्याफार प्रमाणात भारतीय गावातील एकसुरी सामाजिक यंत्रणेचे चित्रण करतो. या यंत्रणेत भंगी आणि चांभार यांना जात व किंवा अस्पृश्य म्हटले जाते आणि बसिथा हे ब्राह्मणांप्रमाणे किंवा जमीनदारांप्रमाणे उच्चवर्णीय लोक असतात. हे लोक ब्राह्मणी समाजाची सर्वगुणवैशिष्ट्ये दर्शवतात. त्यांना नेहमीच फोडा आणि राज्य करा हे तत्त्व अनुसरायला आवडते आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या ताकदवान व सक्षम सदस्यांमध्ये आणि थोड्याफार पैशासाठी आणि अन्नासाठी त्यांच्यासाठी काम केलेल्या दलित समाजातील दुर्बल सदस्यांमध्ये फूट पाडायला त्यांना आवडते.

**निष्कर्ष :** कथनात्मक संशोधन, निरीक्षणात्मक संशोधन किंवा दस्तऐवजात्मक संशोधन यांसारख्या गुणात्मक संशोधनांसाठी फक्त प्रत्यक्ष क्षेत्रात जाणे आणि दिलेल्या गटाचे किंवा त्यांच्या संस्कृतीचे निरीक्षण करणेया गोष्टींची गरज असते आणि संशोधनात या गोष्टी समाविष्ट असतात. संशोधकांनी त्यांची भूमिका, त्यांची संशोधन समस्या, त्यांना चौकशीसाठी प्रेरणा देणारा सिद्धांत, ते कशा प्रकारे माहिती गोळाकरतील आणि तिचे विश्लेषण करतील आणि त्यांचे निकाल किंवा निष्कर्ष ते कसे मांडतील या गोष्टींचाविचार केलाच पाहिजे. या शोधनिबंधात आदिवासी आणि दलित यांच्या संदर्भात संशोधन करण्याच्या पद्धतींशी संबंधित बहुतांश मुद्द्यांचे निराकरण करण्याचा मी प्रयत्न करत आहे. कारण हे मुद्दे नेहमीच उच्चवर्णीयांकडून दडपल्या गेलेल्या आणि आवाज दाबून टाकण्यात आलेल्या भारतीय समाजापुरते मर्यादित आहेत. दलित लेखकांच्या विविध आत्मचरित्रांतून किंवा स्वानुभूतींमधून आपण त्यांचे हे अनुभव जाणून घेऊ शकतो. एखाद्या दलिताला किंवा आदिवासीला त्यांची दुःखे किंवा यातना व्यक्त करण्यासाठी आवाज सापडणे हीसुद्धा क्वचितच घडणारी गोष्ट असते. म्हणून संशोधन करण्याचा आंतरक्षेत्रीय दृष्टिकोन स्वीकारणे याचा अर्थ त्यांना व्यासपीठे उपलब्ध करून देणे, सर्वसामान्यपणे त्यांना आवाज उठवण्याची संधी देणे आणि नेमकेपणाने सांगायचे तर गावकुसाबाहेरून त्यांना गावाच्या मध्यवस्तीत आणणे होय. या प्रकारच्या संशोधनांमध्ये मी माहिती गोळा करण्याच्या विविध पद्धतींवर भर दिला असला तरीही प्रत्यक्ष काम करताना वस्तुस्थिती काहीशी वेगळी असते. ही वस्तुस्थिती सत्याला सुसंगतता, तर्कशुद्धता प्राप्त करून देऊन स्वतःच संशोधन करण्याच्या कित्येक भिन्न पद्धती निर्माण करते.


आवाज
e INDIA
TV CHANNEL
Awaaz India TV Channel
Nation's voice
www.awaazindiatv.com
Facebook.com/awaazindiatvchannel
Youtube.com/awaazindia
Email: advt@awaazindiatv.com



# महाराष्ट्रातील मजूर, मागासवर्गीयांची स्थिती

**कामगार दिनानिमित्त महाराष्ट्रातील मजूर व मागासवर्गीयांच्या जीवनमानाचा वस्तुनिष्ठ आलेख दर्शवणारा लेख**



✍ डॉ. नितीन तागडे

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून राज्याने दरडोई उत्पन्न, गरिबी, पोषण, शिक्षण आणि नागरी सुविधा यांसारख्या मानवी विकास निर्देशांकाच्या संदर्भात लक्षणीय प्रगती करून जनकल्याणामध्ये चांगलीच प्रगती केली आहे. सन १९९३ मध्ये असलेले राज्यातील गरिबीचे ४९ टक्के प्रमाण २०१२ पर्यंत १७ टक्क्यांवर आले होते. साक्षरतेच्या दरात १९९१ च्या ६५ टक्क्यांवरून २०११ मध्ये ८२ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत २००७-०८ मधील ७१ टक्क्यांवरून २०१४-१५ मध्ये ८७ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. याच कालावधीतील उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येतही २० टक्क्यांवरून ३१ टक्क्यांपर्यंत वाढ झाली.

घरे, पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छतागृहे यांच्या उपलब्धतेतही सुधारणा झाली. पिण्याचे सुरक्षित पाणी, स्वच्छतागृह आणि वीज या सुविधा नसलेल्या घरांचे प्रमाण सन २००१ मध्ये अनुक्रमे ३६, ६५ आणि २२ टक्के होते. २०११ मध्ये या स्थितीत सुधारणा होऊन ते अनुक्रमे ३२, ४७ आणि १६ टक्क्यांवर घसरले. गरिबी, साक्षरतेचा दर आणि माध्यमिक आणि उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण प्रवेश दर हे अनुसूचित जाती, इतर मागासवर्गीय प्रवर्ग, अनुसूचित जमाती आणि उच्च जाती, आदिवासी, महिला आणि मुस्लिम व बौद्ध अल्पसंख्याक यांच्या बाबतीतही अशाच प्रकारे सुधारणा झालेल्या आढळून येतात.

विकासाच्या अनुभवाची ही सकारात्मक बाजू असली तरी सर्वांना अधिक चांगले जीवनमान मिळवून देण्याचे उद्दिष्ट अद्यापही साध्य झालेले नाही. राज्यात असमान किंवा विषम विकास झाला आहे. दरडोई उत्पन्न (हे मोजण्याकरिता मासिक दरडोई उपभोग खर्च याचा पर्यायी वापर केला आहे.) गरिबी, कुपोषण, शिक्षण आणि घरे, पिण्याचे पाणी आणि नागरी, आर्थिक व राजकीय हक्कांची उपलब्धता यांसारख्या मानवी विकास निर्देशांकामध्ये तसेच घरे व पिण्याचे पाणी यांसारख्या नागरी सुविधांमध्ये झालेल्या कमी प्रगतीमधून प्रतिबिंबित होते.

सन २०१२ मध्ये महाराष्ट्रातील बहुतांश लोकसंख्येच्या कमी मानवी विकासाच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागत होते. गरिबीच्या प्रमाणात घट झाली असली तरीही सन २०१२ मध्ये सुमारे १७ टक्के लोक गरीब होते. शहरी भागात ९ टक्के लोक गरीब होते; तर ग्रामीण भागात गरीब लोकांचे प्रमाण या तुलनेत अधिक म्हणजे २५ टक्के होते. सन २०१३ मध्ये एकूण मुलांपैकी सुमारे निम्मी मुले कुपोषित होती आणि सुमारे ८१ टक्के मुलांना रक्तशय होता किंवा त्यांच्या शरीरातील लोहाचे प्रमाण कमी होते.

सन २०११ मध्ये सुमारे १८ टक्के लोक निरक्षर होते. १८ ते २३ वर्षे वयोगटातील तरुणांपैकी केवळ एक तृतीयांश तरुणांनी



**तामिळनाडूच्या अरियलूर जिल्ह्यातील १७ वर्षाच्या अनिता या दलित मुलीने झोपडीत राहून १२०० पैकी ११७६ गुण मिळवले. मेडिकल शाखेला तिला २०० पैकी १९६.५ चा कटऑफ आला तरीही मेडिकलच्या प्रवेशातील अनंत अडथळ्यांमुळे तिचे डॉक्टर बनण्याचे स्वप्न धुळीस मिळाले. त्यामुळे गळफास घेऊन तिने आत्महत्या केली. ही दुर्दैवी घटना २०१७ सालातील आहे.**

उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळवण्यात यश मिळविले. सन २०११ मध्ये सुमारे ३३ टक्के लोकांकडे योग्य प्रकारची निवासाची किंवा घरांची सोय नव्हती (शहरी परिसरातील सुमारे एक चतुर्थांश लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहात होते). ३२ टक्के लोकांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध नव्हते आणि ५० टक्के लोकांना त्यांच्या परिसरात स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नव्हती. अनुसूचित जातींना अद्यापही अगदी सर्वच नसले तरी कित्येक पातळ्यांवरचे नागरी आणि आर्थिक हक्क नाकारले गेल्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्राचा विकास कमी–गरिबाभिमुख आहे, असेच दिसून येते. महाराष्ट्र हे २०१५ मध्ये देशाच्या २० प्रमुख राज्यांमध्ये दरडोई उत्पनाच्या बाबतीत प्रथम स्थानावर होते; परंतु दारिद्र्यरेषेच्या बाबतीत ११ व्या क्रमांकावर आहे. मुलांच्या कुपोषणाच्या बाबतीत महाराष्ट्र १३ व्या स्थानावर आहे. त्याचप्रमाणे उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्या नोंदणी दराबाबतीत महाराष्ट्र १७ व्या स्थानावर आहे. पिण्याच्या पाण्याची सुविधा, शौचालय आणि घरातील वीज याबाबतीत महाराष्ट्र अनुक्रमे ५व्या, ९ व्या आणि ११ व्या क्रमांकावर आहे. अशा प्रकारे दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक असला, तरीही देशातील २० प्रमुख राज्यांमध्ये ज्यांचे दरडोई उत्पन्न महाराष्ट्रापेक्षा कमी आहे. अशा राज्यांच्या तुलनेत दारिद्र्य, कुपोषण, उच्च शिक्षण आणि नागरी सुविधा यांसारख्या मानवी विकासाच्या निर्देशांकाच्या बाबतीत मागे पडले आहे. याचाच अर्थ असा, की कमी उत्पन्न असलेल्या राज्यांतील (महाराष्ट्रापेक्षा) काही राज्यांनी मानवी विकासाच्या निर्देशांकावर चांगले काम केले आहे. महाराष्ट्रातील तुलनात्मकदृष्ट्या खराब कामगिरीने असे लक्षात येते की, वाढीव उत्पन्न आणि सरकारी सेवा यांचा वाटा गरीब आणि बिगर गरीब लोकांमध्ये असमान आहे.

गरिबांच्या उत्पन्नात गैर–गरिबांपेक्षा कमी प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील विकास हा कमी गरिबान्मुख आहे. अशा प्रकारे कमी गरिबान्मुख विकास आणि असमानतेत वाढ ही आजच्या काळातील समस्या आहे.

याचाच अर्थ, महाराष्ट्रातील आर्थिक विकासाची रणनीती ही पारंपारिक वाढीच्या धोरणाद्वारे होत आहे. वाढीविषयक सिद्धांतांचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, १९८० च्या दशकापर्यंत आर्थिक विकासाची धोरणे एखाद्या विशिष्ट दृष्टिकोनातून प्रभावित झाली होती. असे आढळून आले की, उत्पन्नाची एका बाजूने वाढ झाली असली तरीही गरिबी अजूनही दुसऱ्या बाजूने मोठ्या प्रमाणावर आहे. या अनुभवाच्या आधारावर जागतिक बँकेने २००० साली एक नवीन धोरण आखले होते. जी कालांतराने आर्थिकदृष्ट्या समावेशक व गरिबान्मुख विकासाची योजना बनली. नंतर समाजातील सर्वसमावेशक किंवा गैर–

भेदभावपूर्ण वाढीच्या दृष्टिकोनातून मांडलेल्या गरिबान्मुख दृष्टिकोनास पाठबळ मिळाले. कारण, काही सामाजिक गटांना भेदभावामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतून पद्धतशीरपणे वगळण्यात येते. वर्तमानकाळातील नवीनतम आणि महत्त्वपूर्ण शब्द म्हणजे सामायिक समृद्धी हा होय.

महाराष्ट्रातील आर्थिक विकासातील हे कमकुवत दुवे लक्षात घेता, गरिबीचे प्रमाण काही विशिष्ट सामाजिक व आर्थिक घटकांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येते. त्या दृष्टीने या लेखात हंगामी मजुरांच्या समस्येचा ऊहापोह करण्यात आला आहे. लेखामधील आकडेवारी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २०१२ च्या रोजगारी आणि बेरोजगारी सर्वेक्षणाच्या आधारावर मांडलेली आहे.

**हंगामी मजूर** : हंगामी मजूर महाराष्ट्रातील सर्व भागात आढळून येतात. मोठ्या प्रमाणात ते ग्रामीण भागात मजुरीवर काम करणारे आहेत. २०१२ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात हंगामी मजुरांची संख्या १३० लक्ष असून त्यांचे प्रमाण एकूण कामगारांच्या तुलनेत २७ टक्के होते. ग्रामीण भागात हेच प्रमाण ३८ टक्के तर शहरी भागात ९ टक्के होते. एकूण हंगामी मजुरांपैकी ७५ टक्के हे शेती क्षेत्रात काम करतात व उरलेले २५ टक्के बिगरशेती क्षेत्रात काम करतात. त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण फारच कमी आहे. निरक्षरांचे प्रमाण ३८ टक्के असून उच्च माध्यमिक व त्यापेक्षा अधिक शिक्षण असणाऱ्यांचे प्रमाण फक्त ५ टक्के आहे. हंगामी मजुरांचे प्रमाण हे सामाजिक वर्गानुसार ठरलेले आहे की काय, असं वाटतं. राज्यातील हंगामी मजुरांच्या २७ टक्क्यांच्या तुलनेत विचार केल्यास असे दिसते की, सर्वाधिक ५० टक्के आदिवासीमध्ये व ४४ टक्के दलितांमध्ये दिसून येते; परंतु हेच प्रमाण इतर मागासवर्गामध्ये २४ टक्के व उच्च जातीमध्ये १७ टक्के आहे. अधिक स्पष्टता येण्याकरिता सामाजिक वर्गवारीनुसार लोकसंख्येच्या प्रमाणाशी तुलना करणे योग्य राहील. त्यानुसार आदिवासी आणि दलितांची लोकसंख्या ९ आणि १५ टक्केच आहे; परंतु त्यांच्यातील हंगामी मजुरांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी असल्याचे आढळून येते.

**दलित मजुरांचे उत्पन्न व गरिबी** : दलितांमधील मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या ही त्यांच्या मजुरीवर अवलंबून आहे. त्यांच्याकडे कोणतीही उत्पन्नाची साधने नसल्यामुळे तसेच शिक्षणाच्या अभावामुळे त्यांना श्रमावर आधारित कामे करावी लागतात. अशा कामांमध्ये मजुरी कमी असल्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी असते. त्यामुळे उपभोग खर्च कमी असतो. याचा परिणाम त्यांच्यातील गरिबी वाढण्यात होतो. मोठ्या प्रमाणातील हंगामी मजुराचे दलितांमधील प्रमाण हेदेखील त्यांच्यातील मोठ्या प्रमाणातील गरिबी असण्याचे कारण आहे, हे खालील आकडेवारीवरून लक्षात येईल. दलितांमधील व त्यांच्यातील मजुरांचे उपभोग खर्च व गरिबीचे प्रमाण असे.


ग्रामीण महाराष्ट्रात सरासरी दरडोई खाण्यावरचा राज्यस्तरीय खर्च हा २१२७ रुपये होता. अनुसूचित जातींमध्ये तो सर्वाधिक कमी (११४३ रुपये) असून त्याखालोखाल अनुसूचित जमातींमध्ये (१७५१ रुपये) होता. इतर मागास प्रवर्गामध्ये तो १९४३ रुपये होता आणि उच्चवर्णीयांमध्ये तो सर्वाधिक २६२१ रुपये होता. इतर मागास प्रवर्गामधील खाण्यावरचा खर्च हा उच्चवर्णीयांपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. सामाजिक वर्गवारीनुसार दरडोई उपभोग खर्चाची, विषमतेची उतरंड ही जातीव्यवस्थेची संरचना स्पष्टपणे दर्शवते.

वरील सामाजिक वर्गवारीनुसार दरडोई उपभोग खर्च वेगवेगळ्या व्यवसायाच्या बाबतीतदेखील तंतोतंत लागू होतो. ग्रामीण भागात तीन व्यावसायिक समूह असतात. शेतकरी, अकृषक उद्योग किंवा व्यवसाय, वेतनावर काम करणारे कामगार किंवा कर्मचारी. सर्व व्यवसायांचा विचार करता प्रत्येक वेळी, कोणत्याही व्यावसायिक समूहाचा विचार करता, दरडोई खाण्यावरचा खर्च हा अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये कमी असतो. ओबीसींमध्ये तो त्याहून अधिक असला तरी उच्चवर्णीयांहून कमी असतो. इथे उतरंडीचा पारंपारिक क्रम पाळला गेल्याचे दिसते.

शहरी भागातही सर्व व्यावसायिक विभागवारींमध्ये (म्हणजे उद्योग, नियमित वेतनावर आणि हंगामी वेतनावर कामगार यांचा) दरडोई खर्च हा अनुसूचित जातींसाठी आणि अनुसूचित जमातींसाठी कमी असतो. त्याहून अधिक खर्च इतर मागास प्रवर्गीयांचा असतो आणि खर्चाच्या बाबतीत त्यावरचा क्रमांक हा उच्चवर्णीयांचा असतो. उच्चवर्णीयांचा क्रमांक याबाबतीतही उच्चच असतो.

नागरी उच्चवर्णीय आणि इतर मागास प्रवर्ग यांमधील हंगामी मजूर यांचे जीवनमान अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या हंगामी कामगारांहून अधिक चांगले आहे. ग्रामीण आणि शहरी भागांतीलही वेतनावर काम करणारे अकृषक उच्चवर्णीय कामगार आणि नियमित वेतनावर काम करणारे कामगार यांचा दरडोई खाण्यावरचा खर्च सहसा अनुसूचित जातीच्या आणि अनुसूचित जमातीच्या लोकांहून अधिक असतो.

**तक्ता १ : महाराष्ट्रातील सामाजिक वर्गानुसार दरडोई मासिक खर्च (रुपयात) – २०१२**




स्त्रोतः कन्झम्पशन इक्सपेंडीचरविषयक एनएसएसओ सर्व्हे

नियमित वेतनावर काम करणाऱ्या लोकांमध्ये अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनुसूचित जातीच्या आणि अनुसूचित जमातीच्या कामगारांचा (कंत्राटी कामे आणि सामाजिक सुरक्षितता असलेली कामे) दरडोई खाण्यावरचा खर्च हा अनौपचारिक क्षेत्रात नियमित वेतनावर काम करणाऱ्या (सुरक्षित कामे आणि सामाजिक सुरक्षितता असलेली कामे) इतर मागासप्रवर्गीय व उच्चवर्णीय


कामगारांपेक्षा कमी असतो. औपचारिक क्षेत्रात नियमित वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आणि नियमित वेतनाच्या सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील कायमस्वरूपी आणि कंत्राटी कामगारांच्याबाबतीतही हीच संरचना लागू पडते. यावरून एकतर उच्चवर्णीयांकडे अधिक चांगले कौशल्य आणि शिक्षण असते आणि/किंवा खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये त्यांना कामावर घेणे आणि वेतन दर याबाबतीत प्राधान्य दिले जाते.

अशा प्रकारे व्यवसायातून, औपचारिक किंवा अनौपचारिक क्षेत्रातील कामगार म्हणून मिळणाऱ्या नियमित वेतनातून केल्या जाणाऱ्या दरडोई खाण्यावरच्या खर्चालासुद्धा (दरडोई उत्पन्न) विषम उतरंडीची संरचना लागू पडते. जात हा विषमतेचा एकमेवाद्वितीय गुणधर्म आहे. इतर मागासप्रवर्ग आणि उच्चवर्णीय यांच्या तुलनेत अनुसूचित जातीचे लोक दरडोई खाण्यावर कमी खर्च करतात. इतर मागासप्रवर्गाचा दरडोई खाण्यावरचा खर्च हा अनुसूचित जातींच्या तुलनेत उच्चतर असतो; परंतु उच्चवर्णीयांच्या तुलनेत कमी असतो. अनुसूचित जमातींकडून केला जाणारा दरडोई खाण्यावरचा खर्च हा सर्वाधिक कमी असतो.

**गरिबी :** गरिबीच्या बाबतीत जाती-जातींमध्ये आणि जमातींमध्ये भिन्नत्व असल्याचे आढळून येते आणि याही बाबतीत दरडोई खाण्यावर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या विषमतेची संरचनाच लागू होत असल्याचे दिसते. सन २०१२ मध्ये सुमारे ५४ टक्के अनुसूचित जमातीचे लोक गरीब होते. त्याखालोखाल अनुसूचित जातींमध्ये २० टक्के लोक गरीब होते. इतर मागास प्रवर्गामध्ये हेच प्रमाण १४ टक्के होते; तर उच्चवर्णीयांमधील हे प्रमाण ९ टक्के होते. म्हणून अनुसूचित जातीचे लोक इतर मागास प्रवर्गीयांपेक्षा अधिक प्रमाणात गरीब असतात. अनुसूचित जमातीचे लोक सर्वाधिक गरीब असतात. गरिबीमध्येही विषमतेची उतरंड टिकून असते.

शेतकरी, उद्योग किंवा व्यवसाय, नियमित वेतन असलेले आणि हंगामी वेतनावरचे कामगार अशा सर्व आर्थिक गटांमध्ये अनुसूचित जातींचे आणि अनुसूचित जमातींचे कामगार हे इतर मागास प्रवर्गीय आणि उच्चवर्णीय कामगारांच्या तुलनेत अधिक गरीब असतात. इतर मागास प्रवर्गीय लोक हे उच्चवर्णीयांपेक्षा अधिक गरीब असतात.

**तक्ता २ : महाराष्ट्रातील सामाजिक वर्गवारीनुसार गरिबीचे प्रमाण (%) - २०११-१२**




**स्त्रोत: कन्झम्प्शन इक्सपेंडीचर २०११ विषयक एनएसएसओ सर्व्हे**

ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांत वेतनावर काम करणाऱ्यांमध्ये अनुसूचित जातीचे आणि अनुसूचित जमातीचे



**नोकरीत आज ना उद्या कायम होऊ या आशेने अशी जोखमीची कामेही कंत्**

कामगार सर्वाधिक गरीब असतात. रोजंदारीवर काम करणाऱ्यांमध्ये ३२ ते ३४ टक्के असलेल्या इतर मागास प्रवर्गाच्या आणि उच्चवर्णीयांच्या तुलनेत ग्रामीण भागातील अनुसूचित जमातीचे (७८ टक्के) आणि अनुसूचित जातीचे (३६ टक्के) शेतमजूर सर्वाधिक गरीब असतात. नागरी हंगामी कामगारांमध्येही गरिबीचे सर्वाधिक प्रमाण अनुसूचित जमातींमध्ये ५८ टक्के, अनुसूचित जातींमध्ये ३७ टक्के असते. इतर मागास प्रवर्गांमध्ये आणि इतरांमध्ये ते अनुक्रमे ३४ टक्के आणि ३० टक्के असते. या बाबतीतील राज्याची सरासरी ३६ टक्के होती. शहरी भागातील नियमित वेतनधारकांचा विचार करता, अनुसूचित जमातीमध्ये २९ टक्के गरिबी होती. अनुसूचित जाती, इतर मागास प्रवर्ग आणि उच्चवर्णीय यांच्यातील गरिबीची टक्केवारी अनुक्रमे १४, १० आणि ५.६ अशी होती. अनुसूचित जमातीचे किंवा जातीचे अधिक प्रमाणातील लोक हे अकृषक क्षेत्रातील अनौपचारिक रोजगारांमध्ये गुंतल्याचे आढळते.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये सर्वाधिक गरीब शेतकरी (५८ टक्के) हे अनुसूचित जमातीचे होते. त्याखालोखाल अनुसूचित जातीचे १७ टक्के शेतकरी गरीब होते. इतर मागास प्रवर्ग आणि उच्चवर्णीय शेतकऱ्यांमधील गरिबीचे प्रमाण अनुक्रमे १५ आणि १३ टक्के होते. ग्रामीण आणि शहरी भागांतील स्वयंरोजगारित आणि उद्योगांचे मालक असलेले अनुसूचित जमातीचे आणि जातीचे उद्योजक सहसा इतर मागास प्रवर्गाच्या आणि उच्चवर्णीय उद्योजकांपेक्षा गरीब असतात.

अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती/इतर मागास



...साठी कामगारांना करावी लागतात.

प्रवर्ग यांच्यातील अपुऱ्या वजनाच्या मुलांच्या टक्केवारीसंदर्भात कुपोषणाचा विचार करता ती ५४ टक्के होती आणि उच्चवर्णीयांमधील हे प्रमाण ४२ टक्के होते.

**हंगामी कामांवर अधिक अवलंबित्व** : अनुसूचित जातीच्या लोकांकडे शेतजमिनीची आणि खाजगी उद्योगांची कमी मालकी असल्यामुळे आणि नियमित वेतनाच्या नोकऱ्यांमध्ये काम करण्याचे त्यांचे प्रमाणही कमी असल्यामुळे ते इतर मागास प्रवर्गीयांच्या आणि उच्चवर्णीयांच्या तुलनेत हंगामी मजुरीच्या कामांवर अधिक प्रमाणात अवलंबून असतात. राज्याची यासंदर्भातील सरासरी २६ टक्के असली तरी हंगामी मजुरीची कामे करण्याचे इतर मागास प्रवर्गीयांचे प्रमाण २४ टक्के आणि उच्चवर्णीयांमधील हेच प्रमाण १७ टक्के आहे. त्या तुलनेत अनुसूचित जातीच्या लोकांमधील ही कामे करण्याचे प्रमाण उच्च म्हणजे ४४ टक्के होते.

ग्रामीण भागात अनुसूचित जातीच्या लोकांची परिस्थिती अधिकच गंभीर होती. ग्रामीण भागातील एकूण अनुसूचित जातीच्या कामगारांपैकी ६२ टक्के कामगार हे हंगामी वेतनावर काम करणारे मजूर होते. हे प्रमाण इतर मागास प्रवर्गातील अशी कामे करणाऱ्या मजुरांच्या प्रमाणाच्या (३२ टक्के) तुलनेत जवळजवळ दुप्पट होते. ही कामे करणाऱ्या उच्चवर्णीय कामगारांचे प्रमाण केवळ २५ टक्के होते. शहरी भागातही अनुसूचित जातीच्या लोकांमध्येच रोजंदारीवरील कामे करणाऱ्यांचे प्रमाण उच्च म्हणजे १६ टक्के होते. इतर मागासवर्गीयांमध्ये ते ९ टक्के आणि उच्चवर्णीयांमध्ये ५ टक्के होते. अशा प्रकारे ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांत रोजंदारीवर हंगामी मजूर म्हणून काम करण्याचे प्रमाण इतर मागास प्रवर्गीयांच्या आणि उच्चवर्णीयांच्या तुलनेत अनुसूचित जातीच्या लोकांमध्ये उच्च होते.

अनुसूचित जातीचे साक्षर लोक मोठ्या प्रमाणात हंगामी रोजंदारीवरील कामात गुंतलेले असतात. अनुसूचित जातीतील अधिकतर पदवीधर हंगामी रोजंदारीच्या कामात असतात. यावरून अनुसूचित जातीच्या लोकांना नियमित वेतनाची कामे मिळवताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे दिसते. त्यामुळेच ते हंगामी रोजंदारीच्या कामाकडे ढकलले जातात. सुमारे ९५ टक्के हंगामी मजुरांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण मिळालेले नसते.

**समारोप व धोरणे** : महाराष्ट्रातील विकासाचा आलेख राज्य म्हणून अस्तित्वात आल्यापासून चढता असला तरी यामुळे हंगामी रोजगारांच्या प्रमाणात विशेष सुधारणा झालेली दिसून येत नाही. अजूनही महाराष्ट्रात १३० लक्ष लोकसंख्या यामध्ये कार्यरत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील गरिबीचे प्रमाणदेखील अधिक आहे. मुख्यतः असे दिसून येते की, गरिबीचे प्रमाण हंगामी मजुरांमध्ये सर्वाधिक आहे. हंगामी मजूर हे मुख्यतः दलित किंवा आदिवासीच असतात. त्यामुळे महाराष्ट्राने अशी धोरणे स्वीकारावीत की, ज्यामुळे राज्याची गरिबी मोठ्या प्रमाणात कमी होईल. त्याकरिता मुख्यतः दोन प्रकारच्या धोरणांची आवश्यकता आहे. एक म्हणजे, सर्वांना लागू होईल असे धोरण तर विशिष्ट सामाजिक गटांतील लोकांकरिताचे दुसरे धोरण. पहिले धोरण हे सर्व जाती व धर्मातील लोकांकरिता तर दुसरे धोरण जातीय आधारावरील समस्येचे निराकरण करणारे असावे. हंगामी कामगारांच्या बाबतीतील कळीचा मुद्दा हा हंगामी मजुरांची मजुरी वाढविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणसुविधा उपलब्ध करून देणे होय. मजुरी कमी असण्याचे मुख्य कारण हे मजुरांचा पुरवठा हा त्याच्या मागणीपेक्षा जास्त असणे होय. त्यामुळे पर्यायी रोजगाराची निर्मिती केल्यास सापेक्षरित्या पुरवठा कमी होईल व त्याद्वारे मजुरीमध्ये वाढ होईल. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना कायदा २००५ होय. त्याद्वारे मागेल त्याला वर्षातून १०० दिवस रोजगार देण्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमणात कृषि क्षेत्रात मजुरीत वाढ झाली; परंतु त्याचबरोबर गरिबीच्या प्रमाणातदेखील मोठी घट झालेली दिसून येते. दुसरा मार्ग हा वाढलेल्या शिक्षणाद्वारे येतो. आज महाराष्ट्रामध्ये खाजगी शाळा मोठ्या प्रमणात उदयास आलेल्या आहेत. त्यामुळे गरिबांची मुले व विशेषतः हंगामी मजुरांच्या मुलांना शिक्षण घेणे अशक्य झाले आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, दलितांमधील तसेच आदिवासींमधील मजुरांचे प्रमाण कमी करण्यासाठी त्यांच्या शिक्षण प्रसाराचे काम महत्त्वाचे ठरेल. काम करताना तसेच शिक्षण घेताना दलितांना जातीय भेदभावाचा सामना करावा लागतो, त्यामुळेच त्यांना विशेष प्राधान्य देण्यात येते; परंतु त्याची प्रभावी व्यवस्थापन व अंमलबजावणी आवश्यक आहे. ●●●

**(डॉ. नितीन तागडे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक आहेत.)**

# ‘अर्थ’बळाच्या प्रभावात लोकशाही अन् धर्माचा अधर्माशी संग

✍ प्रकाश खंडेलोटे

पैसे, दारु, सोने वाटून निवडणूक लढविणारे धनदांडगे लोकशाही आपल्या प्रभावाखाली घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचे अब्जावधी रुपयांच्या ऐवज जप्तीवरून स्पष्ट होते. निवडणुका निःपक्षपाती घेण्याविषयी निवडणूक आयोगाची संदिग्ध भूमिका, संविधानातील मूल्यांची गळचेपी, पैशाचा अमर्याद वापर, विकासाऐवजी भावनिक मुद्यांवरून मतदारांची भलामण, धर्माचा राजकारणासाठी वापर आणि शहरी मतदारांमधील उदासिनता या बाबी लोकशाही मजबुतीच्या प्रयत्नांतील अडथळे ठरत आहेत.

आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही, असा ठाम विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेला होता. व्हाईस ऑफ अमेरिका या अमेरिकेच्या सरकारी रेडिओवरून दिलेल्या भाषणात त्यांनी, लोकशाही म्हणजे सहयोगी जीवनाचा एक नमुना असून लोकशाहीची मुळे ही सामाजिक संबंधात आणि लोकांमधील सहयोगी जीवनाच्या स्वरूपात शोधता येतील, असे मत व्यक्त केले होते. आज लोकांच्या खाण्यापिण्यासंबंधी आणि परिधान करण्यासंबंधी कायदे करण्याच्या प्रयत्नात समाजाचं सहयोगी जीवन सरकार उद्ध्वस्त करू पाहत आहे. लोकांनी काय खावं, कोणते कपडे घालावेत हे सरकार ठरवू लागल्याने लोकांचे जीवन असुरक्षित बनले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच, रोजगाराच्या संधींची अनुपलब्धता आणि अदृश्य स्वरूपातील एकाधिकारशाहीने देशातील लोकशाही ही विषमता, धर्मांधता आणि जातियतेच्या गर्तेत लोटली गेली आहे. शासन नावाची यंत्रणा समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या राज्यघटनेतील मूल्यांप्रती उदासिन असल्यामुळे आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीपेक्षा राजकीय लोकशाहीला महत्त्व येऊ लागले आहे. राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांचे हरण होत असून कायद्याचे राज्य ही संकल्पना नाकारणाऱ्या शक्ती देशात प्रबळ बनत आहेत. पैसा आणि गुन्हेगारी क्षेत्रातील आपल्या ‘लौकिका’च्या बळावर निवडणूक लढवून कायदेमंडळात जाणाऱ्यांचे प्रमाण चिंताजनकरित्या वाढत आहे. या निवडणुकीत पहिल्या चार टप्प्यांत १९ टक्के उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे तर २९ टक्के उमेदवार करोडपती आहेत. असे उमेदवार साम, दाम, दंड, भेद या नीतीचा अवलंब करून लोकसभेत गेलेच तर ते देशाला नैतिकतेचे धडे देऊ लागतील. धर्मनिरपेक्ष देशात धर्मांधतेला खतपाणी घालणारे साधू-साध्वीही कायदेमंडळात जात आहेत. अशा स्थितीत धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करणाऱ्या लोकांची जबाबदारी आणखी वाढली असताना कर्तव्याप्रती गंभीर नसलेल्या आणि पुरेशी राजकीय समज नसलेल्या लोकांमुळे लोकशाही धनिकांची बटिक बनण्याचा धोका वाढताना दिसतो आहे.

सध्या देशात १७ व्या लोकसभेसाठी निवडणुका सुरू आहेत. या निवडणुका सात टप्प्यांत १९ मे रोजी संपून २३ मे रोजी निकाल जाहीर केले जाणार आहेत. निवडणूक काळात वातावरण स्वच्छ असेल तर त्यात पडणारे लोकशाहीचे प्रतिबिंब स्पष्ट दिसेल. हे प्रतिबिंब लोकशाहीचे सुदृढ रूप दाखविणारे आहे की नाही, हे राजकीय पक्षांमध्ये आणि लोकांमध्ये संविधानाप्रती बांधिलकी किती आहे, यावर ठरत असते; परंतु मंत्रीपदाची शपथ घेताना राज्यघटनेतील लोकशाही मूल्यांची बूज राखण्याची वचनबद्धता व्यक्त करणारे मंत्रीच संविधानाचा अनादर करीत आहेत. संविधान बदलण्याची भाषा करीत आहेत. त्यामुळे संविधानातील मानवी मूल्यांचे रक्षण करण्याची बांधिलकी समाजात कोण रुजवणार? हक्कांप्रती कमालीची आग्रही असणारी माणसं जबाबदारीचं भानं विसरून वागत असल्याने आणि शासनातील काही बेजबाबदार लोक संविधानाचे पावित्र्य राखत नसल्याने संविधानसापेक्षता गढूळ बनत चालली आहे. यामुळे देशात पारदर्शक लोकशाही नांदताना दिसत नाही.

निवडणूक आयोगाने या निवडणुकांना लोकशाहीचा उत्सव असे म्हटले आहे. या उत्सवात निवडणूक आयोग, सरकार आणि लोकांचीही जबाबदारी अधिक असते. ती पार पाडताना हे तीनही घटक आपल्या कर्तव्याप्रती फारसे उत्तरदायी दिसत नाहीत. निवडणुकांच्या तोंडावर पुलवामा इथं सीआरपीएफच्या जवानांवर झालेल्या हल्ल्याचा बदला म्हणून बालाकोटमध्ये हवाई हल्ला करण्यात आला. याचे श्रेय भाजपची नेतेमंडळी घेते आहे. नव्हे, पंतप्रधान मोदी यांनी औशाच्या प्रचारसभेत, पहिल्यांदा मतदान करणाऱ्यांना तुमचे मतदान पुलवामातील शहिदांना अर्पण करणार का, अशी साद घातली होती. वास्तविक, आतापर्यंत



**लोकसभा निवडणुकीत वाटप करण्यासाठी नेली जाणारी रोख १४ कोटी रूपयांची बेहिशोबी रक्कम आयकर विभागाने चेन्नईत जप्त केली.**

कोणत्याही सरकारने अशा प्रकारे शहीद जवानांच्या नावावर मते मागितली नव्हती. जवानांच्या हौतात्म्याचे राजकारण न करण्याचे न्यायालयाने बजावूनही भाजपची नेतेमंडळी त्यापासून परावृत्त होत नाहीत. त्यामुळेच तर विकास कामांऐवजी भावनिक मुद्यांवर मतदारांच्या भावनेला हात घालण्याचा हा प्रकार लोकशाहीसाठी लांच्छनास्पद असल्याचा सूर विरोधी पक्षांमधून व्यक्त होताना दिसतो.

निवडणूक आयोग ही एक स्वायत्त संस्था असूनही ती सत्ताधाऱ्यांच्या कलाने वागताना दिसते. त्यामुळेच तर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप अध्यक्ष अमित शाह यांच्याविरोधात आदर्श आचारसंहिता उल्लंघनाच्या ११ तक्रारी काँग्रेसने आयोगाकडे दाखल केलेल्या असूनही त्यावर तात्काळ निर्णय द्यायची गरज आयोगाला वाटत नाही. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला फटकारले. आयोगाची आचारसंहिता जशी देशातील प्रत्येकाला लागू आहे, तद्वतच आयोगासाठी घालून दिलेले नियम सत्ताधाऱ्यांच्या फेवरमध्ये वागण्याला मान्यता देत नाहीत. सरकारमधील मंत्रीही आचारसंहितेला न जुमानता लोकशाहीला आव्हान देणारी वक्तव्ये करू लागली आहेत. घटनात्मक पदावर असूनही 'मोदीग्रस्त' झालेले मंत्री, राज्यपाल मोदीनिष्ठेचे प्रदर्शन करत असताना निवडणूक आयोग मात्र त्यांच्यावर कठोर कारवाई करत नाही. लोकशाहीला नख लावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना निवडणूक आयोगच अभय देत असून यामुळे सर्वांना समान न्याय या आचारसंहितेतील मार्गदर्शक तत्त्वाचीच पायमल्ली होत आहे. आचारसंहिताभंगाच्या तक्रारींबाबत आयोग ज्याप्रकारे भूमिका घेत आहे, त्यावरून ते, सरकार आणि विरोधक असा स्पष्ट भेद करीत असल्याचे दिसते. टी.एन. शेषन मुख्य निवडणूक आयुक्त असताना त्यांनी देशाच्या निवडणूक आयोगाला त्यांचे अधिकार काय आहेत, हे दाखवून दिले होते. १९९० पूर्वीचे राजकारण काही मोजक्याच राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांपुरते मर्यादित होते; परंतु १९९० नंतर निवडणुकांवरील अमर्याद खर्च, मतदारांना आमिष दाखविणे, मतदान केंद्रे ताब्यात घेणे, बनावट मतदान करणे आणि निवडणुकांतील गुंडगिरी असे प्रकार वाढल्यामुळे शेषन यांनी राज्यघटनेतील कलम ३२४ नुसार देशात मुक्त, खुल्या व निकोप वातावरणात निवडणुका घेता याव्यात यासाठी आयोगाच्या अधिकारांची व्याप्ती वाढवली. निवडणुकांमध्ये सर्व राजकीय पक्षांना जिंकण्यासाठी, प्रचारासाठी समान संधी देण्याचे तत्वही यातच समाविष्ट आहे. निवडणुकांच्या काळात सरकारी प्रशासन आयोगाच्या स्वाधीन होणे आणि तो अधिकार प्रस्थापित करण्याचे श्रेयही शेषन यांनाच जाते. विशेष म्हणजे, निवडणुकांचे सुयोग्य, भेदभावरहित आणि निःपक्षपाती व्यवस्थापन ही अंतिमतः आयोगाचीच जबाबदारी असल्याने त्यासाठी जे जे निर्णय घेणे, कारवाई करणे आवश्यक असते, त्याबाबतचे सर्व अधिकार शेषन यांनी आयोगाला बहाल करून घेतले. शेषन यांच्यानंतर आयोगाचे अधिकार वापरून निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याची दृष्टी अधिकाऱ्यांकडे राहिली नसल्याने किंबहुना विरोधी पक्षांच्या मते निवडणूक आयोगच सरकारच्या दबावाखाली काम करीत असल्याने अधिकाऱ्यांना आयोगाचे अधिकारच खऱ्या अर्थाने उमगले नाहीत. यामुळे निवडणूक आयोगाची जरबच राहिली नाही.

**धनदांडग्यांची मक्तेदारी** : लोकशाही मजबूत करणाऱ्या मतदानासारख्या राष्ट्रीय कर्तव्याबाबत उच्चशिक्षित मंडळी गंभीर नाहीत. दुसरीकडे, भ्रष्ट राजकारणी मंडळीही कमालीची गरिबी



**बिहारमधील बेगुसराई लोकसभा मतदारसंघात मतदानासाठी महिलांमधील प्रचंड उत्साहाचे हे बोलके छायाचित्र.**

आणि लोकांच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्यांना आमिषाच्या मोहाला बळी पाडतात आणि पैशाच्या बळावर लोकशाहीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न हे धनदांडगे करतात. निवडणूक आयोगाने प्रत्येक निवडणुकीच्या खर्चाची मर्यादा घालून दिलेली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी ७० लाख रुपये खर्च करण्याची मर्यादा आहे; परंतु निवडून येण्यासाठी उमेदवार पाण्यासारखा पैसा खर्च करीत असतात. उमेदवारांकडून गैरमार्गाने होणारे 'लक्ष्मी' प्रदर्शन तोंडात बोटे घालायला लावणारे आहे.

मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक उमेदवार रोख रक्कम, सोने-चांदी, दारू आदींचे मोठ्या प्रमाणावर वाटप करीत असतात. वाटपासाठी घेऊन जात असताना हा ऐवज प्रचंड प्रमाणात जप्त करण्यात आला. निवडणूक जाहीर झाल्याच्या १६ दिवसांनंतर म्हणजे २६ मार्चपासून जप्त केलेला ऐवज निवडणूक आयोग जाहीर करतो आहे. २६ मार्च ते २६ एप्रिल या बत्तीस दिवसांमध्ये देशभरात ३ हजार १७६ कोटी ७३ लाख रुपयांपेक्षा अधिकचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये ७५२ कोटी ९२ लाख रुपयांच्या रोख रकमेचा समावेश आहे. २०१४ च्या तुलनेत ही रक्कम १५१.०२ टक्क्यांनी जास्त आहे. संपूर्ण सातही टप्प्यांतील मतदान प्रक्रिया संपण्यासाठी लागणारे उर्वरित (२७ एप्रिल ते १९ मे) २३ दिवस बाकी गृहित धरले तर आणखी जवळपास एवढाच ऐवज जप्त केला जाऊ शकतो. दररोज अंदाजे १०० कोटींचा ऐवज जप्त केला जात आहे. २६ मार्च ते २६ एप्रिलदरम्यान जप्त केलेल्या ऐवजाची किंमत ही २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भारत सरकारने केलेल्या खर्चाच्या रकमेच्या ८२.०७ टक्के आहे.

**...तर ती खरी लोकशाही होय :** निवडणुकीत लोकांनी निवडलेले लोकांचे सरकार आले तर ते खऱ्या अर्थाने लोकांच्या हितासाठी काम करू शकते; परंतु जर लोकांना दारू पाजून, पैसे आणि सोने-चांदी देऊन त्यांची मतं मिळवणारी लोकं सरकार स्थापन करीत असतील तर धनशक्तीच्या प्रभावाखालचे ते सरकार लोकांचे असण्याचा प्रश्नच येत नाही. एकूण काय, तर लोकांचे प्रश्न मांडून ते सोडवण्याची क्षमता नसलेले आणि लोकाभिमुखतेपासून दूर असलेले लोक अर्थबळावर निवडणूक हायजॅक करीत असतात. याही निवडणुकीत असे चित्र पहायला मिळत आहे. जनतेचे प्रश्न आणि विकासाशी बांधिलकी मानून काम करणारे लोक कायदेमंडळात गेले तर सामान्यांच्या हिताचे कायदे तयार होऊन लोकशाही खऱ्या अर्थाने समाजात रुजेल; परंतु ही जाणीव समाजमनात अद्यापही रुजलेली नाही. असे नसते तर देशातील वंचित, पीडितांसाठी आपलं आयुष्य वेचणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत मध्य उत्तर मुंबई मतदारसंघात पराभव झाला नसता. या ठिकाणी लोकांनी बाबासाहेबांच्या विरोधात उभे असलेले त्यांचे एकेकाळचे स्वीय सहाय्यक नारायण काजरोळकर यांना निवडून दिले. नागालँड, आसाम, मणिपूर, अरूणाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मिरात लागू असलेला अफस्पा कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी इरोम शर्मिला चानू यांनी ९० दिवस उपोषण केले होते. आयुष्यातील महत्त्वाचा काळ समाजासाठी घालवणाऱ्या या समाजसेविकेला २०१७ च्या मणिपूर विधानसभा निवडणुकीत केवळ ९० मते पडली. जातविरहीत, भेदभावरहित आणि हुकूमशाहीमुक्त जग अस्तित्वात येण्याचं स्वप्नं पाहणाऱ्या या मणिपूरच्या आयर्न लेडीच्या जीवनाचा हेतूच लोकांना कळला नाही.

**लोकशाहीबद्दलचे प्रेम, यांचे आणि त्यांचे :** या निवडणुकीत पहिल्या चार टप्प्यांत देशात ६६.५२ टक्के मतदान झाले. विशेष म्हणजे, अनेक आदिवासी वाड्या-तांड्यांवर महिलांनी उन्हातान्हात रांगा लावून मतदान केले. त्यामुळे २०१४ च्या

# मुस्लिम अधिकाऱ्याने मोदींच्या हेलिकॉप्टरची तपासणी करणे चुकीचे होते?

ओडिशामध्ये संबळपूर येथे प्रचारसभेसाठी गेलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हेलिकॉप्टर तपासले म्हणून कर्नाटक केडरचे



आयएएस अधिकारी मोहम्मद मोहसिन यांना निवडणूक आयोगाने निलंबित केले. या अधिकाऱ्याने महानिरीक्षक या नात्याने हेलिकॉप्टर तपासणी केली. त्याचे काय चुकले? की तो मुस्लिम आहे, हाच त्याचा गुन्हा होता? वैयक्तिक लाभासाठी सत्ताधाऱ्यांचे लांगुलचालन करणाऱ्या अधिकाऱ्यांना शाबासकी मिळते. प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणारे अधिकारी मात्र शिक्षेस पात्र ठरतात. उच्चकोटीच्या प्रामाणिकपणासाठी ओळखले जाणारे ज्येष्ठ आयएएस अधिकारी अशोक खेमका यांनी मनमोहन सिंगांच्या राजवटीत हायलाईटेड जमीन व्यवहार भ्रष्टाचार उघडकीस आणून रॉबर्ट वड्रा यांना चौकशीच्या रडारावर आणून सोडले. त्यामुळे त्यावेळी त्यांची बदली केली गेली. खेमका यांनी मजबूत बनवलेल्या फाईलमुळेच मोदी सरकार वड्रा यांच्याविरोधात वारंवार कारवाईचा बडगा उगारत आहेत. भ्रष्ट अधिकाऱ्यांचा कर्दनकाळ असलेले अशोक खेमका ज्या-ज्या खात्यात गेले त्या खात्यातील शेकडो कोटींची जमीन व्यवहाराची भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणली, याची शिक्षा म्हणून खेमका यांची २७ वर्षांमध्ये ५७ वेळा बदली झाली. आपल्या सोयीसाठी राबणाऱ्या अधिकाऱ्यांवर कृपादृष्टी ठेवणारे राजकारणी हे सचोटीने कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांना मात्र निलंबनाची, बदलीची शिक्षा देतात. मोहम्मद मोहसिन हे त्यापैकीच एक.

तुलनेत महाराष्ट्रातील मतदानाचा टक्का वाढला. यावेळी मुंबई महानगरातील मतदारांमध्येही उत्साह असल्याने तिथला टक्का वाढला; परंतु महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असे बिरूद मिरवणाऱ्या पुण्यात मात्र मतदानाची टक्केवारी ५० पर्यंतही पोहोचू शकली नाही.

'पुणे तिथं काय उणे' असं म्हटलं जातं. आता निवडणुकीत लोकशाहीप्रती तिथल्या बहुतांश लोकांनी जी कमालीची अनास्था दाखवली, त्यावरून यापुढे 'पुणे तिथं बरंच उणे' असं म्हणावं लागेल. मतदानासारख्या राष्ट्रीय कर्तव्याप्रती पुणेकर उदासिन असतील आणि पुन्हा 'मतदान कमी झालं म्हणणं चुकीचं' असल्याचा गळा काढत असतील, तर त्यांच्यातील सांस्कृतिक जाणिवेबद्दल प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

लोकशाही समृद्ध बनविण्याच्या या प्रक्रियेत तळागळातील सर्वच नागरिकांचा सहभाग वाढावा म्हणून निवडणूक आयोग प्रयत्नशील असतो. अगदी एका मतदारासाठीही लाखो रुपये खर्चून मतदान केंद्र उभारले जाते. गुजरातच्या बाणेजमध्ये केवळ एका मतदारासाठी मतदान केंद्र स्थापन केले होते. बाणेजमध्ये गीरच्या वनात असलेल्या महंत भरतदास यांनी या मतदान केंद्रावर मतदान केले. भरतदास मतदान करताना पाहण्यासाठी विदेशातूनही पत्रकार आले होते. छत्तीसगडच्या शेरडांड गावात केवळ चार मतदारांसाठी मतदान केंद्र उभारले होते. एकेका मतासाठी आयोगाची कसरत सुरू असताना पुणेकरांना मात्र लोकशाहीच्या मजबुतीसाठी मतदान करण्याची गरज वाटली नाही, हे निंदाजनक आहे.

१९५१ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रथम मतदान करून देशातला पहिला मतदार बनलेल्या श्याम सरन नेगी या १०३ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकाने १७ व्या लोकसभेसाठीही मतदान केले. सेवानिवृत्त शिक्षक असलेल्या या लोकशाहीप्रेमी नागरिकाने शंभरी पार केल्यानंतरही आपल्या कर्तव्याप्रती तत्परता दाखवली. मुंबईतल्या १०३ वर्षांच्याच स्वर्णमबाई कृष्णस्वामी यांनीही स्वातंत्र्यापासून मतदान करण्याची एकही संधी दवडलेली नाही. त्यांनी यावेळी चेंबूरच्या ग्रिगेरिएस हायस्कूल केंद्रात मतदान केले. औरंगाबाद इथल्या रोहिणी निकम या ओल्या बाळंतिणीने एक दिवसाच्या बाळाला घेऊन मतदानाचा हक्क बजावला. सोलापूर जिल्ह्यातल्या माळशिरस तालुक्यातल्या श्रीपूर येथील विद्या खुळे या गरोदर महिलेने अगदी नववा महिना सुरू असताना मतदान करून आपण सुजाण नागरिक असल्याचे दाखवून दिले. औरंगाबादचे माजी सनदी अधिकारी भुजंगराव कुलकर्णी यांनी तर १९५२ ते २०१९ नॉनस्टॉप मतदानाचा हक्क बजावून एक अनोखा विक्रम प्रस्थापित केला.

**जागृतीमुळे वाढलीय मतदानाची टक्केवारी** : निवडणूक आयोग, संस्था, संघटना आणि व्यक्तींनी केलेल्या मतदार जागृतीमुळे यंदा मतदानाची टक्केवारी देशभरातच वाढली आहे. पहिल्या चार टप्प्यांमध्ये देशात ६६.५२ टक्के मतदान झाले. गेल्या ६० वर्षांत लोकसभा निवडणुकांमध्ये ६० टक्के मतदान होण्याची किमया फक्त तीन वेळा साध्य झाली आहे; परंतु २०१४ मध्ये आणि आताच्या चार टप्प्यांमध्ये ६६ टक्क्यांवर मतदान झाले आहे. जिल्हास्तरीय स्वीप समिती, चित्रपट, क्रीडा, नाट्य क्षेत्रातील सेलिब्रिटीज, सामाजिक संस्था, संघटना, रेडिओ, टीव्ही, वृत्तपत्रे, लग्नपत्रिका, शाळा, महाविद्यालये, विद्यार्थी संघटना इतकेच काय तर शासकीय रुग्णालयांमध्ये दिल्या जाणाऱ्या एमएलएसी चिठ्ठीवरही मतदान करा, असा संदेश दिला गेला. यामुळे मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत झाली.

१९५१-५२ मध्ये झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ४५.७ टक्के मतदान झाले होते. पहिलीच निवडणूक, त्यातही ८६ टक्के मतदार निरक्षर आणि मतदानाबाबत जागृतीचा अभाव यामुळे तेंव्हा ५० टक्क्यांहूनही कमी मतदान झाले. हे आजपर्यंतचे सर्वात कमी मतदान होते. १९५७ मध्ये दुसऱ्या लोकसभेसाठी किंचित जास्त म्हणजे ४७.८ टक्के मतदान झाले. १९६२ पासून

# धर्मासाठी की धर्मनिरपेक्षतेसाठी?

२००८ मधील मालेगाव बॉम्बस्फोटातील एक आरोपी साध्वी प्रज्ञासिंग भोपाळमधून निवडणूक लढवीत आहेत. आजारपणाच्या कारणाने त्या जामिनावर असताना अमित शाह यांनी, त्यांना कोर्टाने क्लीन चीट दिल्याचा जावईशोध लावला. निवडणूक अर्ज भरण्यापूर्वी साध्वींनी, 'आपल्या शापानेच हेमंत करकरेंचा मृत्यू झाला' असे विधान केले होते. हा केवळ करकरेंचा अपमान नव्हता तर देशाच्या सुरक्षेसाठी बलिदान देणाऱ्या हरेक शहिदाचा अपमान होता. साध्वींच्या या आक्षेपार्ह विधानामुळे त्यांना निवडणूक लढविण्यास बंदी घालण्याची मागणी देशभरातून झालेली असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मात्र त्यांच्या उमेदवारीचे जोरदार समर्थन केले. साध्वींची उमेदवारी म्हणजे हिंदू संस्कृतीवर दहशतवादाचा ठपका ठेवणाऱ्यांना दिलेले प्रतिकात्मक उत्तर असल्याचे मोदींनी सांगितले. राष्ट्रवादाच्या नावाखाली हिंदुत्त्वाचा गजर करणाऱ्या मोदींनी वाराणसीत अर्ज भरण्यासाठी गेल्यानंतरही धर्माचा राजकारणासाठी वापर कसा केला जातो, हेच दाखवून दिले. वाराणसीतील रोड शोनंतर त्यांनी केलेली गंगा आरती आणि उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी कालभैरवाच्या मंदिरात जाऊन केलेली पूजा म्हणजे हिंदुत्त्व जागविण्याच्या प्रयत्नातून केलेली मतदारांची भलामण होती. आपण केवळ देशाच्या विकासाचाच विचार करतो, असे जनतेची दिशाभूल करणारे विधान करतानाच विकास नको राष्ट्रवाद, असा निवडणुकीत नारा द्यायचा आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांबद्दल गरळ ओकणाऱ्यांना शाबासकी द्यायची, हा आटापिटा धर्मासाठी की धर्मनिरपेक्षतेसाठी? जीवन जगण्याची व्यापक दृष्टी देणाऱ्या धर्माला मंदिर-मशिदीत कोंडण्याचे प्रयत्न देशात सुरू आहेत. अशा अधर्मासाठी हिंसा करणे ही राष्ट्रभक्ती ठरत आहे, तर राष्ट्रासाठी प्राणार्पण करणाऱ्या करकरेंसारख्या पोलिस अधिकाऱ्यांना राष्ट्र-धर्मद्रोही ठरवले जात आहे. द्वेषभावापोटी इथे अधर्मच धर्माचा बुरखा पांघरून राष्ट्रवादाचा 'जागर' करत आहे.

मात्र दरवेळी ५० टक्क्यांहून अधिक मतदान झाले. १९६७, १९८५, १९९८ मध्ये ६० टक्के मतदान झाले. इतर लोकसभा निवडणुकांमध्ये मात्र ते सरासरी ५३ ते ५८ टक्के राहिले. २००९ मध्ये ५५ टक्के मतदान झाले. २०१४ आणि आताच्या निवडणुकीत व्यापक प्रमाणावर झालेल्या मतदार जागृतीमुळे मतदान ६६ टक्क्यांवर पोहोचले.

**सुशिक्षितच मतदानापासून दूर :** खेडोपाडी, ग्रामीण, आदिवासी तसेच नक्षलग्रस्त भागात भरीव मतदान होत असताना शहरी भागातील सुशिक्षित लोकांमध्ये मतदानाबाबत अनास्था दिसून येते. यासंदर्भात बंगळुरू आणि पुण्याचे उदाहरण देता येईल. मध्य बंगळुरू हा सर्वात उच्चभ्रू लोकवस्तीचा भाग; परंतु येथे अनुक्रमे ५४ आणि ५०.५ टक्के मतदान झाले. मात्र बंगळुरूचा बराचसा भाग जो ग्रामीण म्हणून ओळखला जातो, तेथे दणदणीत ६८ टक्के मतदान झाले. २०११ च्या जनगणनेनुसार, ८९.५६ टक्के साक्षरता असलेल्या पुण्याने ५० टक्क्यांपेक्षाही कमी मतदान केले. लोकशाहीवर, सरकारच्या कारभारावर उच्चरवात बोलणारी मंडळी बहुतांश वेळा पुण्यातीलच असते. मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यात मात्र ती कुचराई करते. नंदूरबारचे ज्येष्ठ नागरिक, महिला उन्हात रांगेने जाऊन मतदान करण्याला प्राधान्य देतात, पण पुणेकर मात्र लोकशाहीच्या पुनरुज्जीवनासाठी 'सोवळ्या'तून बाहेर यायला का-कू करतात, हे 'संस्कृती' रक्षकांचे लक्षण नव्हे.

**भाजपला मुस्लिमांप्रती आकस का? :** देशातील एकूण लोकसंख्येच्या १४.२ टक्के (१७ कोटी २० लाख) प्रमाण असलेल्या मुस्लिमांना भाजप राजकारणात फारसे महत्त्व देत नसल्याचे देशभरातील लोकप्रतिनिधींची आकडेवाडी सांगते. बिगर भाजपशासित राज्यांमध्ये ३०० मुस्लिम आमदार आहेत, तर २९ पैकी १९ राज्यांमध्ये सत्ता असलेल्या भाजपची देशभरातील आमदारांची संख्या १४१८ आहे. यामध्ये मुस्लिम आमदार केवळ ६ आहेत. त्यातही उत्तरप्रदेशातील दोघे विधानपरिषद सदस्य आहेत. यापैकी मोहसिन राजा हे राज्यमंत्रिमंडळात आहेत.

२०१४ मध्ये लोकसभेत २३ मुस्लिम खासदार निवडून आले होते. मात्र यामध्ये भाजपचा एकही नाही. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, माकप, अण्णाद्रमुक, अखिल भारतीय संयुक्त लोकशाही आघाडी, राष्ट्रीय जनता दल, लोकजनशक्ती पार्टी अशा बहुतांश राजकीय पक्षांनी संसदीय राजकारणात मुस्लिमांना प्राधान्य दिले; परंतु भाजपला मात्र राजकीय क्षितिजावर सामाजिक संतुलन राखण्याची गरज वाटली नाही. केंद्रात अल्पसंख्याक व्यवहार व संसदीय कामकाज राज्यमंत्री असलेले मुक्तार अब्बास नकवी हे भाजपचे एकमेव मुस्लिम खासदार आहेत, तेही राज्यसभा सदस्य. यापूर्वी नजमा हेपतुल्ला राज्यसभा सदस्य आणि अल्पसंख्याक व्यवहारमंत्री होत्या. पंच्याहत्तरी ओलांडलेल्या नजमा हेपतुल्ला आता जमिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाच्या कुलपती आणि मणिपूरच्या राज्यपाल आहेत. या लोकसभा निवडणुकीत भाजपने केवळ ४ मुस्लिमांना उमेदवारी दिली आहे. देशात ९५ ते १०० टक्के मुस्लिम लोकसंख्या असलेले चार लोकसभा मतदारसंघ आहेत. शिवाय ७० ते ७५ टक्के लोकसंख्येचा एक, ६५ ते ७० टक्के लोकसंख्येचे ३, ६० ते ६५ टक्के लोकसंख्येचे २, ५० ते ५५ टक्के लोकसंख्येचे २ असे १५ लोकसभा मतदारसंघ मुस्लिमबहुल आहेत. तरीही भाजपने देशभरातून केवळ चारच मुस्लिमांना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रीय राजकारणापासून मुस्लिमांना दूर ठेवण्याच्या भाजपच्या या संकुचित दृष्टिकोनामुळेच राजकीय क्षितिजावरून मुस्लिम गतीने अदृश्य होत असल्याचे

निरीक्षण माध्यम तज्ज्ञांनी नोंदवले आहे.

तसे पाहिले तर, मुस्लिमांच्या विकासाला चालना देण्याऐवजी त्यांची कोंडी करण्याचेच प्रयत्न मागील पाच वर्षांत झाले. मुस्लिमांविरूद्धच्या हिंसाचाराला पाठीशी घालणे, झुंडशाहीचे तुष्टीकरण करणे, भाजप नेत्यांची मुस्लिमांविरोधातील वक्तव्ये यामागे मुस्लिमांनी भीतीच्या छायेखाली राहावे, हाच हेतू होता. २०१७ मध्ये मोहसिन शेख, अखलाक जुनेद आणि पेहलू खान यांचे खून करण्यात आले तेव्हापासून या समाजाने भीती दूर सारून स्वतःला सशक्त बनवण्याचे प्रयत्न सुरू केले. अनेक मुस्लिम गट आणि व्यक्ती समाजाच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्नशील आहेत.

**बत्तीस दिवसांत देशभरात ३ हजार १७७ कोटींचा ऐवज जप्त :** २६ मार्च ते २६ एप्रिल या ३२ दिवसांच्या काळात देशभरात सुमारे ३ हजार १७६ कोटी ७३ लाख रुपयांपेक्षा अधिकची रोख रक्कम, दारू आणि सोने जप्त करण्यात आले. यामध्ये सुमारे ७५२ कोटी ९२ लाख रुपयांच्या रोख रकमेचा समावेश आहे. ही रक्कम २०१४ मध्ये जप्त करण्यात आलेल्या एकूण २९९.९४३ कोटी रुपयांपेक्षा १५१.०२ टक्के अधिक आहे.

रोखीसह ऐवज जप्तीमध्ये तामिळनाडू राज्य आघाडीवर आहे. या राज्यात २६ एप्रिलपर्यंत ९ अब्ज ३५ कोटी ९६ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला होता. त्याखालोखाल गुजरातमध्ये ५ अब्ज ४५ कोटी ४९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर दिल्ली ३ अब्ज ९५ कोटी ७१ लाख, पंजाब २ अब्ज ३६ कोटी ८१ लाख, उत्तरप्रदेश १ अब्ज ७७ कोटी ९२ लाख, महाराष्ट्र १ अब्ज ३१ कोटी ४५ लाख, कर्नाटक ८८ कोटी २८ लाख, तेलंगणा ७९ कोटी एक लाख आणि पश्चिम बंगालमध्ये ७६ कोटी ५ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.

सोन्या-चांदीचे दागिने जप्तीमध्ये तामिळनाडूने खूपच मोठी मजल मारली आहे. या राज्यामध्ये ७०८.७१ कोटी रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले. त्याखालोखाल उत्तरप्रदेशात ७१.५९ कोटींचे दागिने जप्त केले. यात तिसरा क्रमांक महाराष्ट्राचा लागतो. येथे ४५.४७ कोटी रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले. आंध्रप्रदेशात ३५.२४ कोटींचे आणि पंजाबमध्ये २१.५७ कोटी रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले. निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या माहितीनुसार २६ एप्रिलपर्यंत देशभरात रोख आणि मुद्देमाल (दारू, सोने, चांदी इत्यादी) मिळून ३,१७६.७३ कोटींचा ऐवज जप्त करण्यात आला. दररोज १०० कोटींपेक्षाही अधिकच्या रकमेचा ऐवज जप्त केल्याचेही आकडेवारी सांगते. केवळ बत्तीस दिवसांत ६१,९०३.९३ किलो अमली पदार्थ जप्त केले. ते ढोबळमानाने १२ प्रौढ पुरूष अशियायी हत्तींच्या वजनाएवढे भरतात. याच काळात १.२६ कोटी लिटर दारू जप्त केली असून या दारूने ऑलिंपिकचे जवळपास पाच जलतरण तलाव भरतात. जप्त केलेली जवळपास ३५० कोटींची रोख रक्कमही २०११ मध्ये शिर्डी येथेल श्री साईबाबा मंदिराला देणगीपोटी आलेल्या रोख रकमेपेक्षा अधिक आहे.

या निवडणुकीत जप्त केलेल्या एकूण ऐवजाची किंमत ही २०१४ च्या लोकसभा निवडणुकीवर भारत सरकारने केलेल्या खर्चाच्या रकमेच्या ८२.०७ टक्के आहे. २०१४ च्या निवडणुकीवर ३,८७०.३४ कोटी रुपये खर्च झाले होते.



**अंमलबजावणी संचालनालयाने महाराष्ट्रात ४४.२२ कोटी रोख रक्कम, ४५ कोटी रुपयांचे सोने आणि दागिने, २० कोटीची दारू आणि ६.३० कोटी रुपयांचे मादक पदार्थ जप्त केले.**

रोख रक्कम, दारू, अमली पदार्थ, सोने-चांदी आदी ऐवज देशात दररोज जप्त केला जात आहे. २६ एप्रिलपर्यंत जप्त केलेल्या एकूण ऐवजात ७५ टक्क्यांपेक्षा जास्तीचा वाटा हा तामिळनाडू, गुजरात, दिल्ली, आंध्रप्रदेश आणि पंजाब या पाच राज्यांचा आहे.

**गुजरात, पंजाब, दिल्लीतून अमली पदार्थांची अधिक जप्ती :** आयोगाकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुजरात, पंजाब आणि दिल्लीमध्ये अमली पदार्थ मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आले. तामिळनाडूमधील राजकीय पक्षांनी मतदारांना प्रभावित करण्यासाठी सोने, चांदी आणि इतर मौल्यवान वस्तूंचे वाटप केले.

आंध्रप्रदेशात मात्र रोख रक्कम वाटप करण्यावर भर असल्याचे आयोगाकडून सांगण्यात आले. २६ मार्च ते २६ एप्रिलदरम्यान रोख आणि वस्तू असा ५४५ कोटी ४९ लाख रुपयांचा ऐवज गुजरातमध्ये जप्त करण्यात आला; परंतु या रकमेतील जवळपास ९६ टक्के रक्कम (५२४ कोटी ३४ लाख रुपये) ही जप्त केलेल्या अमली पदार्थांचीच आहे. राष्ट्रीय राजधानी दिल्लीत ३९५ कोटी ७१ लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला. यातील ८५ टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम अमली पदार्थांमधून वसूल होते. यातील बहुतांश साठा लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाच्या एकदिवस अगोदर म्हणजे १० एप्रिल रोजी जप्त करण्यात आलेला होता, हे विशेष. पंजाबमध्ये १८१ कोटी ५७ लाखांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. अमली पदार्थ बहुतांश गुजरात, दिल्ली आणि पंजाब या राज्यांमध्ये जप्त करण्यात आलेले असले तरी त्याच्या तस्करीत आघाडीवर असलेली ही राज्ये नाहीत, याची येथे नोंद घेणे गरजेचे आहे. अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रात १४,८७७ किलो मादक पदार्थ जप्त केले. मध्यप्रदेशात १३,७८० किलो तर उत्तरप्रदेशात १९,४०९ किलो मादक पदार्थ जप्त करण्यात आले. ●●●

# भारतीयत्व म्हणजे मानवी न्याय



९ वे अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन नुकतेच अमरावती येथे पार पडले. संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांच्या अध्यक्षीय भाषणाचा दुसरा भाग येथे देत आहोत. **– संपादक**

**व्यवस्था** म्हणजे काय? तिचे स्वरूप आणि पद्धती सत्तेच्या गरजेप्रमाणे कशी बदलते? व्यवस्थापरिवर्तन म्हणजे काय? व्यवस्थापरिवर्तनाचे तत्त्वज्ञान कोणते? ते आपल्याकडून कोणती अपेक्षा करते? एकत्र येणे सर्वच अन्यायग्रस्तांच्या हिताचे कसे आहे? हे कळले, होणाऱ्या अन्यायाचा अर्थ आणि आशय कळला की माणसे क्रमाने आपल्या व्यवस्थादत्त चौकटी फेकत जातात. त्यांच्या एकत्र येण्याच्या मार्गातील कुंपणे नष्ट करत जातात. समन्यायाच्या मळ्याला कोणतेही कुंपण पडणे विघातक असते हे सर्वच अन्यायग्रस्तांना कळत जाते आणि तपशिलाचा पराभव करत माणसे साध्याच्या शिखरावर पोचतात. विषमतारहित विविधतेने मोहोरत राहतात. इथे त्यांना सर्वच उजेडांचा महोत्सव सुरू झाल्याचा सौंदर्यानुभव येतो. या शिखराला आपण भारतीयत्वाचा मूल्यकोश किंवा मानवीन्याय म्हणू!

'भारतीयत्व' या संकल्पनेचा अर्थ 'मानवी न्याय' हाच आहे. भारतीयत्व हा मानवी जीवन सतत उन्नयनशील ठेवणाऱ्या वैश्विक मूल्यांचा एक कोश आहे. भारत हे आपल्या देशाचे नाव आहे आणि ते केवळ एका भूखंडाचे नाव नाही. पृथ्वीच्या पाठीवरील एखाद्या विवक्षित भूभागाचे वा जमिनीच्या काही क्षेत्रफळाचे केवळ ते नाव नाही. भारत हे मानवी जीवनाला सतत उज्ज्वल करीत राहणाऱ्या महान मूल्यप्रबंधाचे नाव आहे. भारताच्या याच मूल्यमयतेच्या महानतेचा निर्देश आपण भारतीयत्व या संकल्पनेने करतो.

भारतीयत्व ही एक मूल्यपरंपराही आहे. ती आदर्श मूल्यांचे प्रतीक म्हणून भारताच्या संविधानात मांडली असली तरी ती भारतात सिंधूसंस्कृतीच्या काळापासून नांदत आलेली आहे आणि ती आजवर अधिकच काटेकोर आणि अर्थसुंदर होत आलेली आहे.

मुळात भारतात सिंधूसंस्कृती होती. तिचा काळ इ.स.पूर्व अडीच ते तीन हजार वर्षे मानला जातो. ही संस्कृती विकसित आणि नागरसंस्कृती होती. या काळात भारताबाहेरच्या जगात इजिप्शियन आणि मेसोपोटेमियन अशा संस्कृती अस्तित्वात होत्या. इ.स.पूर्व १५०० ते २००० च्या सुमारास युरेशियाच्या कझाकिस्तान या भागातून आर्य इथे आले. संस्कृत भाषा आणि यज्ञ त्यांच्यासोबत इथे आले. आर्य हे मूळ भारतीय निवासी नव्हते. ते येण्यापूर्वी इथे हडप्पा किंवा सिंधू संस्कृती होती. ही संस्कृती इहवादी होती. तिच्यात वेगवेगळे व्यवसाय करणारे लोक होते. पण जाती वा वर्ण नव्हते. वर्णसंस्था आर्यांनी भारतात आणली आणि आर्यांचे चिरंतन अस्तित्व ब्राह्मण म्हणून प्रस्थापित करण्यासाठी तिला कर्मविपाकाच्या सूत्रात बांधले. हे सूत्र खोटे आहे. ते कोणत्याच तर्कात बसत नाही. पण या सूत्राने अपरिवर्तनीय विषमताही निर्माण केली आणि शोषणही निर्माण केले. वेदनिर्मितीचा काळ इ.स.पूर्व १२०० वर्षे मानला तर इ.स. पूर्व आठशेच्या सुमारास वैदिकांच्या वर्णसंस्थेची समाजरचना प्रत्यक्षात येऊ लागली होती, असे म्हणता येते. हा काळ महावीर वा बुद्धापूर्वीचा सामान्यतः दीडशे-दोनशे वर्षांचा आहे. म्हणजे इ.स.पूर्व हजार वर्षांआधी भारतात वर्णसंस्था नव्हती. तर्कतीर्थांनी 'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी चातुर्वर्ण्याची कल्पना वेदातली आहे' असे (वैदिक संस्कृतीचा विकास : १९७२, प्रस्तावना पृ.७) म्हटले आहे. म्हणजे वेदांपासून इथे चार वर्णांचा समाज सुरू झाला. तो वैदिकांनी सुरू केला. हे चार वर्ण वैदिकांनी पूर्वजन्मीच्या खोट्या कल्पनेशी बांधले आणि कर्मविपाक नावाची वर्ण-जाती चिरंतन ठरवणारी फसवणूक इथे सुरू केली. ब्राह्मण या वर्णाचे वर्चस्व वैदिकांनी निर्माण केले. चातुर्वर्ण्याच्या वैदिक धर्माला म्हणूनच ब्राह्मणधर्मही म्हटले जाते. मूळ भारतीय निवासी नसलेल्या आर्यांनी म्हणजे त्यांच्या वसाहतवादाने इथे वर्णसंस्था आणि यज्ञसंस्था आणली आणि परलोकाची व स्वर्ग-नरकाची कल्पनाही आणली.

याचा अर्थ वेदपूर्व काळात इथे निखळ इहवादी संस्कृती होती. ती श्रमिकांची आणि कष्टकऱ्यांची संस्कृती होती. तिच्यात वर्णसंस्था, यज्ञसंस्था नव्हती. पृथ्वीच्या पाठीवरचेच निखळ मानवी जीवन जगणारी ही सिंधू संस्कृतीमधील नागवंशाची वा द्रविड लोकांची संस्कृती होती. आदिसांख्य, लोकायत ही निधर्मी, इहवादी, निसर्गमनस्क तत्त्वज्ञाने त्यांची तत्त्वज्ञाने होती.

महावीरांपूर्वीच्या तेवीस तीर्थंकरांची आणि बुद्धापूर्वीच्या सत्तावीस बुद्धांची मिथके मांडली गेली आहेत. ही मिथके अवतार सूचित करीत नाहीत. कारण वेदपूर्व सिंधू संस्कृतीत अशी आध्यात्माची, अवतारांची वा परलोकाची कल्पनाच नाही. तीर्थंकर वा बुद्धपूर्व बुद्ध ह्यांच्या निर्देशाचा अर्थ इहवादी संस्कृतीचे भरणपोषण करणाऱ्या विवेकी प्रबोधनकारांचा वर्ग त्या काळात होता, असा आहे. सिंधू संस्कृतीमधील नाग समाजामध्ये ऐहिक नीती होती. ती धर्मातीत, ईश्वरातीत आणि सौहार्दाची नीती होती आणि भारताबाहेरील इजिप्शियन आणि मेसोपोटेमियन या विकसित संस्कृतींप्रमाणे तीही भौतिक आणि नैतिकदृष्ट्या समृद्ध संस्कृती होती. हिलाच आपण हडप्पा आणि मोहेंजोदारोची संस्कृती म्हणतो.

आदिसांख्य, लोकायत, महावीरपूर्व तीर्थंकर, बुद्धपूर्व बुद्ध, महावीर आणि बुद्ध यांचा जन्म याच नागवंशात झाला होता. इ.स.पूर्व काळात ही नागद्रविडांची सिंधूसंस्कृती नांदत होती. इ.स.पूर्व हजारपासून तिच्या विरोधात काम करणारी विषमतेची आणि ब्राह्मणवर्चस्वाची वैदिक संस्कृती सुरू झाली. या पुढल्या काळात नाग-द्रविड संस्कृतीचे नेतृत्व महावीर, लोकायत आणि बुद्ध यांनी केले. सिंधू संस्कृतीमधील इहवादी समाजरचनेची पायाभूत तत्त्वे या सर्वांच्याच चिंतनाच्या केंद्रस्थानी होती. सिंधूसंस्कृतीमधील ऐहिकतेविरोधात, समतेविरोधात आणि निधर्मीपणाच्या विरोधात सुरू झालेल्या वैदिक धर्माविरूद्ध आणि संस्कृतीविरूद्ध महावीराने आणि बुद्धाने मूलगामी संघर्ष सुरू केला. या सर्व काळात आधीचे आदिसांख्य, लोकायत हेही त्यांच्यासोबत होतेच. इहवाद-परलोकवाद, वर्णसंस्थाविरोध-वर्णसंस्था, भौतिक नीती-अध्यात्म असा हा संग्राम सुरू झाला. हा निधर्मीपणा विरूद्ध धर्म असाच संघर्ष होता. सिंधूसंस्कृतीच्या कोणत्याही तत्त्वज्ञाने धर्म स्थापन केला नाही. कारण त्यांना समाजाला स्थितीशील करणे मान्य नव्हते. समाज खुला आणि पुनर्रचनाशील असावा यासाठी त्यांचे प्रयत्न होते. म्हणून त्यांनी धर्म स्थापन केला नाही. वैदिक आणि भारतीय या दोन परस्परविरोधी परंपरांमधला हा संघर्ष आहे. याचा अर्थ हा दोन मूल्यसरणींमधला किंवा दोन जीवनपद्धतींमधला संघर्ष आहे.

इ.स.पूर्व सातव्या-आठव्या शतकात वैदिक धर्माची म्हणजे वर्णधर्माची म्हणजे ब्राह्मण या वर्णाचे सर्वतोपरी महत्त्व प्रस्थापित करणाऱ्या धर्माची स्थापना झाली. हा काळ बुद्धापूर्वीचा किमान दीडशे-दोनशे वर्षांचा आहे. ब्राह्मण वर्चस्वासाठी आटापिटा करणाऱ्या या वैदिक धर्माला इ.सनाच्या १००० वर्षांच्या नंतर हिंदू हा शब्द चिकटला. हा काळ चक्रधरांच्या, संत नामदेवांच्या आणि चोखामेळ्यांच्या पूर्वीचा काळ आहे. हे सर्व लोक १२व्या १३ व्या शतकात येतात. हिंदू या शब्दासंबंधी राजारामशास्त्री भागवत त्यांच्या (लेखसंग्रह खंड-५, संपादकः दुर्गा भागवत, वरदा बुक्स, पुणे, पृ.२६१ ते २६३) संशोधनात म्हणतात- 'हिंदू' शब्दाचा अर्थ फारसीत गुलाम होतो. हिंदू म्हणजे 'सिंधू' (नदी वाहणारा उत्तरेकडचा मुलुख), 'सिंद-सिंध व हिंदू' हे दोन्ही शब्द सिंधू शब्दापासून आहेत; इतकेच की 'हिंदू' शब्द केवळ मुसलमानांनी जन्मविलेला असून त्यांच्यापासून पुढे इकडच्या लोकांनी उचललेला आहे. 'हिंद' व 'हिंदू' हे शब्द सख्खे बंधू होत. दोघांनाही जन्मविणारे मुसलमान होते. गझनीकर महमूद वगैरे तूर्क मंडळी पहिल्याने देशावर किंवा या भरतखंडावर स्वारी करू लागली. ती सगळी जातीने तूर्क असून फार्सी भाषा समजणारी व दर्बारी बोलणारी होती. या हिंद पलीकडच्यांनी हिंद अलीकडचे इतके लोक कैदी करून नेले व गुलाम म्हणून विकले की 'हिंदू' शब्द अफगाण लोकात 'गुलाम'चा वाचक होऊन राहिला; हा शब्द रूम प्रांती म्हणजे आशिया मायनरमध्ये गेला. इ.स. १४ शतकातील जलालुद्दीन रूमीने तो आपल्या काव्यात दाखल करून ठेवला आहे. 'हिंदुस्थान' म्हणजे 'हिंदु'चे म्हणजे 'मुसलमानांची गुलामगिरी करणाऱ्यांचे स्थान'. हिंदू धर्म म्हणजे 'मुसलमानांची गुलामगिरी करणाऱ्यांचा धर्म' याप्रमाणे 'हिंदू', 'हिंदू धर्म' या दोन शब्दांचे रहस्य आहे.

जर 'हिंदू' शब्दच संस्कृत सारस्वतात कोठेही येत नाही तर हिंदू-धर्म शब्द तरी कोठून येणार? 'हिंदू' शब्द इ.स. १००० पुढे जन्मलेला आहे. आज हा शब्द ९०० वर्षांहून जास्त प्राचीन नाही. 'हिंदू' शब्द जन्मास आल्यानंतर पुढे 'हिंदू-धर्म' शब्द जन्मला. तो ९०० वर्षांचाही म्हणता येत नाही.'' हे लक्षात घेतले तरी वैदिक धर्मालाच वा ब्राह्मण धर्मालाच हिंदू धर्म म्हणण्याची प्रथा पडली हे खरे आहे, असेच म्हटले पाहिजे. कारण त्या दोघांचीही तात्त्वज्ञानिक आणि व्यावहारिक वर्तनाविषयीची आशयसूत्रे समानच आहेत. ही बाब महत्त्वाची आहे. देवदैवते तीच, स्वर्ग-नरकाच्या, परलोकाच्या, वर्णांच्या, जातींच्या आणि त्यांच्या पावित्र्यासंबंधीच्या कल्पना सारख्याच आहेत. वेदांना, त्यातील तत्त्वज्ञानांना संत प्रमाण मानतात. पुढे हिंदूही मानतात, आजवर मानतात. प्रबोधन झाले, मार्क्सवादी चळवळ झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ आहे. जागतिकीकरणाचे वादळ उठले आणि स्थिरावलेही, पण हिंदू म्हणवणाऱ्यांच्या मनातील वैदिक श्रद्धा कायम आहेत. वरील सर्वच गोष्टी घडल्या, आधुनिकता आली, पण अनेक मराठी साहित्यिकांच्या प्रतिभा वैदिक जीवनदृष्टी पवित्र मानणाऱ्या हिंदू धर्मातच अडकून आहेत. हे जसे महानगरीय, नगरीय साहित्यिकांच्या संदर्भात म्हणता येते, तसे गावगाड्यातील प्रतिभांच्या संदर्भातही म्हणता येते. शहरगाडा आणि गावगाडा या दोन्ही संरचनांची भाषा वेगळी भासली तरी मनांचे कूळ एकच आहे.

आपले एक महान क्रांतिकारक आणि शोषक-शोषित यांच्या वर्गीय तत्त्वज्ञानातील निकराच्या संघर्षाची आग उधळणारे जोतीराव फुले इ.स. १८८९ च्या एप्रिलमध्ये लिहून पूर्ण केलेल्या सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकात म्हणतात, ''कारण मोघम नाव हिंदूंचे आणि उपभोग घेणारे एकटे ब्राह्मण.'' (संदर्भ : म.फुले समग्र वाङ्मय, आवृत्ती पाचवी, १९९१, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.४९३) तर असा हा ब्राह्मणहितसंबंध आणि बाकीचे बहुसंख्य लोकांचे हितसंबंध यांच्यातील संघर्ष आहे आणि तो परस्परविरोधी विचारसरणींशी संबंधित आहे.

नुसता शोषक-शोषित हा संघर्ष मोघम होतो. शोषकांच्या तत्त्वज्ञानाविरूद्ध शोषितांनी निर्माण केलेल्या तत्त्वज्ञानाचा संघर्ष व्हावा लागतो. शोषकांचे-ब्राह्मणवादी वा भांडवली तत्त्वज्ञान प्रमाण मानायचे आणि ब्राह्मणांच्या आणि भांडवलदारांच्या शोषणाविरूद्ध आंदोलन चालवायचे हे आपल्याकडे सतत होताना दिसते. अमेरिकेत काळ्यांचा गोऱ्यांविरूद्ध संघर्ष असतो पण गोऱ्यांचे तत्त्वज्ञान आणि काळ्यांचे तत्त्वज्ञान एकच असते. त्यांचा धर्म एकच असतो. या सर्व गोष्टी जमिनीवरची हरळी कापण्यासारखे पण जमिनीतल्या हरळीची मुळे कायम ठेवण्यासारखेच असते. हरळी परत उगवण्याच्या शक्यता म्हणजे मुळे तुम्ही कायमच ठेवता. म्हणजे तुमच्या पिढीपुरते शोषण काही काळासाठी संपल्यासारखे वाटले तरी तुम्ही कायम ठेवलेल्या मुळांमधून पुन्हा शोषणाची हरळी उगवेल आणि तुमच्या पुढच्या पिढ्यांचे शोषण होईल. हा बेस कायमच ठेऊन सुपरस्ट्रक्चर केवळ बदलण्याचा मुद्दा असतो. झाडाच्या फांद्या तोडून प्रश्न मिटत नाही. तुम्हाला वाटते त्यामुळे वास्तव बदलेल पण तो भ्रम असतो. फांद्या परत येतात. मागच्या पानावरची कथा पुन्हा पुढच्या पानावर सुरू होते. त्यामुळेच शोषण ही वस्तुस्थिती ज्या तत्त्वज्ञानाच्या पायावर उभी असते, ती वस्तुस्थिती कायमसाठी नाकारण्यासाठी तिचे पायाभूत तत्त्वज्ञान, त्या तत्त्वज्ञानांनी घडवलेली मने, या मनांवर संस्कार करणाऱ्या सर्व गोष्टी बदलाव्या लागतात. शोषण आणि शोषणाचे तत्त्वज्ञान हा सर्व दुष्ट खेळच नाकारावा लागतो. हे व्हायला हवे असते. क्रांतीसाठी हे आवश्यक असते. पण माणसे अन्याय नाकारण्यापर्यंतही येत नाहीत. त्यांच्या मनाची धार्मिक घडणच त्यांना तसे करू देत नाही. पण अन्याय नाकारण्यासाठी एखादवेळी माणसे पुढे आली तरी अन्यायाच्या मुळाशी असलेले तत्त्वज्ञान नाकारणे माणसांना जमत नाही. असे तत्त्वज्ञान बदलण्याच्या गोष्टी पुढे आल्या की माणसे नाराज होतात. आपल्या परिवर्तनाच्या चळवळींचा दुबळेपणा या स्थितीशी निगडित आहे. धर्मांनी दिलेल्या वेगवेगळ्या विघटनशील अस्मितांच्या खुंट्यांना माणसे स्वतःला टांगून घेतात. त्यामुळे परिवर्तनाच्या चळवळीचा वा क्रांतीचा जीव आपल्याकडे सततच टांगणीला लागलेला असतो.

अधिकाधिक उज्ज्वल जीवन जगू इच्छिणाऱ्या आणि सतत प्रवाही राहू इच्छिणाऱ्या माणसाला आणि सतत नवनवोन्मेषशाली जगणे जगू इच्छिणाऱ्या साहित्यिकाला त्याची भावनिक आणि वैचारिक परंपरा कळायला हवी. सर्वसमावेशकतेशी म्हणजे आंतरराष्ट्रीयतावादी असीमतेशी आपल्याला आपले मन जोडता यायला हवे. वर्गकेंद्री, जातकेंद्री, धर्मकेंद्री, प्रदेशकेंद्री आणि लिंगभावकेंद्री परंपरांनी आपल्या मनांना वेगवेगळ्या पिंजऱ्यात डांबलेले आहे. त्यामुळे आपण 'माणूस' या निरुपाधिक अवकाशाशी नातेच प्रस्थापित करू शकत नाही. त्यामुळे आपल्यात परस्परांवर दृढ विश्वास ठेवणारे सौहार्द निर्माण होऊ शकत नाही. त्याचे कारण हे पिंजरे! विलगीकरणाचे तुरुंग किंवा आपल्या दौर्बल्याची चिरंतनता जपणारे कोंडवाडे!

असे कोंडवाडे निर्माण करणारी परंपराही आपल्याकडे



श्रमपरंपरा उरात वागवणाऱ्या भारतीय जीवनशैलीने श्रमिकांचे विभाजन केले नाही.

आहे आणि माणसांना मुक्त करणारी, स्वातंत्र्याचे पंख देणारी परंपराही आपल्याकडे आहे. जातसत्ताक, वर्गसत्ताक, धर्मसत्ताक, पुरुषसत्ताक, अंधश्रद्धासत्ताक, असत्यसत्ताक, देवदैवसत्ताक, अन्यायसत्ताक, विषमतासत्ताक, शोषणसत्ताक आणि फसवणूकसत्ताक अशी सर्व सत्ताके स्त्रीपुरुषांमधील विवेकी संबंधांचा आणि मानवी सौहार्दाचा कचराच वा राखच करून टाकत असतात. या सर्व सत्ताकांचे जतन आणि संवर्धन करणारी एक परंपरा आपल्याकडे आहे आणि या सर्व सत्ताकांचा अंत करण्याची क्षमता असलेली, ही सर्व सत्ताके उद्ध्वस्त करून सुंदर, नितळ, निरामय, विज्ञानशील आणि निखळ इहवादी माणूसपणाचा महोत्सव सिद्ध करू शकणारी वैचारिक आणि भावनिक परंपराही आपल्याकडे आहे. ही परंपरा जगात 'भारतीय' म्हणून ओळखली जाते.

ही भारतीय परंपरा एतद्देशीय आहे. ती सिंधू संस्कृतीपासून सुरू होते आणि आदिसांख्य, लोकायत, महावीर, बुद्ध, अशोक, ब्रुहद्रथ, अश्वघोष, फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान असा उजेडाचा, मानवी सौहार्दाचा प्रवास करीत आपल्यापर्यंत येते.

ही परंपरा डॉग्मॅटिक नाही तर प्रॅग्मॅटिक आहे. ती सतत प्रवाही आणि पुनर्रचनाशील आहे. ती विज्ञानशील आहे. याचा अर्थ ती बुद्धिप्रामाण्यवादी वा विवेकवादी आहे. ही परंपरा सर्वसमावेशक आहे. कुणाचेही वर्चस्व वा कोणाचीही अंकितता या परंपरेच्या कोणत्याही अनुच्छेदात बसत नाही. ही कायम खुली, स्वतःला अद्ययावत करीत आणि नवनवे उन्मेष प्रकट करीत जाणारी आणि माणसाला कुठेही न थांबणारे नवल मानणारी, माणसालाच जीवनाचे, तत्त्वज्ञानाचे आणि साहित्याचे केंद्र मानणारी परंपरा आहे.

ही परंपरा स्वतःला प्रथमही, शेवटीही आणि केव्हाही केवळ भारतीयच माना आणि म्हणा असा थळीवो चा असीम धडा देणारी



**समाज खुला राहील, परिवर्तनशील राहील याची काळजी या जीवनशैलीने घेतली.**

परंपरा आहे. ही परंपरा मूल्यतःच मग वैश्विकसंदर्भात स्वतःला वैश्विक मानायला सांगणारी आणि स्वतःला आंतरराष्ट्रीयत्वात गुंफायला सांगणारी सर्वव्यापी परंपरा आहे. या परंपरेला बर्लिनच्या कोणत्याही भिंतीच नाहीत. हे असीम अवकाशाचेच चारित्र्य आहे.

ही नियतीवादी वा प्राक्तनवादी परंपरा नव्हे. तिने माणसालाच परम केले. त्याला सर्वेसर्वा केले आणि हा माणूसच माणसांच्या राज्याच्या प्रस्थापनेसाठी आपली बुद्धी पणाला लावतो आहे. "I know of nothing finer, more complex, more interesting than man, he is everything." असे तुम्हा आम्हा सर्वांचाच आदरणीय साहित्यिक मॅक्झिम गॉर्की म्हणाला होता. आपली भारतीय परंपराही अशीच पूर्णतः इहवादी आहे आणि तिने माणसालाच सिंधू संस्कृतीपासून आजवर 'एव्हरीथिंग' मानले आहे. ही विज्ञानशील म्हणजे प्रयोगशील बौद्धिक आणि भावनिक परंपरा आहे आणि ती नियतीचाही पराभव करणारी परंपरा आहे. DNA आणि जनुके म्हणजे नियतीचे वा प्राक्तनाचेच प्रस्ताव आहेत. प्रत्येकच माणसाने कसे जगावे याची धर्माने, ईश्वराने ठरवून दिलेली विषयपत्रिका म्हणजे नियती. या विषयपत्रिकेत बदल करण्याचे स्वातंत्र्यही माणसाला नाही वा तशी शक्तीही त्याच्यात नाही. माणसाच्या नशिबाने त्याच्या ठरवून दिलेल्या जगण्यात तिळमात्रही बदल करण्याची कोणती तरतूद ठेवलेली नाही. माणूस या नियतीनुसार आणि तिच्या नियमानुसार यंत्रवत जगण्यासाठीच केवळ आहे. तो नवीन नियमही जन्माला घालू शकत नाही. ठरवून दिलेल्या नियमाबाहेरचे जगूही शकत नाही. ही नियतीवादी परंपरा वैदिक वा ब्राह्मणी परंपरेचीच उपपरंपरा आहे.

भारतीय परंपरा अशी कोणती नियती, दैव वा प्राक्तन मानीत नाही. याचा अर्थ, ती डीएनए आणि जनुकांचीही दादागिरी मानीत नाही, असा आहे. स्टीफन हॉकिंग हा आपल्या बौद्धिक परंपरेने परम आदर बाळगावा असा शास्त्रज्ञ आहे. त्याने माणूस आपल्या बुद्धीशक्तीच्या बळावर डीएनए आणि जनुके यांना आव्हान देऊ शकतो आणि बदलू शकतो असे म्हटलेले आहे. कपिलांनी, चार्वाकांनी, बुद्धांनी, सम्राट अशोकाने, जोतीराव फुल्यांनी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या डीएनएचा आणि जनुकांचा पराभवच केला. माणसांना बोन्साय करणाऱ्या वैदिक परंपरेने नेमून दिलेले डीएनए वा जनुके वा नियती आपल्या महानायकांनी ठोकरून लावली. त्यांनी त्यांच्यावर लादलेल्या नियतीचा, जनुकांचा आणि डीएनएचा दारुण पराभवच केला.

भारतीय मूल्यपरंपरेचा माणसाच्या प्रज्ञेवर आणि त्याच्या बौद्धिक साहसावर अपार विश्वास आहे. ही या माणसाची दुर्दम्य साहसशीलता भारतीय परंपरेला अपार गौरवाची गोष्ट वाटते. आपली ही भारतीय चिंतनपरंपरा सेक्युलर म्हणजे इहवादीच आहे. ही परंपरा श्रेणीविहीन मानवी संबंधांची वा बंधुतामय नीतीची प्रवर्तक जीवनशैली आहे. ईश्वराऐवजी भारतीय तत्त्वज्ञांनी ही नीतीच प्रमाण मानली. मानवाला ईश्वरावलंबी करण्याऐवजी त्यांनी मानवाला स्वतःवलंबी केले. हा ध्येयप्रबंध वैदिकांच्या विरोधातच होता. भारतीय तत्त्वज्ञांनी जगाला सर्वप्रथम बुद्धिप्रामाण्यवादी, मुक्ततत्त्ववादी असे मानवी सौहार्दाचे तत्त्वज्ञान दिले. त्यांची समता आणि बंधुता ही मूल्ये मोकाट नाहीत. त्यांच्यावर भगिनीत्वाचे आणि बंधुत्वाचे नियंत्रण आहे. म्हणून समतेला स्वातंत्र्यापासून धोका संभवत नाही आणि स्वातंत्र्याला समतेची भीती वाटत नाही. एका ठिकाणाला चिकटून राहू नका. नवनव्या आव्हानांना आणि बदलांना सामोरे जा. त्यांच्याशी सामना करताना त्यांच्यावर मात करता येईल अशी स्वतःची सतत पुनर्रचना करा. प्रॅग्मॅटिस्ट व्हा. परस्परांना उपकारक ठरणारे सर्वांचे हित महत्त्वाचे आहे. त्यासाठी आवश्यक त्या विधायक साधनांची सतत निर्मिती करा, असे भारतीय तत्त्वज्ञांचे तत्त्वज्ञान सांगते.

ही भारतीय परंपरा वैज्ञानिक दृष्टीवर पोसलेली आहे. या परंपरेने गणराजे किंवा लोकशाही पुरस्कारिली. कुठल्याही प्रकारच्या, कुठल्याही क्षेत्रातील वर्चस्वाला आणि वर्चस्वाने, हुकूमशाहीने नियंत्रित होणाऱ्या मानवी व्यवहारांना तिचा विरोधच आहे. फॅसिझम आणि परलोकवादाचा अख्खा प्रकल्पच या भारतीय परंपरेला मान्य नाही. चातुर्वर्ण्य नावाचे वैदिकांचे अर्थशास्त्र, नीतीशास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्रही कर्मविपाकावर म्हणजे विषमतेवरच उभे होते आणि कर्मविपाक तर शोषितांना शोषकांचा पत्ता लागू नये असा दुष्ट कटच होता. भारतातील श्रमपरंपरेने या कटाला सतत विरोधच केलेला आहे. श्रमपरंपरा उरात वागवणाऱ्या भारतीय जीवनशैलीने श्रमिकांचे विभाजन केले नाही. समाज खुला राहील, परिवर्तनशील राहील याची काळजी या जीवनशैलीने घेतली. तर्कतीर्थ म्हणतात, त्या वैदिक संस्कृतीपेक्षा विज्ञानशील, जात, वर्ग आणि लिंगभावविहीन भारतीय संस्कृती पूर्णतः वेगळी आहे! या दोन संस्कृती कोणत्याही पातळीवर एकत्र येऊ शकत नाहीत. या दोन संस्कृती केवळ वेगवेगळ्याच नाहीत तर, त्यांच्यात टोकाचा विरोधही आहे.

ही भारतीय संस्कृती म्हणजे समग्रहितैषी असा मानवी जीवनाच्या



**हजारो वर्षांच्या संस्कारांमुळे आणि देव–दैवाच्या भीतीमुळे बहुतांश स्त्री–पुरुष माणसे विषमतेलाच अपरिवर्तनीय वास्तव, अन्यायालाच न्याय आणि दास्यालाच नैसर्गिक मानत असतात.**

सौंदर्याचा सिद्धान्तच आहे. मूलतःच हा सौंदर्यसिद्धान्त आधुनिक आहे. म्हणून नवनव्याने निर्माण होणाऱ्या आधुनिकत्वाच्या महाकथनाचे स्वागतच तो करतो. हा मूल्यसिद्धान्त कोणालाही हिरॅक्लिटस, थेलीस, सॉक्रेटिस, पायथॅगोरस, मार्क्स, देकार्त, सार्त्र, आइन्स्टाइन, व्हॉल्टेअर, जॉन ड्युइ, ग्राम्ची, फ्यूअरबा अशा हजारो प्रकाशगोलांना उराशी कवटाळायला सांगतो. विज्ञानशीलता जिथे असेल, माणसांना समन्यायाकडे घेऊन जाणारे जे जे असेल ते ते तुमचे आहे. तुमची ताकद वाढवणारे आहे असे समजा असा हा भारतीयत्वाचा मूल्यकोश सांगतो. हाच मूल्यकोश भारतीय संविधानात गुंफला गेला आहे.

चांगल्या गोष्टी चांगल्या गोष्टींची शक्ती वाढवितात. परिवर्तनाला परिवर्तन, गतिला गती आणि सौंदर्याला सौंदर्य समृद्ध करते. भारतीयत्वाचा मूल्यकोश संपूर्णच मानवतेला समन्याय देणारा आणि समसन्मान देणारा आहे आणि जगातली मानवहितैषी सर्वच सत्ये या मूल्यकोशाला बंधुसत्ये वाटतात. म्हणून सत्याने सत्याला घाबरायचे नसते. म्हणून जगातील विधायकतेला भारतीय मूल्यकोशातली विधायकता घाबरत नाही कारण भारतीयत्वाची प्रकृती असीम प्रज्ञान हीच आहे.

सर्वांना समान न्याय, सर्वांना समान सन्मान हाच या भारतीयत्वाचा गाभा आहे. न्याय हे सर्वच इष्ट मूल्यांचे मूल्य आहे. Survival of the fittest किंवा बळी तो कान पिळी या सामाजिक डार्विनिझमच्या विरोधात हा समन्यायाचा सिद्धान्त आहे. हा सिद्धान्त केवळच भारतीय जीवनाच्या सौंदर्याचा सिद्धान्त नाही तर तो एकूणच वैश्विक जीवनाच्या सौंदर्याचाही सिद्धान्त आहे. इथपर्यंत आपण प्रत्यक्ष मानवी जीवनाचे सौंदर्यशास्त्र मांडण्याचा प्रयत्न केला आता या पुढल्या भागात संक्षेपाने 'साहित्याचे Aesthetics of Justice मांडण्याचा प्रयत्न करू. त्याआधी न्याय या संकल्पनेचे स्वरूप स्पष्ट करून घेऊ–

न्याय (जस्टिस) ही अत्यंत व्यापक संकल्पना आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत एक मध्यवर्ती नीतितत्त्व म्हणून तिचा अंतर्भाव झालेला आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमधील सभ्यता न्याय या नैतिक तत्त्वातच सामावलेली आहे. नीतिमीमांसेमधली ती मूलभूत संकल्पना आहे. एक व्यक्ती – एक मूल्य हा या संकल्पनेचा गाभा आहे. सर्व मानवांना समान सन्मानमूल्य अशी या संकल्पनेची इच्छा आहे. कुठल्याही समाजात कुवत, अभिरुची अशा बाबतीत माणसांमध्ये कमीअधिक तरतमता असते. ही जीवनातली विविधता समंजसपणे समजावून घ्यावी लागते. या विविधतेला विषमतेत ढकलायचे की, या विविधतेला सलोख्याचे सूत्र द्यायचे हे समाजातील शहाण्या लोकांनी ठरवायचे असते. कुवत आणि अभिरुची या गोष्टी गतिमान असतात. कुठल्याही वयात, कुठल्याही वळणावर या गोष्टींमध्ये नवलाचे बदल घडून येऊ शकतात. प्रारंभी सामान्य कुवतीची वाटणारी माणसे आयुष्याच्या उत्तरार्धात असामान्य कामे करून जातात. माणसांच्या आवडीनिवडींमध्येही मूलभूत पातळीवरची स्थित्यंतरे घडून येतात. डीएनए आणि जनुकांचे आशय, दिशा आणि कलही बदलता येतात. ही बाब स्टीफन हॉकिंगसारखा शास्त्रज्ञही सांगतो.

शिवाय वर म्हटली ती विविधता नेहमीसाठी अपरिवर्तनशीलच असते असे ठामपणे म्हणता येत नाही. विज्ञानच सांगते की, सर्व अनित्य आहे. सर्वच सतत परिवर्तनशील आहे आणि बुद्धांनीही ही बाब अडीच हजार वर्षांपूर्वी सांगितली आहे. याचा अर्थ असा की, माणसांच्या कुवतीची निश्चित उत्तरे देता येणे अवघड आहे. संधी मिळाली, योग्य त्या साधनसुविधा मिळाल्या आणि माणूस जिद्दीला पेटला तर कुवत आणि आवडीनिवडी या गोष्टींची नवी रूपे साकार होऊ शकतात.

याचा अर्थ व्यक्तीला सर्व प्रकारच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. जात, वंश, धर्म, संपत्ती, मानमरातब अशा गोष्टींमुळे निर्माण होणारी विषमता नष्ट करता येते. विविधतेला विषमतेच्याच तुरुंगात टाकण्यापेक्षा सर्वांना पंख उपलब्ध करून द्यावेत आणि उडण्यासाठी आकाश मोकळे करून द्यावे. समान वाटप, समान संधी सर्वांना उपलब्ध करून देण्याची गरज ही न्याय या तत्त्वाची अटच आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक वा राजकीयदृष्ट्या व्यक्ती दुर्बल ठेवल्या गेल्या असतील तर त्यांना जबाबदारीपूर्वक इतर सबलांसोबत आणण्यासाठी नव्याने योजना आखाव्यात. असे झाले तर एक व्यक्ती एक मूल्य या तत्त्वाचा सौंदर्यसोहळा व्यक्तींना अनुभवता येईल. समाजात न्याय प्रस्थापित व्हावा, कोणावरही अन्याय होऊ नये, विविधतेचा सन्मान व्हावा, सर्वांना सर्व प्रकाशवाटा मुक्त असाव्यात हे न्यायाच्या तत्त्वाचे ध्येय आहे. स्वातंत्र्य, समता, बंधूता, आर्थिक, सामाजिक, राजकीय समान हक्क, स्त्री-पुरुष समानता, सर्वांना शिक्षण आणि विकासाच्या उदंड संधी अशा मूल्यांनी न्यायाची रचना केलेली आहे.

सर्वांना समान न्याय मिळावा असे या न्यायतत्त्वाचे म्हणणे असले तरी भूतकाळात धर्मसंस्थेने आणि समाजसंस्थेने सामाजिक, आर्थिक आणि स्त्री-पुरुष विषमतेला पावित्र्य दिलेले असते. म्हणजे वरील प्रकारच्या विषमतेत जळणाऱ्यांनीही विषमतेला आणि अन्यायाला पवित्रच मानलेले असते. निसर्गतः माणसे स्वतंत्र म्हणूनच जन्माला येतात. पुढे वर्चस्वप्रस्थापक धूर्त टोळी त्यांना वेगवेगळ्या बंधनात टाकते. विविधतेला विषमतेत रूपांतरित करते. हजारो वर्षांच्या संस्कारांमुळे आणि देव-दैवाच्या भीतीमुळे बहुतांश स्त्री-पुरुष माणसे विषमतेलाच अपरिवर्तनीय वास्तव, अन्यायालाच न्याय आणि दास्यालाच नैसर्गिक मानत असतात आणि वर्चस्ववाद्यांच्या राजकारणानुसारच हे चाललेले असते. पण या गुलामीची, अन्यायाची, फसवणुकीची जाणीव करून देणारे तेजोनिधी समाजात वेळोवेळी येतातच आणि न्यायासाठी, मानवी सन्मानासाठी आरपारच्या चळवळी सुरू होतात. समाज बदलत जातो. हा सन्मान माणसांना समाजात निर्भयपणे वावरायची ऊर्जा देतो. पण या निर्भय सन्मानाचेच भय सत्तापीठे घेतात आणि या निर्भय सन्मानावर गोळ्या झाडल्या जातात.

न्याय ही पूर्णतः वैश्विक संकल्पनाच आहे. याचा अर्थ, ती कुठल्याही विशिष्ट देश-काल वा परिस्थितीपुरती मर्यादित नाही. शिवाय अखिल मानवी जीवनाला कवेत घेणारी ही संकल्पना जीवनाच्या सर्वच अंगांची सभ्यता प्रतिपादन करते. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, वाङ्मयीन अशा सर्वच क्षेत्रांमध्ये सद्भावाची, सौहार्दपूर्ण सहभावाची प्रस्थापना हा संपूर्ण आशय या संकल्पनेत आहे. या संकल्पनेला कोणत्याही पातळीवरची विषमता, दुय्यमता, दास्य, तरतमभाव वा भेद पूर्णतः अमान्य आहे.

संपूर्ण मानवी जीवनातील, जीवनाच्या सर्वच व्यवस्थांमधील अन्यायाचे निर्मूलन हेच या संकल्पनेचे ध्येय आहे. ज्या श्रद्धांमुळे, संस्कारांमुळे वा ज्या मनोरचनांमुळे व्यक्तींना आपण कोणावर अन्याय करतो आहोत, हेच कळत नाही त्या व्यक्तींच्या मनांची संपूर्ण पुनर्मांडणी (Reconstruction) करणे हे न्याय संकल्पनेचे ध्येय आहे.

जातिव्यवस्था, धर्मव्यवस्था वा वंशव्यवस्था या सर्वच व्यवस्था समाजमने दुभंगवून ठेवतात. समाजाची विभागणी अहंकारी बेटांमध्ये, परस्परद्वेषी आणि धुमसत्या झगड्यांमध्ये करून ठेवतात. हा न्यायालाच नकार असतो. ही न्यायबंदीच असते आणि हे अन्यायाला मोकाट सोडणेच असते. वरील सर्व व्यवस्थांची निर्मिती करणाऱ्या देव, धर्म, धर्मग्रंथ, तत्त्वज्ञाने आणि साहित्य अशा सर्वच गोष्टी मग मानवी जीवन दुभंगवून टाकणाऱ्या अन्यायाचीच भूमिका करीत असतात.

न्याय हा मानवी सौहार्दाचा, Wisdom चा, स्वातंत्र्याचा, समतेचा, भगिनीत्वाचा आणि बंधुत्वाचा सर्वहितैषी प्रबंध आहे. त्याला आपण मानवी जीवनाच्या सौंदर्याचा सामंजस्य करार म्हणू शकतो. 'न्याय' हे मूल्य म्हणजे मूल्यांचे मूल्य आहे वा इतर मूल्यांचा आशय निश्चित करणारे मूल्य आहे, असेच म्हणायला हवे. याचाही अर्थ ते पायाभूत वा इतर मूल्यांना अर्थ देणारे उगममूल्य आहे असा होतो. न्याय या संकल्पनेचा आशय निश्चित झाला की इतर सर्वच संकल्पनांचे आशय निश्चित होतात. न्याय या संकल्पनेला समन्याय, सर्वांना समान सन्मान, सर्वांना एकमूल्य असा अर्थ दिला की हाच अर्थ पुढे नेणाऱ्या संकल्पनांची एक युद्धछावणी तयार होते. या संकल्पनेच्या विरोधात वैदिक-ब्राह्मणी परंपरेने न्यायाची वेगळी कल्पना मांडली आहे. तिला धर्माचा, आध्यात्माचा आधार आहे. चातुर्वर्ण्य आणि आपापल्या वर्णजातीत निष्ठेने जगणे ही श्रेणीबद्ध विषमतेवर आधारलेली न्यायाची कल्पना आहे. इथे विषमतेला, शोषणाला न्याय म्हटले जाते. ही न्यायाची संकल्पना पुरुषार्थावर आधारलेली अन्यायाचीच संकल्पना आहे, असे आपण मानतो. या अन्याय कल्पनेच्या विरोधात आपण एक व्यक्ती - एक मूल्य, सर्वांचा समान सन्मान ही समन्यायाची संकल्पनाच न्यायाची खरी संकल्पना मानतो. या संकल्पनेलाच आपण भारतीय म्हणतो. ●●●

न्याय हा एकूणच मानवी जीवनाचा गाभा आहे. अन्याय म्हणजे अनैतिकता आणि जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील अनैतिकता न्याय या संकल्पनेला अजिबात मान्य नाही. समता, स्वातंत्र्य, शोषणमुक्ती, धर्मस्वातंत्र्य, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार, समान संधी, सन्मानाने जीवित राहणे असे हे अधिकार प्रत्येक व्यक्तीला जन्मानेच प्राप्त होतात. या सर्वच अधिकारांचा अंतर्भाव न्याय या संकल्पनेत होतो. जीवनातील सर्वसमावेशक इष्टांचा, सर्वांच्या समान सन्मानाचा अंतर्भाव न्याय या संकल्पनेत होतो. न्याय हा एकूणच नीतिव्यवहाराचा प्राण आहे. कोणावरही कुठल्याही प्रकारचे दुय्यमत्व लादले जाणार नाही आणि कोणाच्याही साकल्याचा सन्मान करणाऱ्या स्वातंत्र्यावर अन्याय होणार नाही, असे न्याय या संकल्पनेचे स्वरूप आहे.

# अल्पसंख्याक आणि गरिबी



प्रो. सुखदेव थोरात/ मशकूर अहंमद

लोकसंख्येतील प्रचंड वैविध्य हा भारताच्या लोकसंख्येचा एक एकमेवाद्वितीय गुणधर्म आहे. भारताच्या लोकसंख्येत जवळजवळ कल्पना करता येणारा प्रत्येक धर्म आहे. भारत हे अनेक धर्मांचं स्थान आहे. बौद्ध, हिंदू, जैन, शीख, इस्लाम, ख्रिश्चन आणि पारशी अशा अनेक धर्मांखेरीज इतरही अनेक धर्म इथे नांदतात. २०११ च्या जनगणनेनुसार, एकूण लोकसंख्येतील हिंदू धर्मियांचे प्रमाण ८० टक्के होते; तर उर्वरित किंवा सुमारे एक पंचमांश लोकसंख्येत मुस्लिम (१४.२३ टक्के), ख्रिश्चन (२.३० टक्के), शीख (१.७२ टक्के), बौद्ध (०.७० टक्के), जैन (०.३७ टक्के) अशा अल्पसंख्याक धार्मिक समाजांचा समावेश होतो. याखेरीज पारशी समाजाची लोकसंख्या (०.६६ टक्के) असून धर्म न सांगणाऱ्या लोकांची संख्या ०.२४ टक्के आहे. (तक्ता क्र. १ पहा.) विविध लोकसंख्यात्मक गटांमधील धार्मिक रचनेतील वैविध्य हे आधीपासूनच ओळखले गेले असले तरीही एकाच धार्मिक गटांमधील मानव विकासातील पूर्वापार आढळणाऱ्या तफावती हा विषय अगदी अलीकडेच म्हणजे विशेषतः देशातील सर्वात मोठ्या असलेल्या अल्पसंख्याक गटासाठी म्हणजेच मुस्लिमांसाठी नेमण्यात आलेल्या सच्चर समितीचा अहवाल (२००६) प्रसिद्ध झाल्यानंतर काळजीचा किंवा विचार करण्याचा विषय बनला आहे. कल्याणकारी किंवा हितकारी सुसंगत बाबींचा विचार करता हिंदू आणि मुस्लिम या यांच्यामधील लक्षणीय तफावती या अहवालातून उघड करण्यात आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर, मालमत्तेची मालकी, रोजगार, शिक्षण आणि गरिबी याविषयीच्या अलीकडच्या उपलब्ध माहितीचा वापर करून आंतर-धर्मीय तफावतींविषयीच्या काही पैलूंसंदर्भात दृष्टिकोन विकसित करणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे. विविध धार्मिक गटांमधील गरिबीच्या प्रमाणावर आणि २०११-१२ च्या दरम्यान काही धार्मिक अल्पसंख्याकांमध्ये मोठ्या प्रमाणात गरिबी निर्माण करण्यास कारणीभूत ठरलेल्या घटकांवर या शोधनिबंधाचा मुख्य भर आहे. धार्मिक गटांमधील गरिबीचे प्रमाण व कारणे यांतील तफावती समजून घेण्यासाठी या शोधनिबंधाच्या विश्लेषणाचा उपयोग होईल. सातत्याने टिकून असलेल्या गरिबीचे स्पष्टीकरण देण्यासाठी २०११-१२ या कालावधीच्या दरम्यान असलेली शेतजमिनीवरची आणि खासगी उद्योग-व्यवसायावरची मालकी, रोजगार, नियमित वेतनाचा रोजगार आणि शिक्षण या घटकांचा आम्ही समावेश केला आहे.

**धर्म आणि गरिबी :** तेंडूलकर आयोगाने वापरलेल्या २००७-०८ साठीच्या (एनएसएस कन्झम्पशन एक्सपेन्डिचर सर्व्हे अर्थात, खाण्यावर होणारा कुटुंबांचा खर्च) माहिती पद्धतींचा वापर करून गरिबी मोजण्यात आली आहे. तक्ता क्र. २ मधून असे स्पष्ट होते

## तक्ता क्र. १. : भारतातील धर्मनिहाय लोकसंख्या, २०११

| धार्मिक | आकड्यांत | | | टक्केवारीत | | |
|---|---|---|---|---|---|---|
| गट | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी |
| हिंद | ९६,६२,५७,३६३ | ६८,४०,९३,९५१ | २८,२१,६३,४०२ | ७९.८० | ८२.०५ | ७४.८२ |
| मुस्लिम | १७,२२,४५,१५८ | १०,३५,०४,७३९ | ६,८७,४०,४१९ | १४.२३ | १२.४१ | १८.२३ |
| ख्रिश्चन | २,७८,१९,५८८ | १,६६,५७,०६५ | १,११,६२,५२३ | २.३० | २.०० | २.९६ |
| शीख | २,०८,३३,११६ | १,४९,३०,७९२ | ५९,०२,३२४ | १.७२ | १.७९ | १.५७ |
| बौद्ध | ८४,४२,९७२ | ४८,१४,८४९ | ३६,२८,१२३ | ०.७० | ०.५८ | ०.९६ |
| जैन | ४४,५१,७५३ | ९,०४,८०९ | ३५,४६,९४४ | ०.३७ | ०.११ | ०.९४ |
| ओआर | ७९,३७,७३४ | ७१,९९,००७ | ७,३८,७२७ | ०.६६ | ०.८६ | ०.२० |
| आरएनएस | २८,६७,३०३ | १६,४३,६४० | १२,२३,६६३ | ०.२४ | ०.२० | ०.३२ |
| एकूण | १२१,०८,५४९७७ | ८३,३७,४८,८५२ | ३७,७१,०६,१२५ | १०० | १०० | १०० |

**टीप** : ओआर हे वर्गीकरण करण्यात न आलेल्या विभागांसह इतर धर्म (आणि श्रद्धा) दर्शवते, तर आरएनएस धर्म न सांगितलेल्या लोकांना दर्शवते.

***स्रोत : भारताची जनगणना, २०११ वर आधारित.***

की, २०११-१२ मध्ये भारतातील सुमारे २२ टक्के लोकसंख्या गरीब होती. शहरी भागातील गरिबीच्या प्रमाणाच्या (१४ टक्के) तुलनेत ग्रामीण भागात गरिबीचे प्रमाण (२५.४ टक्के) उच्चतर होते.

विविध धार्मिक गटांमधील गरिबांच्या प्रमाणात लक्षणीय तफावती होत्या. त्यांच्या लोकसंख्येच्या २५ टक्के लोक गरीब या वर्गवारीत मोडत असताना मुस्लिम आणि बौद्ध हे देशातील सर्व धार्मिक गटांमधील सर्वाधिक गरीब समाज आहेत. त्याखालोखाल हिंदू समाजात सुमारे २२ टक्के गरिबी आहे. देशातील सर्वाधिक कमी गरीब असलेल्या धार्मिक गटांमध्ये शीख आणि ख्रिश्चन यांचा समावेश होतो. त्यांच्या लोकसंख्येपैकी अनुक्रमे ६ टक्के आणि १६ टक्के लोक गरिबीत जगत आहेत. मुस्लिमांमध्ये शिखांच्या तुलनेत चौपटीने आणि हिंदूंच्या तुलनेत ४ टक्क्यांनी अधिक गरिबी आहे.

काही किरकोळ बदल वगळता ग्रामीण आणि शहरी भागांतील गरिबीच्या संरचना जवळजवळ सारख्याच आहेत. शहरी परिसरांमध्ये बौद्ध लोक सर्वाधिक गरीब आहेत. (एकूण लोकसंख्येच्या २५ टक्के). त्याखालोखाल मुस्लिम (२३ टक्के) आणि हिंदू (१२ टक्के) आहेत. शीख आणि ख्रिश्चन हे सर्वाधिक कमी गरीब आहेत. (त्यांच्यातील केवळ ५ टक्के लोक गरीब आहेत.) बौद्धांमधील गरिबी ही त्यांच्या तुलनेत पाचपटीने अधिक आहे. मुस्लिमांमधील गरिबी ही शीख आणि ख्रिश्चन यांच्या तुलनेत चौपटीने अधिक आहे. बौद्ध आणि मुस्लिम यांच्यातील गरिबी हिंदूंमधील गरिबीच्या तुलनेत सुमारे दुपटीने उच्चतर आहे.

अशा प्रकारे २०११-१२ ची माहिती असे दर्शवते की, मुस्लिम आणि बौद्ध (आणि त्यांच्यापैकी अनेक जण अनुसूचित जातींमधील किंवा एससींमधील आहेत.) हे हिंदू, शीख आणि ख्रिश्चन या धार्मिक गटांच्या तुलनेत सर्वाधिक गरीब आहेत. मुस्लिम आणि बौद्ध या दोन्ही गटांना बहुआयामी गरिबीचा त्रास सहन करावा लागतो. अशा प्रकारे हे गट देशातील धार्मिक समाजांमध्ये सर्वाधिक मागास आणि गरीब राहिले आहेत. इंडिया ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट, २०११: टुवर्ड सोशल इनक्ल्युजनमधून मालमत्तांच्या मालकींमधील मुस्लिमांची उपेक्षा अत्यंत स्पष्टपणे समोर येते. २००२-०३ च्या दरम्यान मालमत्तांच्या मालकीचा ॲक्सेस इंडेक्स (उपलब्धी निर्देशांक) (मालमत्तांमधील मालकीतील समाजाचा वाटा भागिले लोकसंख्येतील समाजाचा वाटा म्हणजे उपलब्धी निर्देशांक किंवा ॲक्सेस इंडेक्स होय.) हा मुस्लिमांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात कमी होता. (इंडिया ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट, २०११)

**कोणते आर्थिक गट सर्वाधिक गरीब आहेत? :** ग्रामीण परिसरांमध्ये एनएसएसने घरगुती व्यवसायांची सहा वर्गांमध्ये वर्गवारी केली आहे. कृषी क्षेत्रातील स्वयंरोजगारित, अकृषक क्षेत्रातील स्वयंरोजगारित, नियमित वेतनधारक, कृषी क्षेत्रातील हंगामी मजूर, अकृषक क्षेत्रातील हंगामी मजूर आणि इतर असे हे वर्ग आहेत. दुसरीकडे, शहरी परिसरांमध्ये घरगुती व्यवसायांमध्ये स्वयंरोजगारित, नियमित वेतनधारक, हंगामी मजूर आणि इतर अशी वर्गवारी करण्यात आली आहे.

या विश्लेषणातून (तक्ता क्र. ३) असे समोर येते की, ग्रामीण परिसरांमध्ये कृषी क्षेत्रातील मजुरीवर अवलंबून असलेली कुटुंबे सर्वाधिक गरीब होती. त्यांच्यापैकी ४० टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली जगत होते. त्यांच्या खालोखाल गरिबी दिसत असलेला

## तक्ता क्र. २ : भारतातील गरिबीचे प्रमाण, २०११-१२ (टक्केवारीत)

| धार्मिक गट | ग्रामीण | शहरी | एकूण |
|---|---|---|---|
| हिंदू | २५.६ | १२.१ | २१.९ |
| मुस्लिम | २६.९ | २२.७ | २५.४ |
| ख्रिश्चन | २२.२ | ५.५ | १६.४ |
| शीख | ६.२ | ५.० | ५.९ |
| बौद्ध | २४.२ | २४.८ | २४.४ |
| इतर | ३३.६ | ६.२ | १८.५ |
| **एकूण** | **२५.४** | **१३.७** | **२२.०** |

**टीप** : तेंडूलकर आयोगाच्या पद्धतीचा वापर करणाऱ्या अधिकृत दारिद्र्यरेषेवर आधारित.

**स्रोत** : एनएसएस कन्झम्पशन एक्सपेन्डिचर सर्व्हे, ६८ वी फेरी, २०११-१२.

## तक्ता ३ : ग्रामीण भारतातील कुटुंबांच्या व्यवसायांच्या प्रकारानुसार धार्मिक गटांतील गरिबीचा दर

| कुटुंबाच्या व्यवसायाचा प्रकार | धार्मिक गट (टक्केवारीत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदू | मुस्लिम | ख्रश्चन | शीख | बौद्ध | इतर | एकूण |
| कृषी क्षेत्रातील स्वयंरोजगारित | २२.२ | २३.८ | ३०.० | ०.५ | १८.७ | ५२.५ | २२.२ |
| अकृषक क्षेत्रातील स्वयंरोजगारित | १८.३ | २१.९ | १०.५ | १.७ | ९.५ | २.१ | १८.६ |
| नियमित वेतनधारक | ११.४ | ११.८ | १०.६ | ३.६ | ३.२ | २.८ | ११.१ |
| कृषी क्षेत्रातील हंगामी मजूर | ३९.८ | ४४.२ | २६.२ | १५.५ | ४७.९ | ५.२ | ३९.८ |
| अकृषक क्षेत्रातील हंगामी मजूर | ३३.१ | ३४.० | २६.४ | १६.१ | १४.० | ५७.७ | ३२.७ |
| इतर | १९.७ | १३.७ | ५.६ | २.१ | ०.५ | १०.३ | १७.८ |
| एकूण | २५.६ | २६.९ | २२.२ | ६.२ | २४.२ | ३३.६ | २५.४ |

टीप : तेंडूलकर आयोगाच्या पद्धतीचा वापर करणा–या अधिकृत दारिद्र्यरेषेवर आधारित.

*स्रोत : एनएसएस कन्झम्पशन एक्सपेन्डिचर सर्व्हे, ६८ वी फेरी, २०११–१२.*

गट हा अकृषक हंगामी मजुरांच्या कुटुंबांचा होता. त्यांच्यापैकी ३३ टक्के लोक गरीब होते. सर्वात कमी गरीब लोक हे नियमित वेतनधारक होते. (त्यांच्यापैकी ११ टक्के लोक गरीब होते.) त्यानंतर चढत्या क्रमाने विचार करता अकृषक क्षेत्रातील स्वयंरोजगारितांचा क्रमांक लागतो. (त्यांच्यापैकी १८ टक्के लोक गरीब होते.) आणि कृषी क्षेत्रातील स्वयंरोजगारितांमधील गरिबांचे प्रमाण २२ टक्के होते. प्रत्येक धार्मिक गटासाठी जवळजवळ अशाच प्रकारची संरचना दिसून आली होती. मात्र धार्मिक गटांमधील प्रत्येक व्यावसायिक गटानुसार गरिबीचे प्रमाण बदलते होते. या निरीक्षणातून असे दिसून आले होते की कृषी क्षेत्रातील मजूर हे सर्वाधिक गरीब होते. त्यांच्यापैकी ४० टक्के लोक दारिद्र्यरेषेच्या खाली होते. मात्र कृषी रोजंदारीवरील मजुरांपैकी बौद्ध आणि मुस्लिम हे इतर धार्मिक गटांमधील अशा मजुरांच्या तुलनेत अधिक गरीब होते. त्यांच्यातील गरिबीचे प्रमाण अनुक्रमे ४८ टक्के आणि ४४ टक्के होते. हंगामी किरकोळ कामांवरील मजुरांमधील गरिबीचे प्रमाण हे ख्रिश्चन आणि शीख गटांमध्ये तुलनेत कमी होते. अकृषक हंगामी कामगारांचा विचार करता मुस्लिम आणि हिंदू यांच्यामध्ये गरिबीचे प्रमाण उच्च असल्याचे आढळले होते. त्याखालोखाल ख्रिश्चन आणि शीख यांचा क्रमांक लागत होता. मात्र बौद्धांमध्ये हे प्रमाण सर्वात कमी होते. स्वयंरोजगारित शेतकऱ्यांमध्येही ख्रिश्चन आणि मुस्लिम हे इतर धार्मिक गटांमधील स्वयंरोजगारित शेतकऱ्यांच्या तुलनेत अधिक गरीब होते. अकृषक क्षेत्रातील स्वयंरोजगारितांचा म्हणजेच उद्योग आणि व्यवसाय करत असलेल्या लोकांचा विचार करता, मुस्लिम सर्वाधिक गरीब होते. त्यांच्यापैकी २२ टक्के लोक गरीब होते. त्याखालोखाल हिंदूंचा क्रमांक लागत होता. त्यांच्यातील गरिबीचे प्रमाण १८.३ टक्के होते. ख्रिश्चन आणि बौद्ध यांच्यातील गरिबीचे प्रमाण प्रत्येकी सुमारे १० टक्के होते. शीख हा सर्वाधिक कमी गरीब असलेला गट होता. त्यांच्यामध्ये केवळ २ टक्के लोक गरीब होते. नियमित वेतनधारक कुटुंबांचा विचार केला तर मुस्लिम, हिंदू आणि ख्रिश्चन यांच्यामध्ये सुमारे १० टक्के एवढा गरिबीचा दर होता. बौद्ध आणि शीख यांच्यामध्ये तो उच्चतर होता.

शहरी भागांमध्ये हंगामी कामगार सर्वाधिक गरीब होते. त्याखालोखाल स्वयंरोजगारित गरीब होते. नियमित वेतनधारक सर्वाधिक कमी गरीब होते. (तक्ता क्र. ४) ते करत असलेल्या व्यवसायांच्या संदर्भात विचार करता, बौद्ध किरकोळ हंगामी कामे करणारे कामगार हा सर्वाधिक गरीब धार्मिक गट होता. त्यांच्यापैकी ५२ टक्के लोक गरीब होते. त्याखालोखाल मुस्लिम आणि हिंदू हंगामी कामगारांचे क्रमांक लागत होते. त्यांच्यामध्ये अनुक्रमे ३६ टक्के आणि ३३ टक्के गरिबी होती. ख्रिश्चन आणि शीख हंगामी कामगार हे सर्वाधिक कमी गरीब होते.

खाजगी उद्योग किंवा व्यवसायांत असलेले सुमारे १५ टक्के स्वयंरोजगारित गरीब होते. त्यांच्यामध्ये मुस्लिम आणि बौद्ध स्वयंरोजगारित कामगार अधिक गरीब होते. त्यांच्यापैकी अनुक्रमे २४ टक्के आणि १७ टक्के कामगार गरिबीत जगत होते. त्याखालोखाल हिंदूंचा (१३ टक्के) आणि ख्रिश्चनांचा (८ टक्के) व शिखांचा (४ टक्के) क्रमांक लागत होता.

नियमित वेतनधारक कर्मचाऱ्यांमध्येही हिंदूंच्या (६ टक्के) तुलनेत मुस्लिम (१६ टक्के) आणि बौद्ध (१२ टक्के) सर्वाधिक गरीब होते. ख्रिश्चन आणि शीख यांच्यातील गरिबीचे प्रमाण अनुक्रमे ४ टक्के आणि ३ टक्के होते. नियमित वेतनधारक मुस्लिम आणि बौद्ध कनिष्ठ किंवा खालच्या दर्जाच्या कामांमध्ये गुंतलेले असतात आणि परिणामी, त्यांच्या कामाच्या अटीही तशाच कनिष्ठ दर्जाच्या (कंत्राटाचा कालावधी, सामाजिक सुरक्षितता इ.) असतात, हे यामागचे कारण असण्याची शक्यता आहे. त्यांची कामे ही इतर नियमित वेतनधारकांच्या तुलनेत खूपच वाईट असतात. (नियोजन आयोग, २०१२)

अशा प्रकारे धार्मिक गटांमधील गरिबीच्या प्रमाणाचे विश्लेषण स्पष्टपणे असे सूचित करते की, मुस्लिम आणि बौद्ध हे सर्वाधिक गरीब होते. शहरी भागांत बौद्ध हे ख्रिश्चन, शीख आणि हिंदू यांच्या तुलनेत पूर्वापार गरिबी असण्याच्या बाबतीत मुस्लिमांच्या पुढे आहेत. गरिबीचे प्रमाण ख्रिश्चनांमध्येआणि

शिखांमध्ये सर्वाधिक कमी आहे, तर हिंदू हे या संदर्भात मध्यम वर्गात मोडतात. विविध व्यावसायिक वर्गांमध्येही जवळपास अशीच संरचना आढळते. बौद्धांमध्ये हंगामी कृषी रोजंदारीवरील मजूर आणि मुस्लिमांमध्ये स्वयंरोजगारित सर्वाधिक गरीब आहेत. मुस्लिमांमध्ये शहरी भागांत स्वयंरोजगारितांचे प्रमाण उच्च आहे आणि म्हणून त्यांच्यातील गरिबीचे प्रमाणही उच्च आहे ही बाब इथे नोंदवण्याची गरज आहे. बौद्धांच्या बाबतीतही अशीच बाब सत्य आहे.

## तक्ता क्र. ४ : शहरी भारतातील कुटुंबांच्या व्यवसायांच्या प्रकारानुसार धार्मिक गटांमधील गरिबीचे गुणोत्तर, २०११-१२

| कुटुंबाच्या व्यवसायाचा प्रकार | धार्मिक गट (टक्केवारीत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदू | मुस्लिम | ख्रश्चन | शीख | बौद्ध | इतर | एकूण |
| स्वयंरोजगारित | १२.७ | २३.६ | ८.२ | ३.९ | १७.० | ७.८ | १४.८ |
| नियमित वेतनधारक | ५.८ | १५.८ | ४.४ | २.९ | १२.१ | २.१ | ६.९ |
| हंगामी मजूर | ३२.८ | ३५.९ | ३.८ | २६.४ | ५२.२ | ३३.० | ३२.९ |
| इतर | ७.७ | १०.७ | ६.१ | १.३ | २७.५ | ३.४ | ८.२ |
| **एकूण** | **१२.१** | **२२.७** | **५.५** | **५.०** | **२४.८** | **६.२** | **१३.७** |

**टीप** : तेंडूलकर आयोगाच्या पद्धतीचा वापर करणाऱ्या अधिकृत दारिद्र्यरेषेवर आधारित.

*स्रोत : एनएसएस कन्झम्पशन एक्सपेन्डिचर सर्व्हे, ६८ वी फेरी, २०११-१२.*

इथे असा प्रश्न निर्माण होतो की, सर्व धार्मिक गटांमध्ये मुस्लिम आणि बौद्ध हेच गट सर्वाधिक गरीब का आहेत? गरिबीच्या निकषांच्या अभ्यासातून असे सूचित होते की, शेतजमीन, खासगी व्यवसाय यांसारख्या उत्पन्न मिळवून देणाऱ्या मालमत्तांवर कमी मालकी, रोजगाराची आणि शिक्षणाची कमी पातळी आणि नियमित वेतनाची कमी कामे असलेले गट जमीन, व्यवसाय यांसारख्या मालमत्तांवर मालकी असलेल्या, कमी बेरोजगारी, शिक्षणाची उच्च पातळी आणि नियमित वेतनाच्या रोजगारांमध्ये उच्चतर संख्येने असलेल्या गटांच्या तुलनेत अधिक गरीब असतात. गरिबीवर परिणाम करणाऱ्या काही मूलभूत घटकांचे पुढे मूल्यमापन करण्यात आले आहे. यांमध्ये शेतजमिनीची आणि खासगी उद्योगांची मालकी, नियमित वेतनाच्या रोजगारांची संधी किंवा उपलब्धी, शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या पातळ्या आणि बेरोजगारी या घटकांचा समावेश आहे.

**उत्पन्न मिळवून देणाऱ्या मालमत्तांची उपलब्धी :** शेतजमीन आणि उद्योग किंवा व्यवसाय यांसारख्या उत्पन्न मिळवून देणाऱ्या मालमत्तांवरील मालकीच्या विश्लेषणातून विविध धार्मिक गटांच्या परिस्थितीचे आकलन होण्यास मदत होईल. ग्रामीण भागांमध्ये मालमत्तांची मालकी असलेल्या आणि मालमत्तांची मालकी नसलेल्या अशा दोन गटांत एनएसएसने कुटुंबांचे वर्गीकरण केले आहे. मालमत्तांची मालकी नसलेला गट उदरनिर्वाहासाठी मोठ्या प्रमाणात रोजंदारीवर किंवा नियमित वेतनाच्या रोजगारावर काम करतो. त्यांच्या मुख्य व्यवसायाच्या आधारावर अशा कुटुंबांचे सहा वर्गांत वर्गीकरण करण्यात आले आहे. तक्ता क्र. ५ (अ) मधून २०११-१२ या वर्षाची ग्रामीण भागाची एनएसएस माहिती (डेटा) देण्यात आली आहे. त्यातून असे दिसते की, ग्रामीण भागातील एकूण कुटुंबांपैकी सुमारे ४० टक्के कुटुंबे शेतीतील स्वयंरोजगारित कुटुंबे होती. मात्र अशा कुटुंबांचे प्रमाण हिंदूंमध्ये सर्वोच्च म्हणजे ४२ टक्के आहे. त्याखालोखाल मुस्लिम आणि बौद्धांमधील हे प्रमाण २८ टक्के आहे. यावरून मुस्लिम आणि बौद्ध यांना शेतजमिनी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याचे सूचित होते.

अकृषक मालमत्तांच्या मालकीचा विचार करता मुस्लिमांची स्थिती अधिक चांगली असल्याचे दिसते. अकृषक क्षेत्रातील स्वयंरोजगारित कामगारांचे प्रमाण हिंदूंच्या तुलनेत (१४ टक्के) मुस्लिमांमध्ये सर्वोच्च (२७ टक्के) आहे. बौद्धांचा या क्षेत्रातील



### तक्ता क्र. (५ अ) : ग्रामीण भारतातील कुटुंबांच्या प्रकारानुसार धार्मिक गटांमधील कामगारांचे वाटप, २०११-१२

| कुटुंबाच्या व्यवसायाचा प्रकार | धार्मिक गट (टक्केवारीत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदू | मुस्लिम | ख्रिश्चन | शीख | बौद्ध | इतर | एकूण |
| कृषी क्षेत्रातील स्वयंरोजगारित | ४१.७ | २८.१ | ४४.९ | ४२.५ | २७.५ | ६९.३ | ४०.४ |
| अकृषक क्षेत्रातील स्वयंरोजगारित | १३.९ | २७.३ | १५.९ | १३.१ | ९.५ | २०.४ | १५.३ |
| नियमित वेतनधारक | ८.७ | ९.५ | १६.० | १२.९ | ८.३ | ३.५ | ९.० |
| कृषी क्षेत्रातील हंगामी मजूर | २२.१ | १७.८ | ९.१ | १५.४ | ४६.० | १.२ | २१.४ |
| अकृषक क्षेत्रातील हंगामी मजूर | १३.१ | १६.८ | १२.८ | १५.५ | ८.६ | ४.४ | १३.४ |
| इतर | ०.५ | ०.५ | १.२ | ०.६ | ०.२ | १.२ | ०.५ |
| **एकूण** | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** |

*स्रोत : एनएसएस एम्प्लॉयमेंट अँड अनएम्प्लॉयमेंट सर्व्हे, ६८ वी फेरी, २०११-१२.*

असल्याचे दिसते. यासंदर्भातील गुणोत्तरे ही बौद्धांसाठी ६७ टक्के, ख्रिश्चनांसाठी ५०.१ टक्के आणि हिंदूंसाठी ४५.३ टक्के अशी आहेत. मुस्लिमांमध्ये हे गुणोत्तर सर्वात कमी म्हणजे २६.२ टक्के आहे. याचा अर्थ, मुस्लिमांना शहरी भागात नियमित वेतनाच्या रोजगाराची उपलब्धी कमी आहे. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणातील मुस्लिम कामगार स्वयंरोजगारित आहेत आणि ते कारागिरीच्या कामकाजात गुंतले आहेत. अर्थकारणातील मूलभूत बदलांमुळे हे व्यवसाय धोक्यात आले आहेत किंवा तणावग्रस्त बनले आहेत. (नियोजन आयोग, २००८). इतर धार्मिक गटांच्या सदस्यांच्या तुलनेत मुस्लिमांना नियमित वेतनाचे रोजगार कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळेच हे विशेषतः घडत आहे आणि स्वयंरोजगाराच्या किरकोळ कामांमध्ये ते गुंतले आहेत. म्हणून स्वयंरोजगारात आणि अनौपचारिक क्षेत्रांत मुस्लिम अधिक प्रमाणात एकवटले आहेत. उदरनिर्वाहाची हमी मिळण्यासाठी त्यांना योग्य आणि पुरेसे आर्थिक साहाय्य आणि पतपुरवठा होणे आवश्यक आहे. मात्र मुस्लिमांना प्राधान्य क्षेत्र कर्ज आणि सार्वजनिक रोजगार यांच्यासह बँकेकडून होणारा पतपुरवठाही अत्यंत तुटपुंजा राहिला आहे. लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणाचा विचार करता मुस्लिमांना दिले जाणारे एकूण कर्ज खूपच कमी आहे. त्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जाची सरासरी रक्कमही इतर सामाजिक धार्मिक वर्गांच्या तुलनेत कमी मुस्लिमांच्या अशा वित्तीय वगळणुकीचा त्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीवर मोठा परिणाम असल्याचे दिसते. (नियोजन आयोग, २०१२, शरीफ, २०१३.) याखेरीज बहुतांश सरकारी संस्थांमध्ये आणि संघटित खासगी व उद्योग क्षेत्रांतील त्यांची अनुपस्थितीही लक्षणीय आहे. (शरीफ, २०१३). ●●●

वाटा सर्वात कमी (९ टक्के) आहे. मालमत्तांच्या अभावामुळे निर्माण झालेली अस्वस्थता नियमित वेतनाच्या रोजगाराने काही प्रमाणात सौम्य करण्याचा किंवा भरून काढण्याचा प्रयत्न मालमत्ता नसलेली व्यक्ती करते, असे यावरून म्हणता येते. नियमित वेतनाच्या रोजगाराचा विचार करता हिंदू, मुस्लिम आणि बौद्ध या तिन्ही धार्मिक गटांचा वाटा जवळजवळ समान म्हणजे प्रत्येकी ८-९ टक्के आहे. ख्रिश्चनांचा यातील वाटा काहीसा उच्चतर आहे.

मालमत्तांवरील मालकीचा अभाव आणि नियमित वेतनाच्या रोजगाराच्या उपलब्धीचा अभाव यामुळे कुटुंबांना हंगामी रोजंदारीच्या कामाकडे ढकलले जाते. विशेषतः हे बौद्धांच्या बाबतीत खरे आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बौद्ध लोक हंगामी रोजंदारीच्या मजुरीच्या कामांवर असतात. बौद्ध कामगारांपैकी ६४ टक्के कामगार हे हंगामी रोजंदारीच्या रोजगारात आहेत. हिंदू आणि मुस्लिम या दोहोंच्याही यासंदर्भातील ३५ टक्के या गुणोत्तराच्या तुलनेत हे प्रमाण उच्च आहे.

शहरी भागांतही अशीच संरचना दिसून आली आहे. तक्ता क्र. ५ (ब) असे दर्शवतो की, स्वमालकीचे उद्योग असलेल्या किंवा स्वतःचा व्यवसाय चालवणाऱ्या स्वयंरोजगारित कामगारांचे प्रमाण शिखांमध्ये (५६.२ टक्के) मुस्लिमांमध्ये (५६ टक्के) आणि हिंदूंमध्ये (४० टक्के) उच्च आहे. मात्र बौद्धांमध्ये हे प्रमाण या तुलनेत खूपच कमी म्हणजे ११.५ टक्के आहे. नियमित वेतनाच्या कामगारांचा विचार करता मात्र नेमकी याच्या विरुद्ध परिस्थिती

### तक्ता क्र. ५ (ब) : शहरी भारतातील कुटुंबांच्या प्रकारानुसार धार्मिक गटांमधील कामगारांचे वाटप, २०११-१२

| कुटुंबाच्या व्यवसायाचा प्रकार | धार्मिक गट (टक्केवारीत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदू | मुस्लिम | ख्रिश्चन | शीख | बौद्ध | इतर | एकूण |
| स्वयंरोजगारित | ४०.० | ५६.० | ३०.६ | ५६.२ | ११.५ | ६५.३ | ४२.५ |
| नियमित वेतनधारक | ४५.३ | २६.२ | ५०.१ | ३९.९ | ६७.० | ३१.३ | ४२.४ |
| हंगामी मजूर | १३.८ | १७.३ | १७.८ | ३.५ | १९.० | २.३ | १४.३ |
| इतर | ०.९ | ०.४ | १.४ | ०.४ | २.६ | १.१ | ०.८ |
| **एकूण** | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** |

*स्रोत : एनएसएस एम्प्लॉयमेंट अँड अनएम्प्लॉयमेंट सर्व्हे, ६८ वी फेरी, २०११-१२.*

# बहुभाषिक अभिनेता प्रकाश 'राज' कारणात!

प्रतिनिधी

चित्रपट अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता, नाट्यकलावंत, दूरदर्शनवरील कार्यक्रमांचा सूत्रसंचालक आणि सामाजिक कार्यकर्ता अशी ओळख असलेला बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा अभिनेता प्रकाश राज आता राजकारणात आलाय. होऊ घातलेल्या १७ व्या लोकसभा निवडणुकीत तो मध्य बंगळुरू मतदारसंघातून अपक्ष म्हणून लढत आहे. प्रकाश राज याने चित्रपटांत मुख्यत्त्वे खलनायकाच्या भूमिका साकारलेल्या असल्या तरी माणूस म्हणून तो खूप चांगला आहे. तथापि, थेट बोलण्याच्या स्वभावामुळे अनेकदा तो वादात सापडला. कथासूत्रावरून किंवा एखाद्या मुद्यावरून चित्रपट निर्मात्याशी असो वा त्याची मैत्रिण गौरी लंकेश यांच्या हत्येनंतर असो त्याने व्यक्त केलेल्या मतांमुळे तो वादात सापडला. अशाच वादग्रस्त वक्तव्यांमुळे तेलुगू चित्रपट निर्मात्यांनी त्याच्यावर सहा वेळा बंदी आणली होती. पत्रकार गौरी लंकेश यांच्या हत्येनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चुप्पी साधल्याबद्दल प्रकाश राज याने त्यांच्यावर जोरदार टीका केली होती. राजकारणी मंडळी असा काही अभिनय करतात, की ज्यामुळे राष्ट्रीय पुरस्काराचे माझ्यापेक्षा ते जास्त हक्कदार बनतात, असे तो म्हणाला होता. डेमॉक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडियाच्या २ ऑक्टोबर २०१७ रोजी झालेल्या बैठकीला संबोधित करताना तो म्हणाला होता की, गौरी लंकेशच्या मारेकऱ्यांना अद्याप पकडण्यात आले नाही आणि ते (मारेकरी) मात्र गौरीच्या मृत्यूचा जल्लोष सोशल मिडियावर साजरा करत आहेत, हे अत्यंत क्लेषदायक आहे. पंतप्रधान या सगळ्या गोष्टींकडे डोळे बंद करून पाहत आहेत. राजकारण्यांवर टीकेची झोड उठवताना तो म्हणाला होता की, आम्हाला कळत नाही की, उत्तरप्रदेशात ते मुख्यमंत्री आहेत, का एका मंदिराचे पुजारी? प्रकाश राज हा गौरी लंकेश यांचा तीन दशकांपासूनचा मित्र. ''गौरींचे वडील लंकेश हे आमचे मार्गदर्शक, शिक्षक आहेत. आम्ही त्यांचे विद्यार्थी आहोत. मी गौरीला ३५ वर्षांपासून ओळखत होतो'', असे त्याने त्यावेळी एका टी.व्ही. चॅनलला सांगितले होते. गौरी लंकेश यांच्या हत्येचा प्रकाश राज याला खूप धक्का बसला होता. देशातलं हे असुरक्षिततेचं वातावरण पाहून मला खरोखरच वाटतं, आपण कुठे जात आहोत, अशी प्रतिक्रिया त्याने व्यक्त केली होती. आपल्या मैत्रिणीच्या मृत्यूच्या अतिव दुःखातून त्याने पंतप्रधानांसह भाजपवरही टीकेची झोड उठवली होती. त्याचवेळी त्याने लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता.



कलाक्षेत्र, बंगळुरू या संस्थेत रूजू झाल्यानंतर या कलावंताने आपल्या करिअरच्या प्रारंभीच्या टप्प्यात महिन्याला ३०० असे नाट्यप्रयोग केले आणि जवळपास २,००० पथनाट्यांत त्याने भूमिका केल्या आहेत. कन्नड दूरदर्शन उद्योग आणि कन्नड सिनेमांमध्ये काही वर्षे काम केल्यानंतर त्याने १९९४ मध्ये के. बालचंदर यांच्या 'ड्यूएट' या तमिळ चित्रपटाद्वारे चित्रपट क्षेत्रात पदार्पण केले आणि तेव्हापासून तो तमिळमधला व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी चित्रपट अभिनेता म्हणून नावारूपास आला. त्याने 'ड्यूएट मूव्हिज' नावाने आपली स्वतःची चित्रपट निर्मिती कंपनी सुरू केली. कन्नड या आपल्या मातृभाषेव्यतिरिक्त प्रकाश राज तमिळ, तेलुगू, मल्ल्याळम, मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांमध्ये अस्खलितपणे बोलू आणि लिहू शकत असल्यामुळे भारतीय सिनेमात सर्वाधिक हवाहवासा वाटणारा कलावंत अशी स्वतःची प्रतिमा त्याने निर्माण केली. त्याने चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका साकारल्या. 'प्रतिस्पर्धी' म्हणून त्याच्या भूमिका विशेष उल्लेखनीय ठरल्या आणि अलीकडे साकारत असलेल्या चरित्र अभिनेत्याच्या भूमिकाही स्मरणात राहणाऱ्या आहेत. मणिरत्नम यांच्या 'इरूवर' या चित्रपटासाठी १९९८ मध्ये उत्कृष्ट सहकलावंताचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार त्याने मिळवला. कृष्णा वामसी दिग्दर्शित 'अंतपूरम' या तेलुगू चित्रपटासाठी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारही त्याने याच वर्षी पटकावला. प्रियदर्शन यांनी दिग्दर्शित केलेल्या 'कांचिवरम' या तमिळ चित्रपटातील भूमिकेसाठी २००७ मध्ये त्याला उत्कृष्ट अभिनयासाठीचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. निर्माता म्हणून त्याने 'पुत्तक्कना हायवे' या कन्नड भाषेतील चित्रपटासाठी उत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार त्याने २०११ मध्ये प्राप्त केला. त्याचा दीर्घकाळापासूनचा रंगभूमीवरील मित्र बी. सुरेश यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला होता.

**वैयक्तिक जीवन :** प्रकाश राज याचा जन्म कर्नाटकात बंगळुरू येथे २६ मार्च १९६५ रोजी एका कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचा भाऊ प्रसाद राय हादेखील अभिनेताच आहे. प्रकाश

राज याचे शिक्षण बंगळुरू येथील सेंट जोसेफ्स इंडियन हायस्कूल आणि सेंट जोसेफ्स वाणिज्य महाविद्यालयात झाले. त्याचे मूळ आडनाव राय असे होते. मात्र, प्रसिद्ध तमिळ चित्रपट दिग्दर्शक के. बालचंदर यांच्या सल्ल्यावरून त्याने राज हे आडनाव धारण केले. तथापि, त्याला त्याच्या राज्यात प्रकाश राय असेच संबोधले जाते. त्याला पहिली पत्नी अभिनेत्री ललिता कुमारी हिच्यापासून दोन मुली आणि एक मुलगा, तर कोरिओग्राफर असलेली दुसरी पत्नी पोनी वर्मा हिच्यापासून एक मुलगा आहे. आपण नास्तिक असल्याचा दावा प्रकाश राज करतो.

प्रकाशने त्याच्या अभिनय कारकीर्दीची सुरूवात कन्नड दूरदर्शनवरील एका मालिकेने केली. त्यानंतर त्याला चित्रपटात सहाय्यक अभिनेत्याच्या भूमिका मिळत गेल्या. केएसएल स्वामी दिग्दर्शित आणि विष्णूवर्धन अभिनित 'हरकेया कुरी' या चित्रपटातील त्याच्या विशेष भूमिकेमुळे पुढे अनेक चित्रपटांमध्ये संधी मिळाली. आजपर्यंतच्या आपल्या कारकीर्दीत त्याने कन्नड भाषेतील ४४, तमिळमधील १४३, तेलुगूमधील १६५, मल्ल्याळममधील १२, हिंदीमधील १५ आणि इंग्रजी भाषेतील २ असे ३८१ चित्रपट केले. त्याने केलेल्या हिंदी चित्रपटांमध्ये शक्ती द-पावर, खाकी आणि वॉण्टेड हे चित्रपट चांगलेच गाजले. त्याने एकूण १७ चित्रपटांची निर्मिती केली. त्यातल्या चार चित्रपटांचे दिग्दर्शनही त्याने केले. सिंघम चित्रपटात नकारात्मक भूमिकेतील उत्कृष्ट अभिनयाचा अप्सरा फिल्म ॲण्ड टेलिव्हीजन प्रोड्यूसर्स गिल्डचा पुरस्कार त्याला देण्यात आला. बॉलिवूड फिल्म इंडस्ट्रितर्फे हा पुरस्कार दिला जातो. त्याने एकूण पाच चित्रपटांसाठी फिल्म फेअर पुरस्कार पटकावले असून त्याच्या ९ चित्रपटांना नामांकन मिळालेले आहे.

**सामाजिक कार्य** : केवळ अभिनेता म्हणून चित्रपट क्षेत्रापुरते मर्यादित न राहता सामाजिक कार्यातही आपण सक्रीय असल्याचे प्रकाश राजने दाखवून दिले आहे. त्याने तेलंगणामधल्या महेबूबनगर जिल्ह्यातील कोंडारेड्डी पल्ले आणि कर्नाटकातल्या चित्रदुर्ग जिल्ह्यातील बंदलराहटी अशी दोन गावे दत्तक घेतली असून त्या गावांमध्ये नागरी सुविधा पुरवून तेथील ग्रामस्थांचे जीवन उंचावण्याचा त्याचा प्रयत्न आहे. केवळ आपल्याच राज्यापुरता विचार न करता शेजारच्या तेलंगणा राज्यातीलही गाव दत्तक घेऊन आपल्यातल्या व्यापक दृष्टिकोनाचा त्याने प्रत्यय दिला.

**आवाज बंद करण्याचा प्रयत्न** : गौरी लंकेश हत्येप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला सार्वजनिक मंचावरून लक्ष्य केल्याबद्दल प्रकाश राज याला ठार मारण्याचा कट गौरी लंकेशच्या मारेकऱ्यांनी रचल्याचे वृत्त एका कन्नड वृत्तवाहिनीने एसआयटीच्या निष्कर्षाच्या आधारे दिले होते. त्यावर, माझा आवाज आणखी वाढेल अशी प्रतिक्रिया त्याने जून २०१८ मध्ये दिली होती. आपला तिरस्कार करणाऱ्यांवर कठोर प्रहार करतानाच, आपला आवाज बंद करण्याचा काही शक्ती प्रयत्न करीत असल्याबद्दल त्याने चिंता व्यक्त केली होती.

**मध्य बंगळुरू मतदारसंघच का?**: प्रकाश राज सांगतो की, मध्य बंगळुरू हा मतदारसंघ त्याच्या भाषिक वैविध्यामुळे एक मिनी भारत बनला आहे. विविध क्षितिजांना गवसणी घालण्यासाठी माझ्या आयुष्याला पंखही येथेच लाभले. शिवाय, मी माझ्या आयुष्यातील सुरुवातीचे काही दिवस मध्य बंगळुरू लोकसभेअंतर्गत येणाऱ्या चामराज पेठ, गांधीनगर, शांतीनगर आणि सुदामा नगर या विधानसभा मतदारसंघांमध्ये वास्तव्य केलेले आहे. अशाप्रकारे या भागाशी आपले एक वेगळे नाते असल्यामुळे येथून निवडणूक लढवत असल्याचे त्याने सांगितले.

## ...तर प्रकाश राज घडवेल इतिहास

गौरी लंकेशच्या मृत्यूप्रती राजकारण्यांच्या बेपर्वाई वृत्तीने प्रकाश राजला राजकारणात आणले. होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत तो २००८ मध्ये अस्तित्वात आलेल्या मध्य बंगळुरू मतदारसंघातून निवडणूक लढवत आहे. २०१४ मध्ये या मतदारसंघातून भाजपचे पी.सी. मोहन हे काँग्रेसच्या रिझवान अर्शद यांना १ लाख ३७ हजार मतांनी पराभूत करून निवडून आले होते. २००९ मध्येही पी.सी. मोहन हेच ३४ हजार मतांनी निवडून आले होते. आता या ठिकाणी अभिनयाकडून राजकारणाकडे वळलेला प्रकाश राज नशीब अजमावत आहे. कर्नाटकात आजपर्यंत २,३७७ अपक्षांनी लोकसभा निवडणूक लढवली. त्यापैकी केवळ दोघेच निवडून आले. १९५७ मध्ये बिजापूर मतदारसंघातून सुगंधी मुरुगप्पा सिद्धप्पा अपक्ष म्हणून निवडून आले होते. त्यानंतर दहा वर्षांनी म्हणजे १९६७ मध्ये पूर्वाश्रमीच्या म्हैसूर प्रांतातील कनडा मतदारसंघातून डी.डी. दत्तात्रय हे अपक्ष निवडून आले होते. या निवडणुकीत प्रकाश राज याने बाजी मारली तर अपक्षाने ५२ वर्षांनंतर कर्नाटकात निवडणूक जिंकल्याचा इतिहास त्याच्या नावे लिहिला जाईल.

**अनेक पुरस्कारांचा मानकरी** : उत्कृष्ट अभिनेत्यासह अनेक पुरस्कार प्रकाश राजला मिळाले आहेत. दि इंटरनॅशनल इंडियन फिल्म अकॅडमीतर्फे दिला जाणारा इंटरनॅशनल इंडियन अकॅडमी पुरस्कार त्याच्या सिंघम चित्रपटाला मिळाला. कलात्मकता आणि तांत्रिक उत्कृष्टता अशा दोन्ही गटात सिंघमने हा पुरस्कार मिळवला. झी सिनेमा अवॉर्डही या चित्रपटाला २०१२ मध्ये मिळाला. 'कन्नथिल मुथमित्तल' चित्रपटासाठी उत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा इंटरनॅशनल तमिळ फिल्म पुरस्कारही त्याला मिळाला आहे. आंध्रप्रदेश सरकारतर्फे तेलुगू चित्रपटासाठी दिला जाणारा नंदी पुरस्कारही त्याच्या सहा चित्रपटांना मिळाला आहे. १९५४ मध्ये स्थापन झालेला नॅशनल फिल्म पुरस्कार त्याच्या वेगवेगळ्या भाषांमधील पाच चित्रपटांना प्राप्त झाला आहे. 'धोनी' सह आठ चित्रपटांना तमिळ राज्य फिल्म पुरस्कार मिळाला. साऊथ इंडियन इंटरनॅशनल अवॉर्ड त्याच्या सहा चित्रपटांना देण्यात आला. या पुरस्कारप्राप्त चित्रपटांमध्येही 'धोनी'चा समावेश आहे. ●●●


# कांचा अइलैया यांच्या नजरेतला हिंदुत्व-मुक्त भारत



डॉ. मिलिंद कसबे


कांचा अइलैया यांची प्रागतिक इतिहासदृष्टी, त्यांची चिकित्सक विवेचनशैली आणि बेधडकपणे वापरलेली नवी शब्दशैली यामुळे या पुस्तकातील अइलैया यांनी मांडलेली मते वाचकांच्या मनात साचलेल्या पूर्वाश्रमींच्या मतांची चिकित्साही करायला भाग पाडते. आर्य-अनार्य संघर्ष, हडप्पा संस्कृतीत सापडलेल्या भटक्या अनार्यांच्या प्रगतीच्या पाऊलखुणा, शेती आणि निसर्गाला आपलेसे करून अनार्यांनी केलेली सांस्कृतिक प्रगती पुढे आर्यांचे वर्चस्व, वैदिक धर्माचे आध्यात्मिक वर्चस्व, जातीसंस्था, विवाहसंस्था या साऱ्या गोष्टी ऐतिहासिकदृष्ट्या तपासल्या की, आज अठरापगड जातीत विभागल्या गेलेल्या भटक्या, दलित, बहुजन आणि आदिवासी जातींनी भारताच्या विकासात मोठे योगदान दिले आहे, असे दिसते. उलट, बाहेरून आलेल्या आर्य वैदिक ब्राह्मण पंरपरेने इथल्या बहुजन समाजाच्या माथी पारलौकीक कल्पना लादून भारतीय संस्कृतीची मोठी सांस्कृतिक हानी केली आहे.

बहुचर्चित लेखक कांचा अइलैया यांच्या पुस्तकांनी भारताच्या सांस्कृतिक जीवनात मोठी खळबळ उडवून दिली. हिंदुत्वयुक्त भारताचे चित्र अधिक गडद होत असताना कांचा अइलैया यांनी आपल्या लेखनातून हिंदुत्वमुक्त भारताचे जे चित्र रंगविले आहे ते समजून घेणे आज फार महत्त्वाचे आहे. कांचा अइलैया हे आपल्या सडेतोड, वादग्रस्त आणि संशोधकीय लेखनासाठी प्रसिद्ध आहेत. Why I am not a Hindu, Buffalo Nationalism आणि Post-Hindu India; ही त्यांची काही महत्त्वाची पुस्तके




आहेत. दलित, बहुजनांचे भारताच्या सांस्कृतिक उत्थापनात किती महत्त्वाचे योगदान आहे, याचे ऐतिहासिक सत्य तपासून मांडणी करण्याचे काम कांचा अइलैया करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून ज्याप्रकारचे कडवे हिंदुत्व आपल्यासमोर येत आहे ते पाहता वैदिक हिंदुत्ववादी परंपरा अधिकाधिक नार्शिस्ट होताना दिसत आहे. वैदिक ब्राह्मणी परंपरेनी भारतातील बहुजन हिंदुच्या माथी जे धर्मकेंद्री हिंदुत्व लादले, त्या हिंदुत्वाने ना भारताचा विकास झाला; ना भारतातल्या मूळ दलित-बहुजन समाजाचा विकास झाला. आता तर भाजपच्या रूपाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ज्या हिंदुत्वाचा प्रचार आणि प्रसार करत आहे, ते हिंदुत्व भारताच्या बहुसांस्कृतिक अस्तित्वाला चहुबाजूंनी छेद देणारे आहे.

आज मोदी सरकारला संसदेत बहुमत मिळाल्यापासून आरएसएस ज्या पद्धतीने बहुजन समाजात जाऊन हिंदुत्वाचा नारा देत आहे, ते पाहता आरएसएसला सांस्कृतिक आणि राजकीय अशा दोन्ही क्षेत्रात आध्यात्मिक हुकूमशाही प्रस्थापित करण्याची घाई झाली आहे, असे दिसते. घरवापसी, गोहत्याबंदी, योगी आदित्यनाथांचे मुख्यमंत्री होणे, मुस्लिमांचा द्वेष, संविधान बदलाची मनिषा, अभिव्यक्ती स्वांतत्र्याची गळचेपी, विचावंतांच्या हत्या, डार्विन आणि त्यानंतरच्या आधुनिक विज्ञानाला नकार ते



**दलित, बहुजनांचे भारताच्या सांस्कृतिक उत्थापनात किती महत्त्वाचे योगदान आहे, याचे ऐतिहासिक सत्य तपासून मांडणी करण्याचे काम कांचा अइलैया करत आहेत.**

अगदी साध्वी प्रज्ञा ठाकूर यांनी शहीद करकरे यांना दिलेला कथित शाप यांसारख्या अनेक गोष्टी पाहिल्या की, भारताला हिंदू राष्ट्र बनविण्याची मोठी मोहीम संघ आणि संघाचे पाठीराखे करत आहेत, हे कुणाच्याही लक्षात येईल. भारतात २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकारला अशा आध्यात्मिक हिंदुत्वाचा प्रसार करणं क्रमप्राप्त आहे. हे जरी आपण समजून घेतलं तरी भारताच्या समग्र सांस्कृतिक जीवनात रुजलेलं हिंदुत्व आणि संघ आणि भाजपला अपेक्षित असलेलं हिंदुत्व या दोन्ही हिंदुत्वांत मात्र फरक दिसतो. महाराष्ट्रात शिवसेना हा हिंदुत्वाचा अभिमान बाळगणारा राजकीय पक्ष आहे; परंतु शिवसेना आणि भाजप या दोन्ही पक्षांच्या हिंदुत्वाच्या मांडणीत मात्र फरक आहे. शिवसेनेने बहुजनांना एकत्रित करून जे हिंदुत्व रुजवलं ते भाजपने वैदिक परंपरेला प्रमाण मानून रुजवलेल्या आध्यात्मिक हिंदुत्वापेक्षा वेगळे आहे.

भारताच्या सामाजिक आणि राजकीय विचारविश्वात पुरोगामी आणि प्रतिगामी अशा दोन्ही बाजूंत हिंदुत्वाबद्दल वाद-प्रतिवादावर उभे असलेले विचारमंथन पाहत असताना कांचा अइलैया यांचे 'हिंदुत्व-मुक्त भारत' हे वादग्रस्त पुस्तक हातात पडले. खरे तर कांचा अइलैया यांच्याबद्दल खूप काही ऐकून होतो. त्यांच्या ज्वलंत लेखनाबद्दल उत्सुकता होतीच. या पुस्तकाच्या अंतरंगात शिरण्यापूर्वी अइलैया यांच्याबद्दलची प्राथमिक माहिती इंटरनेटच्या माध्यमात शोधली तेव्हा हा लेखक आपल्या नावामागे 'शेफर्ड' अशी जातीवाचक संज्ञा अभिमानाने लावतो, हेही समजले. दुसरी एक बातमी मिळाली की, आर्य आणि वैश्य (अईलैया यांच्या भाषेत ब्राह्मण आणि बनिया) यांनी मांसाहाराला कसे प्रोत्साहन दिले याविषयी त्यांनी जे ऐतिहासिक पुरावे दिले, त्याबद्दल आंध्रप्रदेशात त्यांच्यावर कलम १५३ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला. तेलुगूमध्ये प्रकाशित झालेल्या अइलैया यांच्या या लेखनाबद्दल सनातनी हिंदुत्ववाद्यांनी बराच गोंधळ घातल्याचीही माहिती मिळाली. कांचा अइलैया यांच्या मतांचा निषेध करणारे संपादकीय त्यावेळच्या सप्टेंबर १७ च्या 'सनातन प्रभात'च्या अंकात लिहिले गेले असेही दिसते. एकूणच काय तर कांचा अइलैया यांचे 'हिंदुत्व-मुक्त भारत' हे बहुचर्चित पुस्तक वाचण्याची उत्सुकता अधिक वाढली.

सेज या नामांकीत प्रकाशनाने कांचा अइलैया यांचे "Post-hindu India a discourse on dalit-bahujan socio-spiritual and scientific revolution' हे इंग्रजी भाषेतले पुस्तक २००९ साली प्रकाशित केले. त्यानंतर २०१७ मध्ये या पुस्तकाचे बी.सुरेश आणि सेज टिमने केलेले मराठी भाषांतर प्रकाशित झाले. हे पुस्तक मराठीत भाषांतरीत झाल्यामुळे मराठीतील वैचारिक लेखनाच्या वाचकांना हिंदुत्त्वाची चिकित्सा करणारी भारतीय पातळीवरची एक सनसनाटी मांडणी मिळाली. कांचा अइलैया यांची प्रागतिक इतिहासदृष्टी, त्यांची चिकित्सक विवेचनशैली आणि बेधडकपणे वापरलेली नवी शब्दशैली यामुळे या पुस्तकातील अइलैया यांनी मांडलेली मते वाचकांच्या मनात साचलेल्या पूर्वाश्रमींच्या मतांची चिकित्साही करायला भाग पाडते. आर्य-अनार्य संघर्ष, हडप्पा संस्कृतीत सापडलेल्या भटक्या अनार्यांच्या प्रगतीच्या पाऊलखुणा, शेती आणि निसर्गाला आपलेसे करून अनार्यांनी केलेली सांस्कृतिक प्रगती पुढे आर्यांचे वर्चस्व, वैदिक धर्माचे आध्यात्मिक वर्चस्व, जातीसंस्था, विवाहसंस्था या साऱ्या गोष्टी ऐतिहासिकदृष्ट्या तपासल्या की, आज अठरापगड जातीत विभागल्या गेलेल्या भटक्या, दलित, बहुजन आणि आदिवासी जातींनी भारताच्या विकासात मोठे योगदान दिले आहे, असे दिसते. उलट, बाहेरून आलेल्या आर्य वैदिक ब्राह्मण परंपरेने इथल्या बहुजन समाजाच्या माथी पारलौकीक कल्पना लादून भारतीय संस्कृतीची मोठी सांस्कृतिक हानी केली आहे. आजच्या ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर जातींनी वैदिक आर्य ब्राह्मणांच्या आध्यात्मिक कचाट्यातून सुटून सम्यक वृत्तीने विज्ञानवादी होणे महत्त्वाचे आहे. कांचा अइलैया यांनी या पुस्तकात जी मांडणी केली आहे ती याच आशयाची आहे. भगवान गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारसूत्र केंद्रस्थानी ठेऊन अइलैया ही सारी मांडणी करतात. एकूण बारा प्रकरणात विभागलेल्या या पुस्तकात मोबदला न मिळालेले शिक्षक, अज्ञान वैज्ञानिक, समाजाचे शल्यविशारद, मांस आणि दुधाचे अर्थशास्त्रज्ञ, सामाजिक तस्कर, आध्यात्मिक फॅसिस्ट, बुद्धिजीवी गुंड, नागरी युद्धाची चिन्हे आणि हिंदुत्त्वाची अखेर ही महत्त्वाची कारणे आहेत.

भारतात केवळ द्विजांनाच हिंदू असे संबोधणे आणि उरलेल्यांची शुद्र, चांडाळे, वनवासी म्हणून गणना करणे ही ऐतिहासिकदृष्ट्या एक विघातक प्रक्रिया होती. या प्रक्रियेत आदिवासींची एकत्र मोट बांधल्यामुळे त्यांची स्वतंत्र ओळख पुसली गेली असे अइलैया यांना वाटते. आदिवासींनी जगण्याचे सार इतर समाजाला शिकवले. ते खऱ्या अर्थाने भारतीय खाद्य संस्कृतीचे जनक आहेत. वेगवेगळ्या प्राण्यांचे मांस खायला आणि वेगवेगळ्या पालेभाज्यांची चव

## ग्रंथातील अवतरणे

''हिंदू धर्मातील जातीयवादामुळे भारतभूमी आधुनिक काळातही शास्त्रीय शोधापासून वंचित राहिली. हा देश इतर देशांकडून उसनवारीवर घेतलेल्या आधुनिक विज्ञानावरच तगून राहिला आणि या परिस्थितीत मुख्यतः ब्राह्मणी बुद्धिजीवीच कारणीभूत आहेत.''
– कांचा अइलैया
**(हिंदुत्व-मुक्त भारत – प्रस्तावना, पृ-६)**

''ब्राह्मणी आध्यात्मिक व्यवस्थेला 'हिंदू' अशी ओळख मुस्लिम विद्वानांनी, मुख्यतः अल बिरूनी याने दिली होती. त्याने त्याचे प्रसिद्ध पुस्तक 'अल हिंद' यात ही संज्ञा वापरली आणि त्यानंतरच्या हिंदू राजांनी आणि आध्यात्मिक व्यवस्थांनी तीच स्वीकारली आणि स्ततःचीच म्हणून वापरली.''
**(पृ-७)**

''जागतिकीकरणाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक प्रक्रियेने आता दलित-बहुजन जनसमुदायांना या डबक्यांतून बाहेर काढण्यास सुरुवात केली आहे.''

''ओबीसी जनतेस आणि त्यांच्या वैचारिक नेतृत्त्वास हे कळून चुकले असेल की, हिंदू धर्मात राहून त्यांचा उद्धार होणे अशक्य आहे. हिंदू ब्राह्मणत्त्वाच्या गुलामगिरीत असणाऱ्या शुद्रांमध्येही हा समज हळूहळू वाढत जाईल. मात्र समानतेचा प्रश्न संविधानाच्या चौकटीतच सोडवण्याच्या प्रयत्नांना ब्राह्मणी शक्ती सतत खीळ घालत राहणार.''
**(हिंदुत्व-मुक्त भारत – पृ-२४०)**

''इंग्रजी भाषा संस्कृतकेंद्री भारतीय भाषांचा पाया कमकुवत करत आहे आणि हा काळ असाच पुढे चालावा अशीच दलित-बहुजन जनतेची इच्छा आहे. इंग्रजीचा हा विस्तार रोखण्यास ब्राह्मणी हिंदू समर्थ नाहीत, कारण ते स्वतःच त्यात रूतत गेलेले आहेत. इंग्रजीने जर संस्कृतोद्भव भारतीय भाषांची जागा घेतली तर दलित-बहुजनांची मुक्ती बहुआयामी पद्धतीने होईल.''

''जाती व्यवस्था आणि अंधश्रद्धा यांचे जोपर्यंत पूर्णपणे निर्मूलन केले जात नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने विज्ञाननिष्ठ भारत निर्माण होण्याची शक्यता नाही.''

''ब्राह्मण आणि बनिया म्हणजे मानवी समाजात शतकानुशतके वावरणारी श्वापदे आहेत.''

''दुर्दैवाने या देशातली संपूर्ण शिक्षणपद्धती ही बौद्धिक कुतर्काने ग्रस्त झालेली आहे. सरकारने आणि खाजगी संस्थांनी श्रम प्रतिष्ठा, वैज्ञानिक मनोवृत्ती, आध्यात्मिक आणि सामाजिक लोकशाही आणि बौद्धिक प्रामाणिकपणा या गोष्टी नेहमीच नाकारल्या आहेत.''

''आधुनिक घटनात्मक शासनव्यवस्था जर आध्यात्मिक फॅसिझमच्या पकडीतून सुटू दिली तर राज्यसंस्था धर्मसंस्थेला बाजूला सारेल आणि आध्यात्मिक फॅसिझमची मुळेच उखडून टाकेल.''
**(पृ-२२०)**

चाखायला आदिवासींनीच आपल्याला शिकविले; परंतु याउलट शाकाहार हे दैवी खाणे आहे असा समज पसरवून आदिवासींच्या खाद्य संस्कृतीला असंस्कृत संबोधून ब्राह्मणांनी आदिवासींची निंदा केली. असे सांगून कांचा अइलैया यांनी मांसाहाराबद्दल जी मांडणी केली आहे ती आजच्या गोमांससंबंधीच्या पार्श्वभूमीवर फारच महत्त्वाची आहे. त्यांच्या मते ''ब्राह्मणी संस्कृतीने असे अनेक खाद्यपदार्थ नाकारले आहेत आणि फक्त शाकाहारी अन्नच समाजासाठी चांगले आहे, असा त्यांचा वर्चस्ववादी प्रचार चालू ठेवला. आदिवासींना शाकाहारी खाणे माहीत नाही किंवा फळे-कंदमुळे माहीत नाहीत अशातला भाग नाही, तर मांसाहारात असणारा स्वादिष्टपणा आणि ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता यामुळे ते मांसाहारालाही तितकेच महत्त्व देतात. या ऐतिहासिक पार्श्वभूमीतून हे स्पष्ट होते की, शाकाहार अधिक उत्कृष्ट आहे. हा प्रचार म्हणजे केवळ एक मिथकच आहे. मांसाहाराला नकार देऊन आणि शाकाहाराचे अवास्तव महत्त्व वाढवून ब्राह्मणी संस्कृतीने भारताचे आरोग्य कमकुवत केले आहे. ब्राह्मणवाद आणि गांधीवाद

यांनी केलेल्या प्रचारामुळे भारतीय समाज अधिकाधिक शाकाहारी होत गेला आणि त्याचा परिणाम म्हणून देशाच्या सर्वसाधारण आरोग्यावर परिणाम झाला.'' (पृ.१०) कांचा अइलैया यांचे हे विश्लेषण आजच्या अध्यात्मिक ब्राह्मणी संस्कृतीला धोकादायक आहे हे नक्कीच; परंतु आदिवासींबरोबरच भारतातील मेंढपाळ, माडीग आणि चांभार, धोबी, लोहार, सुतार, न्हावी व इतर शुद्र जातीसमुहांनी भारतीय संस्कृतीच्या सामाजिक, आर्थिक विकासात जे योगदान दिले आहे, त्याची अभ्यासपूर्ण मांडणी या पुस्तकात केली आहे.

भारतात माडीग-चांभार यांनी मृत प्राण्याच्या शरीरावर प्रक्रिया करून त्याच्या विविध घटकांचा वापर करून जीवितांच्या उपयोगाच्या वस्तू बनविण्यास कसे प्राधान्य दिले, याची सखोल माहिती सांगून भारतातील कृषीक्रांती ही चामड्याच्या उपकरणांमुळे शक्य झाली असे म्हटले आहे. चामड्यापासून रोजच्या उपयोगाच्या वस्तू बनवताना चांभारांनी वापरलेले ज्ञान हे जसे विज्ञाननिष्ठ होते, तसेच ते सर्जनशीलही होते, असेही अइलैया म्हणतात.

चामड्याचा लोखंडाशी संबंध आला, लोहाराचा भाता आला आणि पुढे या संयोगातून शेतीची अवजारे तयार झाली. चामडे आणि शेती, डफ आणि भारतीय संगीत कला संस्कृती, चामड्याचा डफ नृत्य व गाणे असा चांभारांनी विकसित केलेला भारतीय संस्कृतीचा मोठा पट अइलैया यांच्या या पुस्तकात वाचायला मिळतो. भारतातील शुद्र धोब्यांनी धुलाईचे जे तत्त्वज्ञान विकसित केले, मनुष्यप्राण्याने आपल्या शरीराचे रक्षण व्हावे म्हणून तसेच शरीराची उत्पादक क्षमता वाढावी म्हणून अंगावर कपडे घालण्यास सुरुवात केली. कपडे घालण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींतून पुढे सांस्कृतिक सौंदर्यशास्त्राचा मोठा पट उभा राहिला. वस्त्रांना स्वच्छ करून त्यांची सुंदरता वाढविण्याचे काम धोब्यांनी केले. त्यात न्हाव्यांनीही मोठे योगदान दिले. धोबी आणि न्हावी या दोन्ही जातींनी भारतीय समाजाला नवे सांस्कृतिक सौंदर्य बहाल केले. त्यांचे संस्कृतीच्या विकासात मोठे योगदान आहे. हे योगदान खऱ्या अर्थाने वैज्ञानिक आहे. उलट, आध्यात्मिक ब्राह्मणी परंपरेने जटा-बटा वाढवून जो नग्न राहण्याचा आध्यात्मिक संदेश दिला, तो मात्र मानवी विकासासाठी घातक होता असेही अइलैया सुचित करतात. थोडक्यात काय, तर ब्राह्मणी हिंदुत्त्वाने जातीव्यवस्थेचा बडगा आणि देव नावाच्या अनाकलनीय कल्पनेचा धाक दाखवून भारतातील बहुजन समाजाला त्याच्या सांस्कृतिक आणि आर्थिक उन्नतीपासून दूर ठेवले असे अइलैया यांना म्हणायचे आहे. उलट, भारतातल्या दलित, बहुजन आणि भटक्या, आदिवासींनी भारतीय संस्कृतीच्या विकासात मोठे योगदान दिले आहे, असा निष्कर्ष अइलैया यांचे पुस्तक वाचकांसमोर मांडते.

हिंदुत्त्वाची अखेर म्हणजे भारताची अखेर नसेल असे अइलैया यांना वाटते. हिंदुत्त्वाच्या आध्यात्मिक, फॅसिस्ट प्रवृत्तीमुळे तो बौद्ध, इस्लाम आणि ख्रिश्चन या धर्मांप्रमाणे एक आंतरराष्ट्रीय धर्म बनू शकला नाही. तो या उपखंडातच एक जाचक धर्म बनून राहिला. बौद्ध, ख्रिश्चन आणि इस्लाम धर्माचा प्रसार वाढतो आहे. कारण आपण एकात्म सांस्कृतिक समाजाचा भाग बनावे अशी भारतातल्या दलित, बहुजनांची इच्छा आहे, असे सूचित करून अइलैया म्हणतात, ''हिंदू धर्म आणि काळ टिकणे या देशाच्या आणि देशवासियांच्या हिताचे नाही. ऐतिहासिकदृष्ट्या पाहिल्यास ब्राह्मणत्त्वाने दलित-बहुजन मागास रहावेत म्हणूनच प्रयत्न केल्यामुळे आता या वर्गांनी हिंदू धर्माचे विखंडन करण्यासाठी लढा उभारला पाहिजे. कारण यातूनच त्यांच्या मुक्तीचा मार्ग निर्माण होणार आहे.'' (पृ-२६९) कांचा अइलैया यांनी अपेक्षिलेला बहुजनांचा लढा बहुजन जातींच्या जनआंदोलनांच्या रूपाने दिसतो आहे. महाराष्ट्रात दलितांवरील अत्याचार, भीमा-कोरेगाव प्रकरण, मराठा आणि ओबीसींच्या आरक्षणाचे लोकलढे, जनआंदोलने या साऱ्या गोष्टी पाहता आणि देशभरातला वंचित समूह ज्या पद्धतीने संघटित होत आहे हे पाहता भारत नागरी लढ्यांच्या उंबरठ्यावर उभा आहे, हे खरे आहे. या लढ्यांना अइलैया यांनी 'नागरी युद्ध' म्हटले आहे. कांचा अइलैया या लढ्यांकडे सकारात्मक नजरेने पाहताना दिसतात. या नागरी युद्धांतून ओबीसी, दलित, बहुजन समाजातून नवे नायक उभे राहतील हे अइलैया यांचे भाकित कन्हैया कुमार, हार्दीक पटेल, जिग्नेश मेवानी यासारख्या लढावू तरूणांकडे पाहताना खरे ठरले आहे, असेच दिसते. या पुस्तकाच्या शेवटच्या भागात वैदिक हिंदुत्त्वाचा अंत कसा होईल याविषयी अइलैया यांची मतेही तेवढीच जहाल आहेत. त्यांचा स्वीकार करणे असो किंवा ती आचरणात आणणे असो, ब्राह्मणेत्तर उच्चवर्णीय स्पृश्य जातींना सांस्कृतिकदृष्ट्या जड जाणारे असले तरी आवश्यक मात्र आहे. अइलैया म्हणतात, ''एक सामाजिक व्यवस्था म्हणून ब्राह्मणत्त्व हे एड्सपेक्षाही धोकादायक आहे. एड्सवर औषध शोधून त्याचा नाश करता येईल, पण ब्राह्मणत्वाचा नाश करण्यासाठी एक दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण लढाच सुरू ठेवावा लागेल. ब्राह्मणत्त्वाने प्रदीर्घ काळापासून स्वजातीचे रक्षण करण्यासाठी लाखो लोकांची हत्या केली आहे. भारतात जे नागरी युद्ध घडून येईल, ते कदाचित जगातले शेवटचे नागरी युद्ध असेल; त्यात जवळजवळ ७० कोटी लोकांना गुलामगिरीच्या आदिम पातळीवरून म्हणजेच आध्यात्मिक गुलामगिरीतून मुक्त केले जाईल.'' (पृ-२७०)

आपल्या विवेचनात डॉ. अइलैया यांनी अत्यंत ज्वलंत अशी विधाने केली आहेत. बुद्धिजीवी गुंड, सामाजिक तस्कर, आध्यात्मिक फॅसिस्ट अशा उपाध्या लावत त्यांनी ब्राह्मणी हिंदुत्त्वाचा पर्दाफाश केला आहे. या पुस्तकातील अइलैया यांचे विवेचन इतिहासाची चिकित्सा करत जागतिकीकरणात उभ्या असलेल्या आजच्या सांस्कृतिक संघर्षावर भाष्य करते आणि त्यावरचे उपायही सुचवते. महाराष्ट्रातील परिवर्तनवाद्यांसाठी दलित-बहुजन समाजासाठी हे पुस्तक फारच महत्त्वाचे आहे. ●●●

**हिंदुत्व-मुक्त भारत**
**(दलित, बहुजन, सामाजिक-आध्यात्मिक आणि वैज्ञानिक क्रांतीवरील चिंतन) - कांचा अइलैया**
**- सेझ पब्लिकेशन, दिल्ली - पृष्ठे - ३०४, किंमत - ३५०**

# शापवाल्या साध्वी



हेमंत करकरेंना मी शाप दिला म्हणूनच त्यांचा दहशतवादी हल्ल्यात सर्वनाश झाला, असं एक बोगस पण खळबळजनक विधान भाजपच्या कमळावर निवडणूक लढवणाऱ्या स्वयंघोषित साध्वी प्रज्ञा यांनी केलं आहे. खरं तर, असं विधान करून प्रसिद्धीत राहणाऱ्या आणि स्वधर्माच्या नावाखाली परधर्माचा द्वेष करणाऱ्या महिलांची एक फौजच हिंदुत्ववाद्यांनी तयार केली आहे. साध्वी असं गोड नाव त्यांना दिलं आहे. यापैकी प्रज्ञा एक, उमा एक आणि अजून कोणी कोणी तरी... बाबरी मशीद पाडल्यानंतर उमा भारती ज्या उत्साहानं नाचल्या तो अजून लोकांच्या समोर आहे. त्याचं बक्षीस त्यांना मिळालं. त्या मुख्यमंत्री झाल्या. केंद्रात मंत्री झाल्या. भगव्याला त्यांनी सत्तेचं तेज प्राप्त करून दिलं. त्यानंतर आता मालेगाव बॉम्बस्फोट आणि त्यात झालेल्या जीवित हानीसंदर्भात तुरुंगात असलेल्या साध्वी प्रज्ञा या जामिनावर सुटल्यावर लक्षवेधी होण्यासाठी खळबळजनक विधानं करत सुटल्या आहेत. खरं तर त्यांना भाजपनं तिकीट कसं दिलं, हा सर्वसामान्यांसमोरचा प्रश्न आहे. पण काही करून आणि त्यातही देवा-धर्माचा वापर करून सत्ता हे भाजपचं ब्रीद असल्यानं उमेदवारीविषयी कुणाला आश्चर्य वाटलं नाही. त्यातही रोज सामान्यांच्या नावानं गळा काढणारे मोदी आता प्रचारसभेत 'जय श्रीराम'चा नारा देत आहेत.

साध्वी प्रज्ञांचं म्हणणं असं आहे की, करकरे यांनी मुद्दामहून आपल्याला खटल्यात गुंतवलं. ज्या दिवशी खटल्यात गुंतवलं त्या दिवशी त्यांना सुतक लागलं आणि बरोबर सव्वा महिन्यानं जेव्हा मी तुरुंगात गेले तेव्हा सुतक संपलं; कारण दहशतवाद्यांनी करकरेंना मारलं. मी त्यांना शाप दिला होता. आता शाप देणाऱ्या बाई खरंच बोलताहेत असं वादाकरता मान्य केलं तर करकरेंना शाप मिळाला यावर जसा विश्वास ठेवावा लागतो, तसा दहशतवाद्यांना आशीर्वाद मिळाला हेही तर्कशास्त्रीयदृष्ट्या मान्यच करावं लागतं. महाभारतात डोळ्याला पट्टी बांधल्यावर गांधारीच्या डोळ्यात प्रचंड तेज साचलं होतं असं म्हणतात; पण प्रज्ञांनी असं काही केलं नव्हतं. कुठं डोंगरावर तपश्चर्या केली नव्हती, मग शाप देण्याची क्षमता त्यांच्यात आली कोठून, हाही प्रश्न येतोच. त्यांच्यात शाप देण्याची एवढी क्षमता असेल तर त्यांनी ती करकरेंऐवजी दहशतवादीच खलास करण्यासाठी ही शापाची क्षमता का वापरली नाही? तसं केलं असतं तर सर्जिकल स्ट्राईक करून घरात घुसून कुणाला मारण्याची गरज भासली नसती. आपले जवान मारले गेले नसते. आपल्या साध्वीपणाची क्षमता देशाचे आणि माणसाचे दुश्मन संपवण्यासाठी का वापरली नाही? पण या प्रश्नांची उत्तरं कोणी देणार नाहीत. साध्वी ज्या बोलतात तसं इतर कोणी बोललं असतं तर देशद्रोहाखाली त्यांना तुरुंगात टाकलं असतं. साध्वी तुरुंगातून बाहेर येणे, निवडणूक लढवणे हा योगायोग आहे की घडवला गेलेला चमत्कार आहे, याचीही शहानिशा होईलच; पण तोपर्यंत काळ सोकावण्याची शक्यता आहे. त्या मतं गोळा करायला लागतील. आपण तुरुंगात जाऊन आलो हीच आपली पात्रता आहे असं ओरडून सांगायला लागतील. तुरुंगात कशासाठी गेल्या हे मात्र त्या सांगणार नाहीत.

धर्मनिरपेक्ष असलेल्या देशात राज्यघटनेवर धर्माचं आणि भांडवलाचं आक्रमण होणं धोकादायक आहे, असं डॉ. बाबासाहेबांनी मनमाडच्या कामगार सभेत बजावून ठेवलं होतं; पण आता घडतंय तसंच. विधानसभेपासून लोकसभेपर्यंत निवडून जाण्यासाठी साधू-संतांची ही गर्दी! हे सारे लोकसभेत जाऊन काय करणार? धर्माचे राष्ट्र बनवणार की अजून काही हेही दिसते आहे. खऱ्या अर्थानं साधू-साध्वी बनण्याची परंपरा हिंदू धर्मातून बऱ्याच वर्षांपूर्वी हद्दपार झाली आहे. कबिरापासून तुकारामांपर्यंत अनेकांनी स्वार्थी, पोटभरू, चारित्र्यहीन साधू- संतांवर हल्ला केला आहे. समाजाला साधूंची गरज असते; पण कोणत्या? 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टवीती उपकारे। किंवा जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले किंवा न लगे मुक्ती धनसंपदा' असंही तुकारामांनी म्हणून ठेवलंय. सज्जन, परोपकारी, पुण्यशील, सदाचरणी, निर्वैर, निरपेक्ष, निःसंग, षड्रिपूंना जवळ न करणारे, अंतर्बाह्य शुद्ध, निष्पाप, निश्चल, श्रद्धायुक्त, क्षमाशील, दयाळू, जितेंद्रिय, परोपकारी, परपीडा पाहून दुःखी होणारे वैरागी, शुद्ध आणि सात्त्विक जीवन जगणारे आणि म. गांधींच्या प्रार्थनेतले 'जो पीड पराये जाने रे' यांना साधू-साध्वी म्हणतात. आता यातली कोणती लक्षणं साध्वी प्रज्ञांकडे आहेत हे शोधण्याची स्पर्धा घ्यावी. धर्माचा राजकारणासाठी वापर करून घेण्याची गरज निर्माण झाल्यानं साधूंची गरजही वाढली आहे. साधू क्षमाशील असतो. विंचू त्याला चावला म्हणून तो विंचवाला चावत नाही आणि मारत नाही आणि या शापवाल्याबाई? त्या तर दया, करुणा, क्षमा, शांतीऐवजी शापाचं क्षेपणास्त्र घेऊन फिरत आहेत. एका कर्तबगार, देशभक्त अधिकाऱ्याला शाप देताना यांना लाज कशी वाटली नाही आणि काँग्रेस आघाडीच्या जाहिरातीत ही गोष्ट कशी काय आली नाही?

तर या साध्वी कोण? असा प्रश्न कुणालाही पडेल. बाबरी मशीद पाडल्याचे आणि तीही घुमटावर जाऊन पाडल्याचं खरं

-खोटं श्रेय घेणाऱ्यांमध्ये या शापवाल्या एक बाई आहेत. आपण जणू महान, ऐतिहासिक काम केलं या भ्रमात त्या जगत आहेत. आपल्या परिचय पत्रात त्यांनी या गोष्टीला जागा दिलीय. जसं की कुणी स्वातंत्र्यसैनिक तसं या बाबरी विध्वंसक! तर यांचं मूळ नाव साध्वी प्रज्ञासिंग ठाकूर. त्यांचा जन्म सत्तरीतल्या दोन फेब्रुवारीचा. साधूचं कुळ आणि नदीचं मूळ विचारू नये असं म्हणतात; पण या स्वतःच कुळ आणि मुळाचा बायोडाटा रोज सांगत असतात. त्यांचे वडील आयुर्वेदातले डॉक्टर आणि संघाचे निष्ठावान प्रचारक. मध्य प्रदेशातलं भिंड हे त्यांचं गाव. साध्वीला एक बहीण आहे. तिचं नाव उपमा सिंग. अलीकडं अध्यात्म क्षेत्रात खूप चलती आहे. झटपट नाव कमवता येतं. मतिमंद बनवता येतं. अध्यात्माच्या पायरीवरून राजकारणात जाता येतं. तुरुंगात आपला खूप छळ झाला-प्रकृती बिघडली यांसह अनेक कारणं त्यांनी सतत सांगितली. तुरुंगात त्यांचा छळ झाला हे मानवी हक्क आयोगानंही अमान्य केलं; पण वैद्यकीय पथकाला साध्वीला कोणता आजार असल्याचं आढळलं नाही. मोक्कांतर्गत कारवाई रद्द झाली आणि त्या बाहेर सुटल्या. गोमुत्रामुळे स्तनाचा कॅन्सर बरा होतो, हा त्यांचा दावा अजूनही गाजतोयच.



**मोदींचे स्वागत करताना डोम राजा जगदीश चौधरी व इतर.**

## नमो नमो डोम राजा

तांत्रिकांमध्ये प्रसिद्ध असलेल्या कालभैरवाची मनोभावे पूजा करून नरेंद्र मोदी यांनी हिंदुत्वाची राजधानी बनू पाहणाऱ्या किंवा बनवल्या जाणाऱ्या वाराणसीतून उमेदवारी अर्ज केला. अलीकडे कसलाच विधायक शो करता येत नाही म्हणून बहुतेक नेते 'रोड शो' करतात. म्हणजे स्वतःची मिरवणूक काढतात. दुतर्फा जमलेल्या गर्दीला पुनः पुन्हा नमस्कार करतात. निवडणुका जवळ येतील तशा मोदींच्या ओठावरील घोषणाही बदलू लागल्या. 'जय हिंद' बरोबरच 'जय श्रीराम' येऊ लागलं. तसं ते निवडणूक जाहीरनाम्यातही आहे. जणू काही सत्ता कमवण्याचं एकमेव उद्दिष्ट म्हणजे राम मंदिर. अर्थात, ते साध्य झालं तर भाजपला निवडणुकीत दुसरा विषय असणार नाही. दुसरा म्हणजे क्लिक होणारा....!

मोदी नेहमी वेगळं काही तरी करतात. त्यासाठी गरिबांची त्यांना खूप मदत होते. एकदा त्यांनी स्वच्छता कामगारांचे पाय धुतले आणि धो धो प्रसिद्धी मिळवली. माध्यमांचं एक बरं आहे. स्वच्छता कामगारांचे पाय खराब का होतात, ते का फुटतात यावर ते कधी बातम्या देणार नाहीत; पण जबरदस्तीनं 'मन की बात' सांगत मोदींनी पाय धुतले की वैश्विक बातमी होते, टी. आर.पी. वाढतो. अर्थात, माध्यमे आणि मोदींचचेच नव्हे तर माध्यमांचं एक सूत्रच आहे की - कुत्रा माणसाला चावला की बातमी नाही; पण माणूस कुत्र्याला चावला की वैश्विक बातमी. मोदी अशा वैश्विक बातम्या तयार करण्यात पटाईत आणि त्यांचे झिलकरी त्या प्रसार करण्यात पटाईत. नरेंद्र मोदी यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना अशीच वैश्विक बातमी बनेल याची काळजी घेतली. उमेदवारी अर्जावर काही मतदारांनी प्रस्तावक म्हणून सही करायची असते. अर्थात, हे सारे मतदारसंघातील असावे लागतात. मोदींनी एक प्रस्तावक असा निवडला की, गंगेच्या काठी तो प्रेतं जाळण्याचं काम परंपरेनं करत आलाय. असं काम करणाऱ्यांना डोम राजा म्हणतात. प्रत्यक्षात रोजीरोटी मिळवताना त्याची अवस्था भिकाऱ्यासारखी असते; पण आपल्या संस्कृतीनं त्याला राजा हे विशेषण मोठ्या उत्साहात आणि वर्षानुवर्षे हेच काम करावं म्हणून दिलंय. तर जगदीश राजा चौधरी यांनी मोदींच्या उमेदवारी अर्जावर प्रस्तावक म्हणून आपलं नाव टाकलं आणि ही बातमी वैश्विक बनली. बघा बघा काँग्रेसनं सत्तर वर्षांत केलं नाही ते मोदींनी केलं. हा डोम राजा पिढ्यान्‌पिढ्या अंत्यसंस्काराचं काम करत आलाय. दिवसभर त्याची भेट होते ती प्रेताशीच.

जातीव्यवस्थेत सर्वांत खालची पायरी डोमची. अंत्यसंस्कार वगळता त्याला कोणी मानसन्मान देत नाही. त्याच्याशी कोणी सामाजिक, कौटुंबिक संबंधही ठेवत नाहीत. वाराणसीत मरण आले की मोक्ष मिळतो म्हणून येथे अनेक जण मरायला येतात किंवा बाहेर मरण पावलेल्यांची प्रेते अंत्यसंस्कारासाठी येतात. अतिशय जिकिरीचं काम असतं. प्रेतांची गर्दी जास्त. वेळ कमी. जागा कमी. मनुष्यबळ कमी. मग कारखान्याप्रमाणे शिफ्टमध्ये हे काम करावं लागतं. कोणी आनंदानं हे काम करत असंल असं नाही. डोमांना जर जगण्याची वेगळी प्रतिष्ठेची साधनं उपलब्ध करून दिली तर कदाचित प्रेतांच्या जगातून त्यांची सुटका होऊ शकते. कामाचा ताण आणि भय नको म्हणून सतत नशापाणी करत कार्यमग्न असणाऱ्यांनाही चांगलं आरोग्य मिळू शकतं, पण 'सब का साथ आणि सब का विकास'मध्ये हे सारं कोठून येणार? मोदींना प्रसिद्धी मिळाली. त्यांचा एक इतिहास झाला. डोम राजा बॅण्डबाजा वाजवत निवडणूकपत्रात अवतरला. किती महान काम झालं? त्यातूनच 'फिर एक बार मोदी सरकार' ही घोषणाही आली.

## नालायक उमेदवारांना परत बोलावता येतंच

लोकशाही अशी एक शासनप्रणाली आहे की, ती सातत्यानं प्रगत होत जाते. लोक आणि त्यांचा समाज बदलत जातो. स्वाभाविकच त्यांच्या हातात हात घालून चालणारी लोकशाही बदलत जाते.

बऱ्याच वेळा या दोन्ही गोष्टी बदलासाठी परस्परांना पूरक भूमिका बजावत असतात. खरं तर त्यांना तशी भूमिका घ्यावी लागते. लोकशाही परिवर्तनवादी राहिली नाही किंवा लोक आणि तिच्यात अंतर पडलं किंवा पाडलं गेलं की ती स्थितीशील होते. एक पोकळी तयार होते. मग ही पोकळी भरून काढण्याचा, तिची जागा घेण्याचा प्रयत्न हुकूमशाही, एकाधिकारशाही किंवा घराणेशाही-टोळीशाही करते. तसं घडू नये यासाठी लोकशाहीवाद्यांनी सतत जागृत राहिले पाहिजे. आपली जीवनशैली बनवणाऱ्या लोकशाहीचा हात सातत्यानं पकडून ठेवला पाहिजे. बाकी साऱ्या शासनप्रणाल्यांचा शेवट काय असतो हे आपल्याला ठाऊक असतं. पण लोकशाहीचा शेवट काय, तिचं शेवटचं रूप काय हे मात्र कुणाला सांगता येत नाही. माणूस उत्क्रांत होणारा प्राणी आहे. स्वाभाविकच त्याची लोकशाहीही उत्क्रांत होत जाते. बदल सातत्यानं होत असतो आणि स्थितीशील असं काहीच नसतं. ज्या ठिकाणी लोकशाहीला तिच्या गतीनं बदलू दिलं नाही, तिथं तिची अवस्था वाईट झाली. तिच्या नावानं कुणी मूलतत्त्ववादाचं, कुणी धर्माचं सोंग घेतलं. नवनवी सोंगं घेतली जात आहेत. आपल्याकडे तसंच घडतं आहे.

लोकशाहीत लोक आपले प्रतिनिधी निवडतात. हे प्रतिनिधी लोकांना जबाबदार राहून कारभार पाहतात. निर्णय घेतात. सरकार बनवतात; पण जबाबदारीच्या तत्त्वाला कोणत्याही कारणानं धक्का बसला तर काय करायचं? लोकशाहीत याची काळजी घेतली पाहिजे. स्वित्झर्लंडमध्ये थेट लोकशाही आहे. तिला शुद्ध लोकशाही मानलं जातं. अथेन्समध्ये ती राबवली गेली होती. स्विसमध्ये राज्यघटना बदल, महत्त्वाचे निर्णय लोकमताला टाकून घेतले जातात. विशेष म्हणजे, आपण निवडून दिलेला एखादा प्रतिनिधी अपात्र निघाला. अकार्यक्षम किंवा भ्रष्ट निघाला तर त्याला परत मागे बोलावून नवा प्रतिनिधी निवडला जातो. कोणताही पेचप्रसंग, गोंधळ उभा राहत नाही. अर्थात जेथे लोकसंख्या कमी आहे, विचारी आहे तेथेच हा प्रयोग यशस्वी होतो. लोकांचा थेट सहभाग होऊ शकतो. भारतासारख्या लोकसंख्येनं दबून गेलेल्या देशात हे थोडं कठीण म्हणजे कठीण असतं. म्हणून तर आपण प्रातिनिधिक लोकशाही स्वीकारली आहे.

ब्रिटनमध्ये उमेदवाराला परत बोलावण्याचा अधिकार मंजूर करण्यात आला. ब्रिटनला खऱ्या अर्थानं लोकशाहीची जननी मानली जाते. खऱ्या अर्थानं आणि उत्स्फूर्तपणे लोक आणि लोकप्रतिनिधी कायद्याचं पालन करण्याचा प्रयत्न करतात. कायद्याचा आदर ठेवतात आणि कायदाही भेदाभेद न करता सम्यक नजरेनं सर्वांकडं पाहत असतो. तर झालं असं की, उमेदवाराला माघारी बोलावण्याचा अधिकार तेथे पहिल्यांदा वापरला गेला. नॉर्थ अँन्ट्रीममधून निवडून आलेल्या उमेदवाराला मागं बोलावण्यात आलं. त्यासाठी दहा टक्के मतदारांची स्वाक्षरी लागते. इथं २८ टक्के लोकांनी केली. २०१४ मध्ये पीटनबरोमधून फियोना ओनसान्या लेबर पार्टीच्या तिकिटावर निवडून आल्या होत्या. गेल्या वर्षी नियम तोडून त्यांनी गाडी चालवली. त्यांच्यावर कारवाई झाली तेव्हा आपण गाडी चालवत नव्हतो तर ड्रायव्हर चालवत होता,



असं सांगून त्यांनी स्वतःची सुटका करून घेतली. पुढं चौकशीत त्या खोट्या ठरल्या. गाडी त्याच चालवत होत्या हे सिद्ध झालं. कायदा तयार करणाऱ्यांनीच कायद्याचं उल्लंघन करणे आणि खोटं बोलणं हे आरोप सिद्ध झाले. लेबर पार्टीनं फियोनांना पक्षातून काढून टाकलं. मतदारांनी परतीचा अधिकार वापरला. मोठा दंड भरावा लागू नये म्हणून फियोना यांनी खोट्याचा आधार घेतला होता. शेवटी त्या तुरुंगात गेल्या. खरं तर तिथंच त्यांचं सदस्यत्व संपलं होतं. गुन्हेगार ठरलेल्या प्रतिनिधीला मतदारांनी मागं बोलावल्यास परतावं लागतंच. त्या परतल्या. आता पोटनिवडणूक होईल. मतदार योग्य उमेदवार निवडून देतील. आपल्याकडे सध्या निवडणुका चालू आहेत. ज्यांच्यावर अनेक गंभीर आरोप आहेत तेही निवडणूक रिंगणात उभे आहेत. तुरुंगात जाऊन आलेले, जाण्याच्या बेतात असलेलेही उभे आहेत. याशिवाय निवडून जाणारे; पण सभागृहात दांड्या मारणारे आहेत. सभागृहात जाऊन मौनात जाणारे आहेत. सभागृहातही हाणामाऱ्या करणारे आहेत. राज्यघटनेविरुद्ध बोलणारे आहेत. वारेमाप आरोप करणारे आहेत. सार्वजनिक समारंभात राज्यघटना अथवा देशाचा उल्लेख करण्याऐवजी देवाचा उल्लेख करणारे आहेत. वर्षानुवर्षे ते निवडून येतात. त्यांच्याविरुद्धच्या सुनावण्या वर्षानुवर्षे चालू राहतात. तो कितीही वाईट वागला तरी अपवाद वगळता कुणाला शिक्षा झाल्याचं ऐकिवात नाही. न्याय व्यवस्थेतील पळवाटांचा फायदा घेऊन ते कायदा पळवत राहतात. अशा परिस्थितीत नालायक प्रतिनिधींना परत बोलावण्याची गरज निर्माण झाली आहे. डॉ. बाबासाहेबांनीच म्हटलं होतं की, राज्यघटना कुणाच्या हातात जाते हे महत्त्वाचं असतं. चांगल्या लोकांच्या हातात ती गेली की सर्वांत चांगली होते. सैतानांच्या हातात गेली की तिला सैतानी रूपात बसवलं जातं. लोकांनी आपला प्रतिनिधी कसा असावा हे ठरवावं लागतं. त्याच्या जबाबदारीच्या तत्त्वाकडे काळजीपूर्वक पाहावं लागतं. आपल्या वतीनं जाणारा प्रतिनिधी काही दिवसांतच गब्बर कसा बनतो, हेही तपासावं लागतं. असं झालं तरच निर्भेळ लोकशाही तयार होऊ शकते. नागरिकांनीच याबाबत पुढाकार घ्यायला हवा. ब्रिटनच्या उदाहरणाकडं गांभीर्यानं पाहायला हवं. ●●●

# आमचीच माणसं

आमचीच माणसं
कसं विसरलीत की,
शेणही माती घेऊन उठते!
अरे... हे तर रक्त आहे
रक्त क्रांती घेऊन पेटते!

मग ही माणसं
अन्यायाविरूद्ध पेटत का नाहीत?
निलांबरात फडफडणाऱ्या
निळ्या झेंड्याखाली
एकत्र भेटत का नाहीत?

आमचीच माणसं
शिकले सवरले
ज्यांनी त्यांनी स्वतःलाच शाकारले
हे कोसल्यातले किडे
स्वार्थांध गोचिडे,
विशाल बोधिवृक्षातळी
पौर्णिमेचं चांदणं
लुटत का नाहीत?


काल यांच्या मुर्दाड मनात
महासूर्याने प्राण पेरले
अस्मितेचे तेजःपुंज
हत्तीचेंही बळ दिले
महाडचे क्रांतीकारी जळ दिले
मग, नजरेला नजर भिडवून
वैऱ्याला खेटत का नाहीत?

हे भीम युग
लेखणीच्या लेण्यांचे
बेंबीच्या देठांवरील
स्वयंप्रकाशी गाण्यांचे.
प्रज्ञेच्या पेठांमधील
निळ्या निळ्या फेट्यांचे
लढ्याचे अन् रेट्यांचे...

धम्मगाडा रुतलेला
एकसंघ होऊन
हा गाडा
पुढं रेटत का नाहीत?
भीम बाण्यानं झटत का नाहीत?
माझीच माणसं...!

**– रविचंद्र हडसनकर,**
**नांदेड**

# ग्रेट थॉट्स



सर्वस्व गमावले तरी सत्यावर विश्वास ठेवा आणि ओठावरचे हसू ढळू देऊ नका.

**– सरदार वल्लभभाई पटेल**

आपण जोपर्यंत आपल्या अंतःकरणातील घाण काढून टाकत नाही, तोपर्यंत प्रार्थना करण्याचा आपल्याला हक्क नाही. **– महात्मा गांधी**






दुसऱ्यांसाठी जगतात तेच खऱ्या अर्थाने जीवंत राहतात. बाकीचे सारे जीवंत असूनही मेल्यासारखे असतात. –

**स्वामी विवेकानंद**




तुम्ही तुमच्या शत्रूसोबत शांतता प्रस्थापित करू इच्छित असाल, तर तुम्हाला तुमच्या शत्रूसोबत काम करावं लागेल. तरच तो तुमचा भागीदार बनेल. **– नेल्सन मंडेला**



तुम्ही जर खरं सांगितलं तर तुम्हाला काहीही लक्षात ठेवावे लागणार नाही.

**– मार्क ट्वेन**





प्रेम हे न संपणारं गूढ आहे. यासाठी बाकी कोणत्याही स्पष्टीकरणाची गरज उरत नाही.

**– रविंद्रनाथ टागोर**

फुलांचा सुगंध केवळ वाऱ्याच्या दिशेने दरवळतो; परंतु माणसाचा चांगुलपणा मात्र सर्व दिशांना पसरतो.

**– चाणक्य**





मी एखादी गोष्ट करू शकेन किंवा करू शकणार नाही, असा विचार जेव्हा तुम्ही करता तेव्हा तुमचं बरोबरच असतं. **– हेन्री फोर्ड**

# कोण काय बोलतं...

### राहुल गांधी

'अच्छे दिन आयेंगे'ची जागा आता 'चौकीदार चोर है' या घोषणेने घेतली आहे.



### अरविंद केजरीवाल

मोदी-शहांना हटविण्यासाठी भाजप वगळता कोणत्याही पक्षाला सरकार स्थापनेसाठी आपला पाठिंबा राहील.



### प्रियंका गांधी

जी व्यक्ती खोटारडेपणा करते, जनतेची कामे केली नाही, तिला मते देऊ नका.




### बाळासाहेब थोरात (काँग्रेसचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व माजी मंत्री)

स्वार्थासाठी विखे एका पक्षातून दुसऱ्या पक्षात उड्या मारत आहेत.




### शेन वॉटसन (चेन्नई सुपर किंगचा अष्टपैलू खेळाडू)

मी पूर्वीच्याच संघात असतो, तर मला कधीच बाहेरचा रस्ता दाखवला गेला असता.



### डॉ. जयंत नारळीकर (ज्येष्ठ शास्त्रज्ञ)

दोन-तीन वर्षांत आणखी एका जीवसृष्टीचा शोध लागण्याची शक्यता आहे.



### अखिलेश यादव



व्होटिंग मशिन आपोआप बिघडत आहेत किंवा देशभरात भाजपलाच मत देत आहेत.

### न्या. अरूण मिश्रा



सर्वोच्च न्यायालयाशी 'खेळाल' तर आगीत हात भाजतील.

### ॲड. प्रकाश आंबेडकर



सरपंचासारखं वागणाऱ्याला पुन्हा पंतप्रधान कराल का?

### राज ठाकरे



जनतेने आश्वासनामुळे हुरळून न जाता मोदी व शहा यांच्यातील सत्तेचा माज उतरवावा.

### धनंजय मुंडे



'जनतेला अच्छे दिन'ची स्वप्ने दाखविणारे 'सपनों के सौदागर' गेले कुठे?

### अजित पवार



बारामती भाजपने जिंकली तर राजकारणातून निवृत्त होईन.

पाक्षिक
स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०% सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :
कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------ जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ------------------------------------------------पत्ता : ---------------------------

------------------------------------------------शहर : --------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------- फोन नं. (घर) : -------------------------

मो. नं. : ------------------------इ-मेल : ----------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460




With Best
Compliments from

A.B.ENTERPRISES